# पाहणे

( कविता )

--- चं. प्र. देशपांडे.



## पाहणे

पाहणे हे नुसते डोळ्यांचे थोडेच असते
ऐकलेले पूर्ण ऐकणे हेही पाहणेच तर असते
मला तर स्वप्नातले पाहणेही
सत्यातल्या चवीहून खरे वाटते

तुझा मला स्पर्श झाला होता
की तो सुगंध होता तुझ्या केसांचा
हे गूढ
न उकलण्याचा क्षण वारंवार येत राहतो
तो पाहिला जातो तेव्हा
सर्वस्वाने आपण
असतो माझी कविता
अनिमिष पाहण्याची

कदाचित तूच पाहात असशील
आणि मी ऐकत असेन तुझे
वस्त्रहीन संवाद
हा क्षण
प्रथमच येत असल्याने नव्याने
आपल्या जगण्यात

संकोच कसला
उलट सगळेच उत्फुल्ल असल्याने
ओळखच लोपलेली असणे आपली

उगवता सूर्य
आणि त्याच्याबरोबर येणारे अनेक पक्षी
माझ्यात स्फोट घडवतात
माझी प्रत्येक कविता

असते तुझेमाझे पाहणे जगाकडे
--- ००० ---

काम

पावसानंतर ऊन पडते तेव्हा वाटते
किती स्वच्छ ऊन खरे तर
ते असायचे तसेच असते
झाडे आणि इमारती देतात
त्याला तजेला

याउलट अनेक संकटे येऊन जातात
शत्रू देशप्रमुखावर त्याला अधिकच
धीराचा शक्तिमान आणि आदरणीय करत

आज त्याच्या देशावर हल्ला करणारे
तिसरे समजतात तो आहे त्यांचाच निर्णय
तेच पकडताहेत त्याला कोंडीत

पण तेच मारतात जेव्हा आपलेही लोक तेव्हा
आपण नुसते अचंबित होऊन नाही भागत
त्या वेड्यांचे असणारच काही
त्यांचे त्यांचे सुसंगत तर्कशास्त्र
हे समजून

याच्यामुळे ते घडतेय असे तज्ञ
विश्लेषण करणारी मने
साशंक होतात त्याच त्यांच्या बुद्धीने

तरीही काम मिळत असल्याच्या समाधानात
--- ००० ---

आवळलेले गळे

मन याचा अर्थच दडपण रे बाळांनो
स्त्रियांनाच नाहीत नुसती पुरुषांना
तृतीयांना समसंभोग्यांना सगळ्यांना आहेत
अंधुक प्रकाश आणि आवळलेले गळे
असेच तर असत आले आहे सगळे

सगळीच मने अन्यायित जखडलेली
उफाळून यायला टपलेली आहेत
यांतल्या स्त्रियाच फक्त येणार
खुल्या प्रकाशात आणि ते पाहून
जागीच होता कामा नये
वर्षानुवर्षांची वखवख
ही जादू गृहीत कशी धरणार

धोंड आणि पाप असलेली एकटीच
कशी होणार निष्पाप खळाळती नदी

मनच नाही असे निष्पाप कोण
कुठे सापडणार रामायणात
लक्ष्मण सीतेच्या पायांकडेच फक्त
बघत होता म्हणे

आयांनो तुमच्या मुलांना शिकवा
त्यांची नजर स्वच्छ करायला
सांगा त्यांना काहीही उघडे दिसले
वा उभार मोकळे तरी त्यावरून सहज
फिरावी नजर जशी आकाशावरून

गुरू म्हणाले मनात माकड अजिबात
येता कामा नये साधे सरळ मजेत जगा

माकडांचा अटळ उच्छाद हाच तर आहे विषय
--- ००० ---

## नामजप

कधी तरी कळायलाच हवे ना
नामजपासारखे सरावातले अनुभव
हळूहळू होत जाणार
मागे पडलेली घरे
विटत जाणार
रोज तेच तेच सूर्यास्त टेंभा मिरवणारे
नैतिकतेचा

एक क्षण आकाराला येण्यासाठी
आधी कुठे कुठे किती किती
तिकिटे फाडलेली असतात
आणि काय कशी असते
त्या तिकिटांची वंशावळ
हे दिसतच नाही
हे कबूल न करता
आपले सुजलेले अवयव झाकण्यासाठी
घेतले जाते देशाचे पांघरुण

पण एवढ्याने नाही भागत
मित्रमंडळ वाढवावे लागते
एकमेकांच्या खरेदीला जावे लागते

खूप वाईट वाटणे आणि रंग उडालेल्या
कहाण्यांचे मजकूर तिथल्याच वस्तू
एकमेकांत मिसळून वापरणे
एवढेच उरते मग शब्दांचे काम

फारच गुंताड्याचे निरुत्तर
करणारे कुणी काही दाखवू लागला तर
त्यात काही तथ्यच नसल्याचे
नम्रपणे सांगून टाकायचे लगेच
नामजप हाच कळवळा म्हणत निस्पृहपणे
--- ००० ---

नव्या कविता

आपले सर्वांचे मिळून मन
एकच असते हे दिसल्याने
तू लिहिलेली अर्थपूर्ण कविता
मला आधीच माहीत असते
मी चकित होतो ते फक्त
तिकडे माझे लक्ष नव्हते म्हणून

ना तुला ना मला चालते
अनिश्चिततेची भीती
म्हणूनच आपले अर्थ
आपल्याला मेंदूबाहेरचे नाही चालत
आहे ते खोटे असण्याची भीती परवडते

माहीत असलेली कविता लिहीत लिहीत
तू एक मोठा कवी होतोस
हे तर किती भीतीदायक
पण आपण सरावणेच करतो पसंत

शब्द धरून ठेवण्याचे तुझे
आसुसलेपण करते तुला शब्दप्रभू
तुझे सत्कार होतात हार
घातले जातात तुला

सर्वांनाच भीती असते निरर्थकतेची
त्या दडपणाने न जाणो आपण
बडबडायला लागू निरर्थक

त्यापेक्षा आत्ताच सोडू या मन मोकळे
निरर्थकतेच्या अमर्याद जगाला वाव देत

निदान माहीत नसलेल्या नव्या
कविता तरी येतील समोर
--- ००० ---

मुखवटा

निसर्गहृदये ओसंडून वाहिल्यामुळे
वाटते आता आनंदात जातील दिवस पण
कोणत्याही पेयाचे प्रवाह वा
कोणत्याही आठवणींचे ओहोळ
चिमटीत पकडता येत नसल्याने
दु:ख होतच राहते

हुशार स्त्री-पुरुष त्यातही त्यांचे चेहरे
रंगवतात रागदारी संगीतात आणि पुन्हा एकदा
येऊ पाहतात चुंबकक्षेत्रात आयुष्याच्या
तेव्हा सर्वच पशुपक्षी
झोपी जातात डाराडूर
काही कळतच नसल्याने

हव्यास नको हे तत्त्व सारखेच समोर
पडद्यावर येत राहिल्याने
बाजारात गर्दी होते मुद्दाम
बेफिकीर होण्यासाठी
मरू देत त्या नोकऱ्या म्हणत

मग प्रश्न राहतो तो
देशाच्या आर्थिक परिस्थितीचा
त्यासाठी सर्वांनी संभोगसुखात
राहावे तीन वर्षे असे ठरते

उगीचच उखाळ्यापाखाळ्या काढण्यात
अर्थ नसतो निर्दोष गाव कुठे मिळणार
या पृथ्वीवर या विचाराची तरी
हवीच ना समज

माणूस म्हणजे मुखवटा असे असले तरी
प्रेमाचा मुखवटा श्रेयस्कर असेच होणार ना
--- ००० ---

परात्म भाव

मी काही अभिनेता नाही
तरीही एका पूर्वी पाहिलेल्या चित्रपटाची कथा
वाचून मी कल्पना करू लागलो की बाबा
कसा केला असता मी अभिनय
अमुक वा तमुक प्रसंगात

मला मुळात ते प्रसंगच खरे वाटेनात
मला धड हसू रडू वा राग
काहीच येईना

मग मी सर्व दारे खिडक्या लावून घेतल्या
अंधारात तरी ते सर्व खरे वाटेल या कल्पनेने
अंधार असला तरी मला
श्वास घेता येत होता
हे काही नवल नव्हते मग मी
खरे म्हणजे काय यावर सुरू केले चिंतन

मी चेहराच काय हात पाय ही नव्हते वापरले कधी सार्थपणे
आवाजही फक्त माझ्या मालकीचा म्हणूनच वापरला होता
मी खरा आहे का हे न विचारता
कसा काय मी अंधार चाटत होतो
माझ्या आयुष्यातल्या सर्व माणसांना
मी कशा प्रतिक्रिया देत होतो
त्यांना चांगली वा वाईट कसे ठरवत होतो

या बालिश कल्पनेने मला यायला लागला
परात्म भाव
नोकरी उत्तम करत कुटुंबकबिला जोपासणारा मी
इतका उथळ का राहिलो होतो

खूप वेळाने मी खिडक्या उघडल्या तर
बाहेरही अंधार होता आणि दिवे गेलेले होते
हे खरे असले तरी मला ते उथळच वाटले
माझ्या कल्पनेसारखेच

यू ट्यूबवर तो चित्रपट पुन्हा पाहावा
असे ठरवले साले ते सगळे बनावट असले तरी

त्या त्या वेळी ते ते सगळे खरे धरून चालतात साले
दिग्दर्शक अभिनेते अभिनेत्री लाईटवाले साउंडवाले
आणि मेकपमन

मरू दे आहे मी उथळ असे म्हणून मग मी
दिले सोडून
--- ००० ---

पाचपन्नास

माझे मलाच कळतेय
धार नाही आलेली

म्हणजे काय झालेय
अंथरुण पाहून पाय पसरलेत
की कानामागून येऊन तिखट झाल्याप्रमाणे
कानाचे महत्त्व वाढून बसलेय

माझा अनुभव माझी मानवता
यांचे पितळ उघडे पडतेय की काय
अशी शंका येत असतानाच
खूप बंधूंनी वाहवा केली
जणू माझी कविता ही
दुरून डोंगर साजरे
अशी असली तरीही
मूल्यात्मकतेची कंड
शमवणारी होतीच

मी आरशात पाहिले तर
मी तृप्त दिसत होतो
माझ्या चेहऱ्यावरून कुणालाही
कळूच नसते शकले की ही कविता
रटाळ असून खोटी पडतेय

खरे तर तसे आम्ही आपापल्या
कवितांची काळजी करणारे थोडेच होतो
कवितेचे उपयोग आणि परिणाम हेच
महत्त्वाचे होते

अशीच निस्पृहपणे काढायची
पाचपन्नास वर्षे की झाले
--- ००० ---

विशेषणे

होती कुठे आधी विशेषणे
हे आता झालेय निरुद्योगी मनामुळे
जणू काही विशेषणांसहच आहे हृदय

प्रत्येक वस्तूचे मूळ रूप
शोधावे असे वाटत असतानाच
एका गुलाबाच्या झाडाजवळून
सरपटत आली ग्लानी
तिचा रंग गडद हिरवा होता
गडद हिरवी ग्लानी
ही एकच वस्तू असल्याप्रमाणे

आजारपणातून उठल्याप्रमाणे
गोळीबार व्हावा अचानक आळसात
तसे जग काळवंडलेले वाटले
एखाद्या उग्र दुकानातल्या
ओसंडून वाहत्या
गोळ्याबिस्किटांप्रमाणे

उपस्थितीत म्हाताऱ्यांच्या
बागेत खेळणाऱ्या
पुढाऱ्यांच्या वाढदिवसांच्या भेंड्या

निवृत्त होण्यापूर्वी या सर्वांनी
हाताळली होती कागदपत्रे असंख्य
सवयींच्या भीतींची

विशेषणे अजरामरच राहतील
कारण मन नसल्याने आजार होतील
की ते असल्याने हे नक्की माहीत नाहीय

नकोत ती वर्णनेही काळीनिळी
--- ००० ---

कोसळ

कोणता दगड कुणाच्या डोक्यावर कोसळावा
ढिगाऱ्यात गाडले गेल्यावर किती क्षण
तडफड व्हावी हे सगळे ठरलेले असेल
की अंदाजपंचे घडत असेल काहीही
राजकीय-सामाजिक विचारवंत काढतात शोधून
कारणमीमांसा माणसेच कशी उठलेली असतात
एकमेकांच्या जिवावर ते पण ते तरी का घडते
कोणत्या प्रेरणा वा शक्ती असतात त्यामागे

हजारो टन पाणी उचलून वर न्यावे आकाशात
आणि पाडावा त्याचा पाऊस काही ठराविक वेळी
घडावीत भयानक वादळे पडावीत झाडे पडाव्यात दरडी
एक म्हणतो पूर्ण विश्व चालते एका शिस्तीने
इथे कोणतेही अराजक नाही अस्तित्वात

मग तर हे का मेले आणि ते तिथेच राहणारे असूनही
का वाचले सुखदु:खांच्या घटना कशा घडल्या
त्यांचे कुणाला किती धक्के बसले हे कसे ठरले असेल

नियती म्हटले तर अंधश्रद्धा ठरेल आणि अराजक
म्हटले तर काय ठरेल कोण जाणे नियती म्हटले तर
बुद्धी काय चाटायचीय असे होईल आणि अराजक
म्हटले तर पुन्हा बुद्धी काय चाटायचीय असेच होईल

की थोडी शिस्त आणि थोडे अराजक म्हणावे
ब्राम्हणांचे वर्चस्व गेल्याने त्यांनी नाटक लिहिले
डाव्यांना राजकारणातून हाकलल्यामुळे त्यांनी
सांस्कृतिक क्षेत्र पकडले हे कसे छान बौद्धिक वाटते

समजायला वेळ लागेल इतकेच बाकी असते सगळे
शिस्तीतच कळेल ते कळू द्या बाकीची राहू द्या अंधश्रद्धा
--- ००० ---

अमोल

मी विसरलोच होतो
अमोल फरसाण बंद असते शनिवारी
इतर सगळे सोमवारी
जात असले पिकनिकला तरी
कारण त्याचे फरसाण नसले फार तेलकट
तरी गल्ल्यावरच्या त्या गब्दुल्याचा चेहरा
असतो चमकता प्रखर प्रकाशात

असे वाटते की त्याला घरदार
नातेवाईक मित्र कुणीच नसणार
हा एकटाच इथे आपोआप उगवत असणार
पांढरा शुभ्र आणि ताजे ताजे गंध लावलेला

ते गंध दिवसभर उत्साही दिसे आणि क्लीन
विश्वासच निर्माण होई की इथे
जे असेल ते सर्व स्वच्छ आणि ताजेच असेल

तो सतत कामात वा फोनात असे
क्वचितच हसे स्त्रिया असोत की पुरुष
त्याचे फक्त बिलांवर लक्ष असे
चूकभूल झालीच काही तर स्त्रियांना
बेहेनजी म्हणून तो स्मित करी
आणि पुरुषांना म्हणे माफ करो

हा कधीच दु:खी वा कंटाळलेला
नसतो वा चिडचिडलेलाही
हे कसे काय याचे सर्वांनाच नवल वाटे
हा कधीच बदलत नाही आपण मात्र

या विचारात लोक फरसाण वा मटार करंजी
घेत एखादा मनात म्हणे तंत्रच बसवलेय साल्याने
माणसाला मनच नाही असे कसे असेल
--- ००० ---

हित आणि अहित

एका देशात होते काही लोक हिताचे आणि काही अहिताचे
अहिताचे लोक निवडून आल्याने सत्तेत होते
त्यामुळे हिताचे लोक खिन्न आणि त्रासलेले असत
ते नेहमी अहिताच्या लोकांवर शाब्दिक तुटून पडत
कुणी या गावातून कुणी त्या शहरातून वा एखाद्या गल्लीतून

पण अहितवाल्यांना खाली खेचायचे डाव सुरू होत
तेव्हा मात्र हितवाल्यांत वैचारिक मतभेद असल्याचे पुढे येई
शिवाय पंतप्रधान कोण अध्यक्ष कोण असेही कळीचे
छुपे प्रश्न असत शिवाय पैसा कुणाकडे जास्त आहे
हाही एक कळीचा मुद्दा असे शिवाय सध्या कोण आहेत
जास्त निवडून आलेले शिवाय तिकडचे इकडे कोण जास्त
खेचू शकेल आणि डमी कोण जास्त उभे करू शकेल
आणि मुख्य म्हणजे त्यांचे उमेदवार पाडायचे डाव
कुणाकडे जास्त आहेत हेही मुद्दे असत शिवाय
आपापला पक्ष वाढवायचे प्रयत्न कुणीही करणारच
हे सगळ्यांना मान्य असे त्यासाठीचे त्यांचे डाव वेगळे असत

सगळ्याच पक्षांत इकडचे तिकडे तिकडचे इकडे आलेले असत
काही अजून रुळायचे असत काही एकदम प्रामाणिकपणे निर्लज्ज होत
जनतेला यात काही वावगे वाटत नसे विचारस्वातंत्र्याचा
सगळ्यांनीच केलेला प्रचार जनतेला मान्य असे तसेच
सहिष्णुतेच्या प्रचाराचे होई जनता सहिष्णू राही
त्यामुळे हिताचे भोक्ते चडफडत आतून कोण कुणाशी काय बोलतोय
याचे सार्वत्रिक संशय असत त्यात शिवाय हिताच्या काही लोकांमागे
लावलेल्या केसेसचा ससेमिरा असे पण घटना आणि कोर्ट
यांचा सगळे मान राखत पोलिस आणि सैन्य यांनाही सॅल्यूट मारत

जनतेचे प्रतिनिधित्व विकास आणि समान संधी यांवर सर्वांचे एकमत असे
--- ००० ---

बिनचूक

तुम्हाला येते रडू
ठीक आहे ना
उद्याचे उद्या म्हणणारेही
काही असणारच ना

ते निवर्तलेले तुमच्या प्रत्येक
भल्याबुऱ्याला हजर राहात
म्हणजे काय
आकाशातली हिरेमाणके

त्यांना असेल आवड
संवेदनशीलतेची
आणि मला समजा डेड
एंडची तर मी का वाईट

तुम्ही कसे घडलात
तेच तसेच प्राणी
तसेच कपडे
कुठे होते माझ्या विचारांना

तुम्ही प्रेम करून अडकलात
मला हव्या होत्या माझ्यात
न अडकणाऱ्या साखळ्या
सादप्रतिसादांच्या ज्वाळा

प्रत्येकाची सुरक्षितता
आणि बेफिकिरी
एकाच साच्यातून नाही येत
बिनचूक उत्पादन म्हणून

हाच आहे प्रश्न तुम्ही
श्रेष्ठ की मी हा नव्हे
--- ००० ---

इतकी वर्षे

कुठूनतरी करायची सुरुवात
म्हणून मी एक मोर विकत घेतला
तो घाबरलेला होता
अरे म्हटले तसे काही नाही
माझ्याकडे लक्ष जावे म्हणून घेतलाय तुला
थांब तुला जरा भविष्य पाजतो
तसे केल्यावर त्याला
जरा तरतरी आली
मग त्याने अधिकाधिक आकर्षक
होत राहायचे मान्य केले

त्यानंतर व्यसन नको म्हणून मी
वाऱ्याला धार लावायचा
धंदा सुरू केला आधी मी
सायकलवरून फिरायचो
दिवस पालटले तसे मी जरा
रस्त्यांवरच्या पाट्या सर्वांच्या आयुष्यांत
सुभाषिते म्हणून वावरतील
असे प्रयत्न सुरू केले

याचाच भाग म्हणून मी
माझ्या मोठ्या भावाला सांगितले
हा तुझा दहशतवादीपणा बंद कर
घरचे सगळे चाललेत नेवाश्याला
आणि मी चाललोय हिमालयात दारू प्यायला
काय करायचे ते कर तर तो म्हणाला
तुम्ही परताल तेव्हा घरात तुम्हाला
माझे प्रेत मिळेल आणि त्याला
सगळीकडून दात फुटलेले असतील
आणि पोलिस तुमची वाटच पाहात असतील
प्रसाद घेऊन तुमची दारू उतरवण्यासाठी
आत जावे लागेल तेव्हा डास चावून गुदमरून
उघडतील तुमचे डोळे मग भाकाल माझी दया
तुम्ही पण मी तसूभरही हलणार नाही

हा एक कायमचा रोगच होऊन बसला होता
बाजारात तर तो लपवावाच लागत होता

नाही तर बातमीपत्रासारखे सर्व दुकानच
लुटले जाण्याचा धोका होता

कधी कधी इतकी निराशा वाटे
गरिबांचे हाल पाहून की
आपण योगासने करत नीट राहणे
हे अपराधी वाटे
ते वाईट वाटणे आणि तशा त्या
परिस्थितीचा राग येणे
यातून मला बीपी आणि मधुमेह लागले
तेव्हा कुठे मला परिमार्जन
झाल्यासारखे वाटले
मी माझा वंश वाढवण्याचे

हे काही माझे चरित्र नव्हे
ना ही एखाद्या देशाच्या अधोगतीची गाथा
आहे हे फक्त एक निवेदन आहे
डोंगरावरून गडगडत निघालेला दगड
कसा कसा जमिनीचे लचके तोडत जातो त्याचे

आधी सिनेमाला जा मग तिथल्याच मॉलमध्ये
खरेदी करा आणि मग तिथल्याच हॉटेलात
दिवसभराची गाणी ऐकून घरी परता थकून
एवढ्याच तर होत्या
माझ्या चैनीच्या कल्पना
पण तिथेही सगळे चंद्र तुटत गेले
आणि उरले फक्त उगीचच
जगत राहिल्याचे अवशेष

प्रत्येकाला वेगळेच काही हवे असण्याच्या
या खेळातूनच तर फूट पडत गेली
सीमावाद सुरू झाले संस्था बरखास्त झाल्या
विश्वस्त सगळे देशोधडीला लागले
आरपार कोथळे निघाले सर्व गंतव्यांचे
आणि अधिकच गरज निर्माण झाली
बांधिलकी संवेदनशीलता
कणव आणि करुणा या कल्पनांची

माझ्या काही मित्रांना खात्री होती

ते ज्ञानी असल्याची म्हटले
मी नाही होत कुणाचा शिष्य
जगाचे भले व्हायचे तेव्हा होईल असे
म्हणण्यापेक्षा कधीच नाही होऊ शकणार
जोवर आपण नाही बदलत
आपल्या करमणुकीच्या व्याख्या
आणि सतत भावविवशतेत
संभोगाची स्वप्ने पाहण्याच्या सवयी
नुसते ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम
नाही बांधू शकणार तोरणे
आपल्या पडलेल्या घरांवर

मग लक्षात आल्याने एक चाळा म्हणून वाहने
धुवायला घेतली तर कित्येक दिवस
पडून राहिल्याने ती नुसती
सडली होती आठवणींत म्हणजे
त्यांना मंदिरांत नेणे गरजेचे होते

एका वेळी एकच विचार चालू शकतो
हे लक्षात घेऊन नामजपाची मात्रा काढली
तेव्हा बाकी सगळे गेले बोंबलत चेष्टा करणारे
खुजे खुजे होत मातीत मिसळत गेले

शांतता म्हणजे दगड
हा कसा असेल सारांश मग विचार आला
इतकी वर्षे आपण काय झक मारत होतो की काय
--- ००० ---

धड धाड धड

ही एसटी मिळायलाच हवी उशीर झालाय
मी भिरभिरतोय फलाट बघत चूकून लागलीय
का इकडे तिकडे अनाऊन्समेन्ट
फडतूस आहे आणि आणि विचारायला
गेल्यास ते इसम चिडतेय खूप
आवाजही भंगार आहे बहुतेक
त्याच्या आयुष्यासारखाच
ते काय बोलतेय तेही कळत नाही
फक्त वसकन अंगावर आलेय एवढेच कळतेय

आता ते इसम कमी पगारात जास्त
काम करतेय की त्याचे नशीबच
फाटलेय त्याच्या आवाजासारखे
कोण जाणे पण या क्षणी तरी त्याचेच राज्य
चालतेय माझ्या आयुष्यात

अनेक लोक सगळे फलाट धुंडाळताना दिसताहेत
एसटी हा विषयच मुळात गरीब काटकसरी
आणि नगण्य लोकांचा असावा अशा फारशा
दर्जेदार नसलेल्या लोकांना
कशाला हवीय तत्पर आणि गोड सेवा

तो भडवा आल्यागेलेल्या गाड्यांच्या नोंदी
करूनच कावतोय त्याच्या घरचे
म्हणत असतील मरू दे तिकडेच स्टँडवरच

एका प्रवाश्याशी झालेयच त्याचे जोरदार भांडण
त्याला सवय असणार भोसडीच्याला
प्रवासी मात्र लालबुंद झालाय

आला बाबा एकदाचा माझा लाल डब्बा
धड धाड धड चढून जागा पकडावी मरो बाकीचे
--- ००० ---

## पाऊस

मला टीव्हीवरचा पाऊस कोरडा वाटतो
भिजलेली शेते माणसेही कोरडी वाटतात
छत्र्या वाहने जनावरे धरणे आणि पूरही
जणू चित्रेच रेखाटलेली थंडी गार वारे
चिकटलेले कपडे आणि गाडीवरचा
उकळता चहाही आणि तो घेतल्यावर
बरे वाटणेही लढणाऱ्या वाफा आणि धूर

एक कुत्रे पडून आहे गळाही टेकवून
जमिनीवर तयार होतेय जणू
त्याच्यात आणि जमिनीत ऊब
त्याचे डोळे उघडे आहेत त्यालाही
पाऊस ओला दिसत नसावा
पण थोड्या वेळाने तो थांबेल
हे माहीत असावे मातकट अंगाने

त्याला कुणी हटकत नाही
जातात येतात त्याच्या समोरून
आपल्याला हाड हाड करून यांना
काहीच फायदा नाही
हे त्याला समजत असावे डोळे
निष्पाप साळसूद ठेवून अर्धवट
झोपेत असल्याप्रमाणे ते बघतेय
देशाचे संरक्षण असल्यासारखे

इथे बरेच लोक भिजले तरी
कोरडे भिजतील कोरड्यानेच
फणफणतील तापाने

राजकारण डावपेच आणि खऱ्याखोट्याचे गोंधळ
यांनी मनेच कोरडी पडलीयत बहुतेकांची
काटेरी तारांवर वाळत टाकल्यासारखी
--- ००० ---

राडा आणि मार खाणे

काम होणार नाही म्हटलेला गरीब
सोसायटीच्या अध्यक्षालाच येतो घेऊन
आपला माणूस आहे साहेब बघा काही
तो म्हणतो बँक मॅनेजरला मॅनेजर म्हणतो
सध्या तुम्ही भरा याची बाकी आणि देऊन टाका
सोसायटीचे नाबाकीपत्र आणि लगेच घेऊन जा
इथले कर्ज जमवून घ्यावेच लागते हे काय आम्ही
सांगायचे तुम्हाला यावर तिघेही हसतात

नगरपालिकेत बससेवेत ऑफिसांत पोलिसांत
सगळीकडेच असतात माणसे कुणाचे ना कुणाचे
वरदहस्त असलेली माणूस दिसतोय गरीब
निरुपद्रवी म्हणून त्याला कुणी तसे समजत नाही
रस्त्यावरही फिरत असतात माणसे गरीब
वा झगझगीत कपड्यांतली कुणाचे ना कुणाचे
हक्काचे उपकार घेणारी ना ती मिंधी असतात
ना त्यांचे पोशिंदे हे सगळेच जाणून असतात
शक्य तो कुणीच कुणाच्या नादी नसते
लागायचे न जाणो आपला भाऊबंदच निघायचा
आणि उगीच वाढवून कपडे फाडून अंग
सुजवून उपयोग काय आपल्यासारखाच तो

पण बरीच माणसे एकटी असतात त्यांना वाटते
आपापले काम करावे कुणाला त्रास देऊ नये
आपापल्या कुटुंबासह मजेत जगावे निर्भयपणे
मुलांना नोकऱ्या लागाव्यात ओळखीशिवाय
महाराजांनी शिकवलेला स्वाभिमान
असावा त्यांच्या रक्तात पण त्यांना माहीत असते

दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांत होतो त्याला राडा म्हणतात
आणि कार्यकर्ते आणि एकटा माणूस यांत होते ते
असते एकट्याने मार खाणे ना हाक ना बोंब असे
--- ००० ---

नवा सूर्यास्त

कळेल कळेल तुम्ही असे चला
या मार्गाने वर बघत
आठवणी काढत दुसऱ्या
कुणाच्याही डोक्यातल्या
उगीचच सरळ चित्र काढत
नका बसू या ओंडक्यावर
तुमच्या डोळ्यांचे नंबर संभाळा
मला नाही फरक पडत
भाषेवर अवलंबूनच नाही राहायचे
म्हटल्यावर थोडेच कुणी खट्टू होईल

भाषेत तुम्ही कविता घासता
तेही चुकीचे आहे भाषा म्हणजे
आरसा आहे हे विसरूनच जा
खूप वर्षे तपस्या झाली
पण झाले काय फक्त
दगडाचा फोटो काढणे
जखमा झाल्या तर होऊ द्यात
मार्ग बदलल्यावर पायाखालचा
कसा असेल भावनांचा कल्लोळ

काळजी घेऊन तरी काय झाले
फक्त एक व्याकरण सापडले
आणि भाषेतली सुरक्षितता आली
जे माहीत आहे
तेच पुन्हा पुन्हा कळत राहिले

तुम्हाला ना धार्मिक पेये हवी होती
ना हवे होते विचारवंतांचे उत्सर्जन
तरीही एक आभास चालू ठेवलात
की जणू तुमच्या घरातल्या
फर्निचरमध्येच दडलेय
भावनिक तीव्रतेचे अंतिम रहस्य

तुम्ही आता गाडले जाणार
तुमच्या सवयीत असे नका समजू
अजूनही ही नवी भाषा शिका

ही खूप काही बोलू शकते
अमूकच ठरलेल्या
अर्थाला बांधील न राहता

तुमच्या अनुभवाला आधी
कात्री लावा मग आधी
तुमची शाळा पाडा आणि तिथेच
लावा शोले चा शो
तुमचे सर्व प्रश्न मिटतील
फक्त म्हणींचा त्याग करा
आणि वाचनालये भट्टीत टाका

छे छे मी काही तुमचा
गुरू नाही हो अडवातिडवा
मी आहे फक्त एक भाषाभावाचा
होय भाषेच्या अभावाचा
एक अनभिषिक्त भिकारी
मला नमन नका करू
कारण तुम्हाला दिसतोय
तो मी नाहीच आहे ते आहे फक्त
तुमच्याच आजोळचे एक मृत झाड

कधी ना कधी तुम्हाला
टाकावाच लागेल भाषेवरचा विश्वास
की तीच हमखास देत राहील
तुमच्या आयुष्याचे बिनचूक बजेट
किंवा लक्षात ठेवेल
तुमच्या कपड्यांची मापे किंवा
धूत राहील तुमच्या जखमा

हीच भाषा वापरत
तुम्ही कसले करणार परिवर्तन
खरे तर हे बोलणे
भाषेबद्दल चाललेय असे समजूच नका तुम्ही
भाषा म्हणजे चिन्हे हे विसरूनच जा तुम्ही
काय देतात वा देऊ शकतात तुम्हाला
तुमच्या पालकांनी घातलेली अंगडी टोपडी
दुनियाने हमको दिया क्या
हे स्वत:च्या भरकटून जाण्याचा

गौरव करणारे गाणेही
तुमचा नरकच झालेय हे बघा
डोळे उघडून आणि कान फडकवून

मी काही तुमचा गुरू नाही
पण तुम्हाला या सडलेल्या
भाषेतून बाहेर काढल्याशिवाय
मी बोलणार तरी कुणाशी आणि कसे
मला कल्पना आहे
भाषेशिवाय तुमची नोकरीही नाही टिकणार
शिवाय तुमची प्रेयसी
तुम्हाला सोडून जाईल ही भीतीही आहेच

सध्या भाषेमुळे तुम्ही जे शंभर टक्के
ढोंग करताहात ते फक्त
भाषेपुरते फक्त पाच टक्केच ठेवा ना
बाकीचा वेळ जाऊ द्या ना वाहून
या निरर्थक समृद्धीत

असे कुणी ना कुणी आता येतच राहतील
भाषेच्याच मदतीने भाषेचेच उच्चाटन करणारे
माहीत असलेल्या बाबींच्या निवेदनाला
कविता म्हणायचे दिवस संपले आता
तुमची इच्छा असो नसो जागे व्हाच आता
नवा सूर्यास्त होतोय
--- ००० ---

सार्वत्रिक मूल्य

माझ्या आधीपासून असलेली झाडे म्हणाली
आम्ही प्रेमात मर्जी
म्हटले मला काय करमणूक
दरी तुमची खोके तुमचे
डोके तुमचे

काही नाही हवेला
टप्पू मारून विचारले उद्यासाठी
भाजी कोणती घेणार चित्राचा आकार
ज्याला आवडेल तो वाचेल
जो नाचेल तो नाचेल

तिच्या मनात दिसले नाही
प्रतिसादाची शकले करून
सजवून देणे
मी केली होती कल्पना
तिची केशरी रंगात
पण तिचे तरी काय
मनच शेवटी त्या क्षणी
तिच्याकडे पाहुणे असतील
औषधासाठी दरदर भटकणारे
काळी जादू करत

जग म्हणजे एकच विषय
ही एक कपोलकल्पित
निगराणी आहे आवडतीच्या
मिठासारखी मी कधीही
टक्केटोणपे आस्वादल्याशिवाय
फंदातच नाही पडत
कलामूल्य या विषयावर
सेमिनार घेत राजकीय
भिकारडेपणा करायच्या

मला माहीत आहे
हा देश कार्यकर्त्यांसाठी आरक्षित
बुभुक्षित आणि बक्षीस आहे
भविष्य चांगले शोधत

जगभर फिरून येऊनही
शेवटी शेपू नाही आवडत
हाच असेल विषय तर लखलाभ
तुमचे तुम्हाला थोरपण त्यापेक्षा
खेड्यातल्या बायका सरपण

व्यावहारिक शहाणपण
कमावण्यासाठी मी जेव्हा
पुकारा केला की ये दुनिया
उसीकी जमाना उसीका
तेव्हा ऊर फुटलेले मासे शरण आले
उपरती होत मानवहितासाठी

मी दाखवून नाही
चालत वा बोलत कुणाचेही
उणेदुणे गुप्तता हा एक
परवलीचा शब्दच आहे
खाजगीपाणामुळेच फोफावतोय
चोरटेपणा हेरगिरी
आणि द्रोणागिरी

कुठेही जा झाडे
असणारच प्रेमात मी म्हणतो
पण तुम्हाला तिथल्या तिथेच
बघणे भाग आहे
चिंचोके आवडोत की कवड्या
त्यांचे चमकते चमनगोटे हसले

माझा गंभीरपणा त्यांना विनोदी
स्वप्नासारखा वाटतो
आणि मला रडू येते तेव्हा
जेवणे उरकून सगळे
गप्पा मारत म्हणत असतात
सारी सारी रात तेरी

म्हणून मग मी ठरवतो
नकोच काही मनावर तर
लाखांचे पोशिंदे शेकड्यांनी

येतात चाल करून
हातांत विषाचे प्याले घेऊन
म्हणतात तू काय
सॉक्रेटिसचा चष्मा आहेस की काय

हजारो पुस्तके वाचून आलेले
मला कसा देतील पाठिंबा
ते फक्त सलगता म्हणजेच
आईचे प्रेम असे समजत बसले
माझ्या हाती मला नकोच आहे
त्यांच्या पाळण्याची दोरी
कारण माझ्यासमोर आले
तर मातीत जाते त्यांची विद्वत्ता
आणि सर्व गटारांवरची त्यांची सत्ता

त्यामुळे सरळ
सामोपचाराचे काढू सूत चरखा
कितीही जुना असो
गुटखा खात प्रेमाने राहू
राहिलेत किती आता दिवस

या जगाचा स्वर्ग नसतो होत
त्याला जगच वेगळे लागते
हे नाही पटणार कुणाला
म्हणून तर दुर्लक्ष हे होऊन बसते
एक सार्वत्रिक मूल्य
--- ००० ---

## उलट

रोज कशाला शुभेच्छा
आणि मग पुढे नाही पाळता येत
मला कुठलाही प्राणी मी यादीच
देऊन ठेवतो माझ्या आवडीनिवडींची
उदाहरणार्थ वाढदिवस नको म्हणजे
कशाला तुमच्या मनाचे काम सोडून
माझ्या मनाला विश्वास देत बसताय
मी नुसता बसून राहिलो निवांत तरी
मी नष्ट करू शकतो माझ्या बालपणीच्या आठवणी
उलट तुम्हीच ठरवा तुम्हाला काय काय ठेवायचेय ते
--- ००० ---

फुल स्वातंत्र्य

मिटक्या मारत जगणे म्हणजेच
सर्कशीतले झोपाळेबहाद्दर
आज सकाळचा चहाच न मिळालेले
तिकडे बंदरावर खूप गर्दी असून

अतोनात प्रेम करण्यासाठी
आधी चहा तर हवा उगीचच सवंग
घोषणा कशाला लवंगतोड विडा
म्हणून पतंग खपवून काय उपयोग

खरे तर सर्व राजकीय प्रश्नांवर
आहेत उत्तरे म्हणून निवडणुकाच
रद्द केल्या तर पाणीपुरवठा काय
तुमचा बाप करेल

लोकांना हवेच असतात प्रश्न आणि समस्या
त्यांना सुरुवात म्हणून खडू आणि उदबत्ती चालते
पण पुढे कधीतरी उद्योगपती होण्यासाठी
मिठाचा सत्याग्रह अभ्यासावा लागेलच ना

ते म्हणतात गेले ते तत्त्वशीलपणाचे
विष मिळण्याचे कारनामे आता तुम्हाला
आधी अटक होईल आणि मग
विचारले जाईल पिठले हवे की पुस्तक

कलमे खूप असतात हो वकीलही असतात
तितकेच त्यांचे अर्थही असतात
म्हणून काही तुम्ही सीमावाद
जोडू नाही शकत तुमच्या क्षणिक लहरीशी

तुम्हाला फुल स्वातंत्र्य आहे पण मर्यादेत
आणि वेडे न होता कोणत्याही तत्त्वासाठी
--- ००० ---

राग की राज

प्यार का राग सुनो रे
की
प्यार का राज सुनो रे
याचा छडा लावणे अवघड थोडेच
गूढ कसले नुसते शब्द
मुसमुसत्या दुःखात रंगून
लग्नासमारंभात भारताची
चिंता करत बसणे
म्हणजे नुसत्या तानबाजीवर
जिंकून नेणे मुष्टियुद्ध
हिंदुत्ववादी आणि कम्युनिस्ट
यांच्या एकाच खाणावळीतले

व्याकरण नका हो तपासात बसू
शिंका कधी शिस्तबद्ध टप्प्या
टप्प्याने करू शकतात का
सीरियल मर्डर
ओपन राहा येईल तसा येऊ द्या वारा
कवितेला ना उकडत ना थंडी वाजत

जखडून घेतलेले स्वप्नांचे सौदागर
खरोखरचे नाही होत फिदा
तिचा पहिलाच दिलखेचक
उद्गार असला तरी आधी कर्तव्य
मग प्रेम म्हणणारा

जो भी प्यार से मिला
हे म्हणायला ठीक आहे पण उद्या
जनताच म्हणेल कुणाची माय व्याली आहे
ब्लॅक मार्केटवर राज्य करायला
इतके नेते देते निवडून जनता
ते काय नुसते म्हातारे होऊन मरायला
--- ००० ---

कवितेचा अर्थ

कवीकडे खूप दोऱ्या असतात
आणि बोळा तो कवितेला बसवतो खुर्चीवर
मानाने पण तिला बांधत जातो करकचून
आणि बोळा ठेवतो कोंबून तिच्या तोंडात
तिची कशीही पटू दे ओळख
पण ती या खुर्चीवरच तिचे सौंदर्य
तिची उत्तेजकता तिची आश्वासकता
तिची अर्थवत्ता आणि मूल्यसमृद्धी
दाखवत राहील हे तो पाहतो

तिच्या सर्व पूर्वज
अशाच तर आहेत कित्येक खुर्च्या व्यापून

तिला महत्त्वाकांक्षा असेल दु:ख
प्रेम राग सूडही असतील
त्यांसहच ती असेल छटावान

एका पक्क्या अर्थाभोवतीच ती फिरेल
त्यातच खेळ आणि विभ्रम देईल
सर्व अवयव दर्शन घडवेल

तिला आवडत राहील
अर्थाने तिला बांधील असणे
--- ००० ---

अखेर

जुनी आवडती गाणी एकत्र करायचे राहून गेलेय
भूतकाळ बंद आहे त्या वयातले स्त्रीचे
दर्शन बंद आहे बंद आहे दाल का दाना वा ईचक दाना
आता सक्तीने फक्त रंग दिसत राहतील गोंगाटाचे
व्यापून टाकेल फक्त वर्तमान भूतकाळ नसलेला
भविष्यातले इंटरेस्टच घालवणारा निराश
समजूतदार करणारा अखेर कंटाळत नाइलाजत
--- ००० ---

पांदी

हं जात राहा पुढे
जा अजून हं
आता एक पांदी लागेल
तिच्यातून जा
पांदी नाही माहीत
मलाही नाही माहीत पण हो पुढे
या मोबाईलमुळे सांगता तरी येतेय
आता फांदी लागेल
म्हणजे फांद्या रे झाडाच्या
त्या डोक्यावर असतात त्याच
जात राहा मग वर ये हं
तिथे तुला गांधी पुतळा दिसेल
होय हा आहे प्रॉब्लेम
शहरात ते तीन आहेत
पुतळ्यांना नंबर नसतात वेड्या
तिथे मांदियाळी नावाचे दुकान
दिसतेय का ते बघ मग पुढे हो
घाबरू नकोस मी बरोबर सांगतोय

आता शेवटची संधी नावाचे हॉटेल
आहे बघ त्याला लागूनच सोंधी पान
आणि लगेच सिंधी क्लॉथ आहे बघ
जात धर्म समाज हे नाही रे
पुढे हो आता तुला दुसरा गांधी
पुतळा लागेल

आता जरा पुढे गेलास की
छत्रपती शिवाजी महाराज पुतळा लागेल
इथून पुढे कुठेही जायचे नाहीय
तिथेच वांधा रफू मार्ट आहे बघ
तोच माझा मित्र
त्याला माझा नमस्कार सांग
--- ००० ---

नकाशा

मस्का आणि मस्करी
यांचा काही नाही कोणत्याही
दारासमोरून जाताना जणू
ते गालिबप्रमाणे
आपल्या प्रेयसीचेच आहे
घुंघट असे रिकामे घट घेऊन
जाणार कुठे

जवळ नकाशा बाळगणारे
जातात एका बोळकांडीत
भयानक एम आर आय ला
ढकलावे आत आणि भूकंप झाल्याने
पळून जावे सर्वांनी
नकाशावाल्याची पर्वा न करता

उद्वेगाचे बोलायचे की क्रोधाचे
की प्रेमाचे असे बाळबोध कौशल्य
हत्तीवरून साखर म्हणत
फणा समजून पालीची तुटलेली शेपटी
मिरवणे होईल

व्हॅल्यू वाढ झाली का ते तपासत
निघालेले हमाल शेवटी
मुक्कामाला येतात
अभेद्य तटबंदीच्याच

एवढे समजल्यावर तरी
तीच तीच सफर कशाला
कोणत्याही टिंबावर राहूच नये नजर
केंद्रित
--- ००० ---

## उंटावर

उंटावर बसलेल्या गाढवासारखा
आहे त्याचा मूड हे कवीला माहीत असे
पण त्या उदासीतला विनोद न समजता
गंभीरपणे लिही तो कविता
उत्साहाने त्याची उदासी
अनेक प्रतिमांनी झळाळून टाके तो

त्याच्या कविता आवडूनच तर
त्याची प्रेयसी त्याच्या प्रेमात पडली होती
तिला त्याच्या उदासीशी देणेघेणे नसे
तिला प्रतिमांचा खजिना आवडे

हे हळूहळू त्यालाही कळत गेले
मग अधिकच आनंदाने लिहीत लिहीत
तो दुःख कवितांचा सम्राट झाला
त्याची राणी राहू लागली
त्याच्या दुःखाला वाहवा म्हणत
मग त्याला अधिकच बिलगून
--- ००० ---

आपोआप

मुक्त कवितेत मी घेणार आहे गझलेचे प्रेम
प्रत्येक कडवे असेल स्वतंत्र
आशयाच्या एकसंधपणासह भंगलेल्या जगाचे शास्त्र
हे कसे हाणून पाडावे याचा काहींना पडेलच विचार
वेगळे काही येण्याची गरजच काय म्हणून

मुद्दाम नाही आपोआप
दोन्ही बाजू फुल निष्पाप
--- ००० ---

व्यवस्था

व्यवस्था
हं तिचे काय
वाईट आहे
सर्व दु:खांची मुळे
हं
आरक्षण वाढायला पाहिजे
उलट ते पूर्ण बंदच व्हायला हवे
हे कुणीच नाही मान्य करणार
अहो सगळ्यांना पटते पण लोकशाही
हे पूर्ण चूक आहे ती हवीच
जाती आणि धर्म यांचे भेद
त्यांचे काय
ते फक्त घरात असावेत बाहेर नको
म्हणजे दोन्हीकडे तुमच्या मनासारखे
दंगली मोर्चे संघर्ष यांचा कंटाळा आला
हक्क आहेत ते
वेळ शक्ती उत्पादन वाया जाते
हुकूमशाही आपल्या रक्तातच नाहीय
पण देशात सर्वांची वृत्ती तीच आहे
कसे काय
एकमेकांवर अन्याय होणे बरोबरच तर म्हणतो आपण
आधी वर्षानुवर्षे अन्याय झालेले असल्याने
त्यामुळे राजकीय लोकांना फार महत्त्व देतो आपण
त्याचे काय
त्यांच्या ओळखीपाळखींना फार महत्त्व येते त्यामुळे
ते तर होणारच
वाली तेच त्यांचे उपकार हवेतच असे होते मग
जो तो आपापल्या माणसांचे फायदे बघणारच
याचा अर्थ अन्याय चालू राहणारच
ज्याची ताकद त्याचा जास्त फायदा हे तर होणारच
हीच व्यवस्था बदलायला हवीय
काही गरज नाही आहे ते बरोबर आहे
--- ००० ---

एवढे ठीक

अडवून ठेवता येताहेत म्हणून
नाही तर विचार मोकाट सुटले तर
आपण कोण कुठे आहोत हेही विसरायला होईल
परीटघडीचे व्यवहार
भांग पाडत राहण्यापेक्षा
भांग घेतल्यासारखे
उड्डाणपुलावरून सतत
फ्रॉईडची आठवण काढत
विखरत जातील देशोदेशी
कंगाल होण्याच्या सुखमय दिशेने

जगणे म्हणजे सगळी
सिनेमांची पोस्टर पाठ असणे
आणि मना सज्जना म्हणताना लाज वाटणे
सज्जन म्हणजे काय हे माहीत नसल्याने
अशी अवस्था उजाडेल आयुष्यात
राहते घर उजाड करत

मेंदू कसा चालावा
आणि तो कितपत कसा चालवता यावा
हे कुणी ज्ञानपीठ विनर नाही ठरवू शकत
त्याला अंधश्रद्धाच लागते चमत्कार म्हणायची

एक क्षण असतो दोन
विचारांच्या मध्ये
तो पकडून रिकामे कुठे राहता येतेय

भीती एकाकीपणा डिप्रेशन
यांच्यावर औषधे विचारांनीच तर काढलीयत
विचारांनी खुशही राहता येते हे किती ग्रेट
एवढे ठीक याहून जास्त उत्सुकतेचा धोका नको
--- ००० ---

शेवाळे

शब्द तुम्ही कसेही वापरा
तुम्ही भाषेतच येऊन पडता
शेवाळ्यात घसरलेल्याने
हात टेकावा तर हातही घसरतो तसे
तुमचे अंगण हे एक टोपण असते
तुमच्या असण्यावरचे

त्याच्या किल्ल्या असतात
एका स्ट्राँग रूममध्ये जिथे शिजत असतात
देशादेशांतले सावध संबंध
गल्लीबोळातला पाताळयंत्रीपणा वेगळा
तुम्हाला माहीत असावे लागतात
असंख्य पदार्थ आणि त्यांच्या
गुलामगिरीत असलेल्यांची यादी

तुमची शहरे अशीच चालायला हवीत
की कधीच कसलाही धोका असणार नाहीय
बागेतल्या बाकांवरच्या निवांत आठवणी
काढत नंतर मस्तानी पिऊन
शेवटी कंटाळ्यात गेला पाहिजे दिवस

काहीही नको असणे असे असल्याशिवाय
भाषाही नाही सोडणार आणि माणसेही मनातून
ती कामात आहेत वा संकष्टीत असतील
वा ऑलिंपिक वा स्थानिक राजकारण खूपच
टोकावर आले असेल अशा काहीही कल्पना
तुम्ही करू शकता

खरे तर तीही गरज पडू नये मेंदू जर
निसर्गाचा असेल तर भाषाही तशीच ना
त्यांनी भाषामुक्त होणे नंतर आधी
आपण निरोप दिलेला हवा शब्दांना
--- ००० ---

## राजीनामा

वेग म्हणजे मन
हे तर आकाश एकत्र
असण्याइतके स्पष्ट जसे
या पायावर तो पाय काय
किंवा त्या पायावर हा पाय काय

पाठलाग जर कधी
केलेलाच नसेल
तर देवाचे भय
बाळगतच जगावे लागणार

फोटोग्राफी खूप दर्जेदार
असली म्हणजे
सर्व गुन्ह्यांतून सूट मिळेल
असे समजणे म्हणजे
सगळेच अनिश्चित समजून
अन्नत्यागच करावा लागेल

नेहमीच्या विचारांना
तेराव्यात घातल्याशिवाय
नवे घाट कुठे सापडणार

संगमावर सर्व पवित्र आहे
असे समजून
आपण पूर्ण हक्कसोडपत्र
देऊन टाकावे निर्मात्याला
आणि वापरू द्यावे आपले कथानक
नावासह म्हणजे नाचक्कीचेच होणार ते

त्यापेक्षा कधीही प्रसिद्धी हा शब्दच टाकून
राजीनामा देता यायला हवा
--- ००० ---

## प्रबोधन

तुमचे आधीच सगळे
ठरलेले असल्याने
तुम्हाला समाजाचे भय बाळगणे भागच आहे
समस्या आणि निराकरण माहीत असलेले गुरू
तुम्ही असल्याशिवाय
तुमच्या महारुद्राला कोण थांबेल

भीत भीतच तुम्हीच समाज
तुम्हीच करुणाकर तुम्हीच
भविष्यनिर्माते
असे असावेच लागेल
मग तुम्ही गुलाल
टाकलेल्या भाताचे उपचार
करू शकता बिनधास्त कितीही

काही घडतेय असे दाखवता येईलच
नाही काही घडले तरी
आपण एक आहोत ही भावना
मनाने उत्तेजक
मिठीत राहायला पुरेशी होईल

दु:ख भोगताना दुसरे
काहीच नाही सुचू शकत
जसे संभोगक्रियेत म्हणजेच
यातून मोकळे असतानाच तुम्ही रचू शकता
तुमच्या अचल प्रेमाचे स्थापत्य

हा प्रदेश तुम्हाला सोडता नाही येणार
जे धाडसाने बाहेर आहेत
त्यांचा मत्सर करा वा हेटाळणी
ते बाहेरचे लोक अप्रस्तुत आणि आपमतलबी आहेत
असे म्हणत राहा एकत्र बसून एक प्रबोधन म्हणून
--- ००० ---

मखर

तुम्ही स्वत:हूनच जाऊन बसला आहात
प्रिय तुरुंगाच्या मखरात
आता कोणत्याही कलेतले
प्रवाह आणि प्रयोग
यांना तुम्ही मुकलेले आहात

आता जगण्याचे एखादे
उदात्त उद्दिष्ट
आत्मसात करावेच लागेल
साथीदारांचा समूह
वाढवावा लागेल
भेटीगाठी घ्याव्या लागतील
गावोगाव जातयेत संमेलने
कवितावाचने घ्यावी लागतील
आणि लागतील अनेक सेल्फी
नात्यांत खात्री टिकवणारे

चेहरे गंभीर ठेवावे लागतील
सहजच अत्यंत क्रांतिकारक
असल्याप्रमाणे नेतृत्वाला सतत
आदर साहाय्य कृतज्ञता
द्यावी लागेल

खूप पुस्तकसंचय बऱ्यापैकी
वाचन करत राहावे लागेल
सतत त्याच भिंगरीत राहात

काही उचलणे काही दबवणे
हे करावे लागेल निरलसपणे
मुख्य म्हणजे निस्पृहपणे त्यागाने लढ म्हणत
मी आहे म्हणत कृतकृत्य वाटत
म्हातारे होता यायला लागेल
--- ००० ---

भर शहरात

कोणत्याही कारणाने घडले ते घडले
म्हणत आपण सामोपचारा ऐवजी
सूक्ष्म आक्रमणच केले सुरू
जणू आकांक्षाच होती यातून
खुणावणाऱ्या ठिणग्यांची आणि ज्वालांची

हळूहळू वस्त्रांचे विषयच बंद होत गेले
आणि मनांचे गुप्त कप्पे सरळ सरळ
नि:संकोचच होत गेले तुझ्या बातम्या जणू
माझ्या मनातूनच उद्भवू लागल्या
आणि तुझा मृत भूतकाळ माझ्या
भूतकाळासह विलीन झाला
आपल्या स्मित हास्यात

स्पष्टच दिसू लागले ते असे की
आपण एकत्र काढत असलेले चित्र
एका बाजूला पूर्ण व्हावे याची तुला
अधीरताही होती आणि ते कधीच पूर्ण होऊ नये
याची सततची आतुरताही

आपले बटर चिकनचे समारोह
झाले नंतर रूपांतरित
माझ्या कवितांत जणू
आपणच भक्षिले होते एकमेकांना

भर शहरात होतो आपण निर्भयपणे अदृश्य
पुन्हा अवतरण्याची शक्यताही धोक्यात यावी
अशी तुझी अतूट उत्कटता
झाली माझ्या हृदयाचा उष्ण प्रवाह

आता विचारही नव्हता शाश्वतीचा अमोघ सावलीत
तुझ्या आभासी प्रावरणांच्या माझ्या प्रतीक्षेतल्या
--- ००० ---

निवांत

मी निवांत पडून आहे

आठवते

पूर्वी पोस्टमन येत असे घरोघर

आता कळतही नाही एखादे मासिक

मी ठेवून दिले आहे हातातले पुस्तक

शाळेतली
कॉलेजातली
मनोमन प्रेयसी
उगीचच

पावसाळी हवा असेल
वा संध्याकाळ

माझ्या हस्तरेषा
मी आठ वर्षे अभ्यासल्या

कशातही घेतले इंटरेस्ट
तरी तो झाला या हवेतला चहा

बदली झाली तेव्हा तिथली सुरुवात
महालक्ष्मी दर्शनाने केली होती

आता स्वत:चे असणेही
गृहीत नाही धरत
--- ००० ---

आ आणि नि

आमंत्रणापेक्षा निमंत्रण
हे अधिक आग्रहाचे अधिक आपुलकीचे
हे समजल्याने खूप वर्षांचा
डोक्यातला गोंधळ मिटला खरा पण आता
आग्रहापेक्षा निग्रह अधिक कट्टर समजावा का
की हे दोन वेगळेच प्रकार समजावेत
असा एक नवीनच विषय जोमाने पुढे आला आहे

उधारउसनवारी करत करत भाषा
नेली वाढवत पण निदान काही हजार
शब्दांच्या तरी व्युत्पत्ती आणि त्यांचे
नेमके अर्थ नाही माहीत कुणालाही
वापरून वापरून जे समजत वा खरे
वाटत आले तेच तसेच वापरणे चालू आहे
स्वत:ला वा इतरांना प्रॉब्लेम न येता

जाऊ देत ना मुळे सगळी हवीयत कशाला
वापरण्यातच ठरत जाऊ देत अर्थ
वा बदलत जाऊ देत
वा नवेच येत जाऊ देत

कुणी चुकीच्या अर्थाने वापरत असेल शब्द
तर आधी त्याला माफ करावे
आणि नंतर त्याला वाटणारा अर्थही
समाविष्ट करून घ्यावा भाषेत
प्रत्येक शब्दाची अर्थवलये
अशी वाढत जावीत

भाषा स्थिर असूच नये
आणि यातूनच भाषा
नसण्याची शक्यताही डोक्यात उगवावी
मुक्ती निर्वाण इहवादी असण्याचा हाच मार्ग आहे
--- ००० ---

विसर्जन

अफवांवर विश्वा
साला तडा जाण्यापेक्षा
मी सत्ताविसाव्या वर्षापासून
पुन्हा जगणे
पसंतही करेन
आणि मुख्य म्हणजे
त्यानंतरच्या आठवणीही
काढत नाही बसणार

एका एका शब्दाची प्रतिमा
करत बसायला मी काही
एखादा शिंपी नाही
आणि मुख्य म्हणजे
मी बोलेन ते सगळेच
शास्त्राच्या भाषेपासून

नुसते लांब राहून काय
उपयोग होताच कामा नये तरच
ती खरी हौसेची सजावट

माझा विरोध आहे असे नाही
पण आहे तेच
अधिक प्रभावी करण्यात
मी आयुष्य वाया
नाही ते सोपस्कार नकोतच

कविता म्हणजे अमुक हे
विसरूनच जा म्हणायच्या ऐवजी
माझ्याच स्मृतीची मला काळजी

वाटलीच पण विसर्जनाला
वाटली डाळच हवी
--- ००० ---

अमूर्त चित्रात जर अमुक वस्तू, आकार वा दृश्य असे ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तरी अमुक विचार वा अनुभव तरी ओळखता येण्याची काय गरज आहे ? अमूर्त कविता का असू नये ?

सुसह्य

सुसह्य होण्यासाठी गुरू लागेलच का
याचा शोध आपला आपण घेताना मुरलेले
लोणचे घेतले लागल्यास कॉपी मारायला
हसून हसून पुरेवाट की वाट लागली
याचा विचार न करता सरळ चोरून
एफबीवर कृष्णमूर्ती ग्रुप पाहताना स्वत:ची
तुटलेली बटणे पाहून घेतले समजून की या अंधारात
वैचारिक काही कामा वा धामाचे बघा वा विश्रामधामाचे
परिपत्रक काढा निजधाम हा शब्द मात्र
जाऊ द्या पर्यायात

असंबद्ध म्हणजे अमूर्त
असे समजून तुम्हीही करा ना
प्रयत्न वाळूचे कण शोधण्याचा
नुसतीच हुशारी आणि उपरोध
उलट बळकटीच देतील
या विनासंगीत यात्रेला
दागिन्यांनी मढे
मढवण्याची आस कुणाचाही घातच

उघडेल तुमची पंचेंद्रिये खुश तर
समीक्षा सखोल याला काहीही
सर्जक मूल्य म्हणताना ती
तुटलेली बटणे शोधा आधी

निरर्थकतेचा रंग अमुक असे काही
सापडलेलेच नसल्याने कोणतेही चालतील
मानवी व्यवहार त्यात उडदामाजी नकोच प्रत्यक्ष
खा उडीदवडे इथली चटणी मस्त असते
--- ००० ---

पारा

निकॅनोर पाराला माहीतही नसेल
इथे ज्ञानमंदिराबाहेर
फाटक्या कपड्यांत उभी असलेली
अकरा कोटींची माता
खाता खाता टीव्ही बघत
जेवण्याचा हा जमाना आहे
तेवढ्यात मोबाइल वाजला तर
घेऊन जावे तो कडेला आणि दोन मिनिटांनी
ते तुमचे तुम्ही बघा म्हणून येऊन बसावे
आणि भाजीला चवच नसल्याची चिडचिड करावी
असा हा जमाना आहे

इथे सर्वच शूर वीर लढवय्ये आपापल्या विभूतींचे
मावळे सावळे कावळे जरासे बावळे
पण सदोदित कावलेले दुर्गतीने त्रासलेले
सौजन्य हरपलेले एकूणच परिस्थितीमुळे

हे सह्याद्रीचे कडे भीमेचे सुपरमॅन
कृष्णेचे चतुर हे जागतिक
विक्रम करणारे मोर्चे
हे डावपेचांचे कारखानदार
विश्वासू घातकी प्रेमळ द्वेष्टे
स्वगौरवात मश्गूल
स्वरौरवात मश्गूल

जाती धर्म पक्ष यांत विभागलेल्या
संस्कृतीचे पूजक शांततेचेही कवी
असे खूप काही नाही माहीत पाराला
हे तो जाणतो आणि ती जाणही देतो तो टाकून
आणि सर्व मानवजातीसाठी लिहितो
नकविता
सर्वांना आपले म्हणणारी
--- ००० ---

स्वर्ग

तुमच्या रटाळ भाषणांनी
सजवू पाहाताहात तुम्ही संध्याकाळ
तुम्हाला वाटतेय तुमच्या डोक्यांत
उगवल्या आहेत काही नव्याच प्रजाती

तुम्हाला वाटतेय मौल्यवान
म्हणावे असे पताकांचे साम्राज्य
तुम्हीच करणार आहात प्रस्थापित
कंटाळलेल्या हवेत

तुम्ही सोडून इतर सर्व
शून्याकार केविलवाणे क्रूर
परभृत खोटारडे मतलबी आहेत
यावर तुम्ही ठाम आहात

तुमचेच जगणे सगळे नाही जगत
हजार प्रकारांत हजार समस्या आहेत
तुमच्या अशा वेगळ्या बांधवांना तुम्ही हेटाळताहात
त्यांच्या जगण्याला तेच जाणार ना सामोरे तसे तर

तेही म्हणताहेत तुम्ही न्यूनगंडाला मूल्य म्हणताहात
अभावाला समृद्धी म्हणताहात
दु:ख आणि वेदानांना दागिने म्हणताहात
सहन करण्याला परिपक्वता म्हणताहात

हे सर्वांचे सारांश दिशा दाखवतील
प्रबोधन करतील निराकरणे देतील
शांतता समता आणतील
एकच मेंदू एकच जगणे असा स्वर्ग आणतील
--- ००० ---

बाहेर

एक फसवणुकीचा संदेश

की खोटेपणाचा

की विश्वासघाताचा

की दुर्लक्ष करून निघून जाणारे मांजर

की बेफिकिरी की बेहोशी की नाइलाज

ऊन सावली पडून जाते निघून

पण हे एवढेच होते का चित्र या काळाचे

सगळे प्रभाव बाहेरून आत

द्यावे टाकून बाहेर

--- ००० ---

गारवा

अरे वा हे नवीनच येतेय लक्षात
मेंदूतले ठिकठिकाणचे शब्द वाक्ये

छान ही सायकलची सुटलेली चेन
चिंता नाही
हा मत्सरी मित्राने दिलेला नकार
आणि अनपेक्षित वेडे ठरल्याची भावना
छान शिकवणाऱ्या सुंदर शिक्षिका बाई
नोकरीत दिली गेलेली तपासणी
अधिकाऱ्याची अवघड भूमिका
घरात कुणीही कुणालाही कधीही कसलीही
धमकी द्यायची नाही या तत्त्वासाठी पत्करलेला धोका
एका शिखाने सांगितलेले भयानक भविष्य

आणि सध्या चहाची वेळ असणे
कविता लिहावीशी वाटणे
आणि आता हळूहळू आवरते घ्यायला हवे
हा विचार आणि संपवायच्या कामांचे अग्रक्रम

सगळे एकत्र पाहिल्यावर वाटतेय
मी उभा आहे मेंदूच्या बाहेर
हवेतला गारवा म्हणजे मीच आहे जणू
--- ००० ---

अस्तित्व

अगदी जन्मल्यापासून म्हटले तरी आपल्याला ओळखणारे किती
समजा एक लाख पण मालिकांमधल्या पात्रांना किमान एक कोटी
जेवढे ओळखणारे जास्त तेवढे अस्तित्व अधिक खरे म्हणजेच
ती पात्रे आपल्याहून खरी असतात पण आपण स्पर्श कुठे करू शकतो त्यांना
तशीच तीही नाही स्पर्शू शकत आपल्याला त्यांच्या दु:खांनी आपण
कळवळतो आपली दु:खे त्यांना कळतही नाहीत त्यांचे पुढे काय झाले
हे ना आपल्याला कळेल ना आपले त्यांना त्यांच्या लेखी तर आपण
जिवंतही असणार नाही ती साकारणाऱ्या नटनट्याही नसतील जिवंत
--- ००० ---

अजून किती वेळ

आईवडिलांची मृत्यूनोंदपत्रे ठेवलेली आहेत जपून
काही सत्यप्रतींसह एका फायलीत
पाऊस खूप होऊन गेला म्हणतात
रस्ता दुथडी भरून वाहात होता
तेव्हा मी झोपलेलो होतो

आता माझे डोळे उघडत का नाहीयत
की अंधारच पडलाय
माझ्या अवतीभवती
काही छोटेमोठे प्राणी किडे असावेत
मला त्यांचे स्पर्श जाणवताहेत
त्यांना विचलित करून उपयोग नाही
मी आहे इथे हेही त्यांना कळू नये
अन्यथा आक्रमण करणे त्यांना भाग पडेल
एखादा विषारी नागही असू शकेल

माझी आई सोळा सोमवार करणारी शिवभक्त होती
हे त्याला कसे माहीत असेल
शिवशंभो त्याला सांगतील का
की बाबा हा आपला माणूस आहे
त्या व्रताच्या काळात माझे वडीलही
तल्लीन असत भक्तिभावात

अजिबात हलून चालणार नाही
निश्चल राहावे लागेल
अजून किती वेळ असेल हा अंधार

मनही निश्चल ठेवावे लागेल का
त्याच्याही हालचालीने धोका होईल का
आणि माझ्या मनात तर
भक्तीचा लवलेशही नाहीय फक्त भीती आहे
--- ००० ---

सावली

तुझी सावली येते ती सळसळतच
मला वाटते नाकातोंडात
पाणी जातेय आणि मला
पोहता येत नाहीय पण
तुझ्या पायांच्या पालवीत असतो दिलासा

तुझे अचानक असे मनात येणे
माझ्या पुस्तकांची पाने
सोडणारे असते कबूतरांसारखी हवेत
हातात आली तर मऊ उडाली तर
शीर्षबिंदूपर्यंत जग एकच करून टाकणारी

एकदा कळल्यावर मला माहीत असते
या खेळाला नियम नाहीत
आता कोणत्याही दगडांना स्पर्श केले
तरी ती तुझी शिल्पे असतील
आता असंख्य सावल्यांचे संगर असेल
रचू शकणारे प्रचंड हिंसक कहाणी
तुझे आकाश वारा होऊन
उधळून टाकेपर्यंत
आपले ओळखीचे सर्व संवाद

कितीही व्यस्त असूनही तुझी सावली
सतत असते माझ्या सावलीच्या वेधात
क्षणार्धात पूर्ण कादंबरी घडवून
तू अदृश्य होतेस पण तुझा तो सहवास
असतो माझे पूर्ण मन
पालवी पालवी करणारा

हे सगळे माझ्या सावलीत अंतर्भूत
असणारच हे ओळखूनच
तू एक स्मित देतेस आणि मगच जातेस
--- ००० ---

ठिणग्या आणि जाळ

मध्यमेखाली तळव्यावर
हृदय आणि मस्तक
या दोन रेषा छेदताना दिसल्या एकमेकींना
बाप रे हे तर महाभयानक शॉर्ट सर्किट
वय चोवीसच्या आसपास
मेंदूत ठिणग्या आणि जाळच

हे काहीच न बोलता
फक्त
जरा अवघड दिसतोय काळ
असे म्हणताच तो
घळघळा रडूच लागला

असेल योगायोगही
हा योगायोग पुस्तकात दिलेला आहे
म्हणजे योगायोगाने
हा नियम तर नसेल

मी त्याची समजूत घातली
हे काही काळापुरते असते
हे सांगितले

तो म्हणाला
मी वेडा होण्याच्या बेतात आहे
आत्महत्येचेही विचार येताहेत

मग मी त्याला अबसर्डिटीचे सांगितले
आयनेस्को बेकेट वाचायला सांगितले
जरी माझ्याकडे याचेही पुरावे नव्हते

ना संकटांचे शास्त्र ना उपायांचे
हे समजणे हाच उपाय हेही सांगितले
--- ००० ---

उपासना

कवितेजवळ असायला  हवे
दु:खाचे भरभक्कम लगेज
ती दु:खपूर्ण असायला हवी
दु:खाचा प्रगाढ अनुभव देणारी
ती दु:खाने दु:खाला बळकट करणारी हवी
दु:ख जोपासायच्या पद्धती तिने द्यायला हव्यात
सद्गदित करणे रडू आणणे सहानुभूती कीव वाटणे हवे
मंद प्रकाशात भिनायला हवे कवितेचे मादक दु:ख
हे आपलेच आहे हेच तर जगणे
हेच तर जीवनदर्शन असे व्हायला हवे

तिने निचरा करायला हवा विचारांचा थकवायला हवे
चेहरा काळवंडून टाकायला हवा
दु:खाशिवाय कविता असेलच कशी
दु:ख हीच कविता तेच त्या विषाचे तीर्थक्षेत्र
असायला हवे तिने अनेक
दागिने आणि चमत्कृती लेवून यायला हवे
आत सुंदर दु:खाचा लुसलुशीत गर मिळायला हवा

भावनेशिवाय कविता नाही आणि सर्वोत्तम
तीव्र भावना कोणती असणार दु:खाचीच ना
कवी हळवे असतात त्यांना दु:ख खूप असते उपलब्ध
मग ते म्हणतात दु:खात बुडवून खून करायचा
प्रयत्न न करणारी कविता ही उथळ असते
तिला खोली नसते ती पृष्ठस्पर्शी
खेळ करते नुसते उडाणटप्पू

कलेची एकूणच भरभराट होऊन लोक सतत
दु:खाचे आदी झाल्याशिवाय संस्कृती घडणारच नाही
हळवे भावनाशील ताणलेल्या चेहऱ्यांचे राहिल्याशिवाय
जे चालू आहे ते रद्दड जगणे पुढे कसे नेता येईल
हा बोध नव्हे ही सत्याची उपासना आहे
--- ००० ---

पुनर्जन्म

आता हा आहे हाच माझा एक पुनर्जन्म आहे
असे कुणी दाखवून दिले तर ठेवेनही मी विश्वास
ते नाही महत्त्वाचे मला हवाय माझा पहिला जन्म
तो जेव्हा केव्हा होता तो
तो कशाच्या आधारावर कशातून का झाला होता

आहे हाच पहिलाही समजायला मी तयार आहे
पण यात मी घडलोय असा की
पुनर्जन्मावर नाहीय माझा विश्वास

आणि यानंतरही झाला समजा माझा पुनर्जन्म
तरीही मला कुठे कळणार आहे ते
त्यामुळे प्रत्येक जन्म पहिलाच धरावा
हेच शहाणपणाचे आणि डोक्याला
फुकटचा त्रास टाळणारे ठरेल

पण एक पुढचा पुनर्जन्म चांगला मिळावा म्हणून
या जन्मात मी चांगला वागेन असे काही नाही
कारण खरे तर चांगले म्हणजे काय
हेच मला माहीत नाहीय आणि दारू वा स्त्रिया
ही यंत्रणा काही मी स्वत: माझ्या निवडीने
माझ्या मर्मदृष्टीने बनवून स्वीकारलेली नाहीय
हेच असे नाही काहीही जे काय घडते
आपल्या हातून ते पाप असते
असे मी समजतच नाही किंवा ते मला कळतही नसेल

हाच नियम सर्वांनाच असणार हे खरेच आहे
उद्या एखाद्याने संतापाने माझ्या चिंधड्या केल्या
तरी ते पाप वगैरे नसेलच

घडणारे सगळेच ओके म्हटले तर मग काही घडले
असे तरी कशाला म्हणावे हाच आहे प्रॉब्लेम
--- ००० ---

गार वारा

कोणत्याही वस्तूशिवाय
तुमच्च्यापर्यंत पोचावे
असे वाटले तेव्हा दुपारचे
दोन वाजले होते
ही काही काहीही आठवण्याची वेळ नव्हती
उन्हाचा सुम्म आवाज
न बोलता कापत होता
अपयशी प्रेमाचे अप्रस्तुत घटक

मला हेच म्हणायचेय
अमुक केले म्हणजे
संध्याकाळ लौकर होते असे काही नाही
उलट तुम्हाला मळमळण्यापूर्वीच
प्रवास थांबवून परागंदा होता यायला हवे

संकटात सापडलेल्यांना मदत करायला
तुमचे शूटिंग आधी पूर्ण झालेले हवे ना
अन्यथा तुमचे असणेच होऊ शकते एक ओझे

उगीचच तत्त्वज्ञान बोलण्यात काही अर्थ नाही
शिवाय माझ्या मते अध्यात्मात
पंख तुटलेल्या हुशार पक्ष्यांना स्थानच नसते
अगदी हौसच असली तर तत्त्वज्ञान
भिजत ठेवा एका पातेल्यात

पोचणे म्हणजे काय
तर माझ्या मनातले तुम्हाला समजणे
ते तरी कशाला जर कुणालाच
काहीच कळत नसेल तर

कळणे म्हणजे ताण आणि गोंधळ नसणे
त्यापेक्षा सरळ गार वारा खाल्लेला बरा
--- ००० ---

परिपक्व

गेल्या तीन वर्षांतल्या घटना पाहिल्या
तर सध्याच्या मार्केटच्या प्रतिक्रिया
या परिपक्वच आहेत
असे म्हणावे लागेल जरी
एका विभागात भय आहे तरीही
आठदहा टक्के खाली येईल तेव्हा घ्या बेलाशक
खेळायचे तर आहे पण सांड
अंगावर येता कामा नये

हे म्हणजे जगणेच सोडणे होईल
एसीत बसून हमखास काही म्हणणारेही
भले भले गारद
व्हायची वेळ इथे आलीच होती
याचा अर्थ वॉशिंग मशीन वाईट
किंवा मिक्सरमुळे कॅन्सर होतो
असे काही नाही तुमच्या घशातला
घोगरेपणा घालवण्यासाठी तुम्ही
बस नाही जाळू शकत

भरभराट हवी आहे तर
रस्त्यावरून महालात गेलेल्यांकडे बघा
हे आपले काम नाही हेच असेल
मुळात तर जगण्याचे तत्त्वज्ञान नका सांगू

ही अशी बांडगुळेच करतात
सामान्यांचे जगणे हराम
असे मत असू शकते तुमचे मग घ्या
जग बदलण्याचा कार्यक्रम हातात

पण म्हणजे तरी काय मने
न बदलता स्वर्ग अवतरणे म्हणजे काय
--- ००० ---

## हत्ती

पलिकडे दोनचार हत्तींची प्रेते पडलेली
इकडे तीन उभे तिकडे चार उभे
लहानमोठे निश्चल डोळे मिटून
जणू पूर्ण निसर्गार्पण अब
जो होगा सो होगा

ते आजारी आहेत हेही त्यांना कळत नसेल
त्यांच्या सर्व शक्ती करकचून
आवळलेल्या आहेत
त्यांना ताप असेल का
त्यांचे अंग दुखत असेल का

आता पशुवैद्य तपासताहेत
यावर असल्यास औषधे देतील
अन्यथा प्रयोग करतील

काय करताहेत ही माणसे
कशासाठी यांचाच तर हात नसेल
हे असे होण्यात
अवाढव्य दु:खाचे परस्पर जगणे वाढणे

डोळे बंद करण्याने आपल्याला बरे वाटतेय
की डोळेझाक करायचीय की डोळे
उघडे ठेवायचे त्राणच नाहीय

आपण इथे कुठे उभे आहोत
प्रचंड रथयात्रेत सजूनधजून वैभव दाखवणारे
ते आपणच होतो का

दिवसरात्र आणि उजेडअंधार येतजात असणार
चार बांधव तिकडे पडलेले आहेत ते का
हे दु:ख आपल्याला कळायचे बंद होऊ शकते का
--- ००० ---

बातमी

पावसाळी पहाटगारठा
नि:शस्त्र आणि मश्गूल
त्याच्या एकाकी उपद्रवक्षमतेत
म्हणजे मलाच मीच
बसून राहणारा दोन दोन तास खुर्चीवर
एकटक पाहात बंद टीव्हीकडे
चहा हवासा वाटत पण जाऊ दे
म्हणत प्रचंड ताणलेल्या शेवटच्या क्षणात
शिंका सुरू होण्याची वाट पाहात अटळ

काहीही घडू शकेल
घटनांच्या दारावरची बेल वाजली
तर टाळता नाही येणार
अंधाराचे धूड
असंख्य वर्षांच्या बातम्या
पसरताहेत बिस्किटांच्या आकारांत

त्यांचा नाहीय काही प्रॉब्लेम या क्षणी
मी असणे हीच आहे जणू एक बातमी
--- ००० ---

स्थिर

या छोट्या कवितेला आवाज नको आहे
तिच्या जिभेवर फोड आहे ठसठसणारा
आणि तिची भाषा आहे समृद्ध
स्थिर चित्रातल्या फुलांसारखी

तिला व्यक्त करायचे आहे
तिचे बंदिस्त असणे
फुलांच्या शांततेत
--- ००० ---

फसलेल्या कविता

शिळ्या मनातून पाहिलेला सूर्योदय
माहीत असलेल्या विचारातून सुरुवात
कसे जगावे याचे ताळतंत्र
अन्यायाचे परिमार्जन
क्रोध वा सूड वा दिलासा
वा आश्रयदायी
मालगाडीच्या सुखद कल्पना
असंख्य वस्तूंची रेलचेल करून कंटाळा
आणणारी वा संगीतमय लयदार होत हरवणारी

जग वाईट कशामुळे आहे हे
वा नकारात्मक वा सकारात्मक
कवीचे दु:ख कवीच्या आठवणी
वा कवीचा सेक्सानंद
माहितीने भरून चकित करत
अंधळी होणारी भूलभुलैया
घडवत आत्मतुष्ट होणारी

कुठे ना कुठे थांबून राहणारी

वाचकांनी मला खूप दिलेय
मी तृप्त आहे म्हणणारी
टाळ्यांसाठी हपापलेली
कमी लाईक्समुळे नाराज होणारी
आपापल्या कंपूचा विश्वास बाळगणारी
सर्व माणसांसाठी नसलेली

हेतूपूर्ण दिशा पकडणारी
सारांश असणारी विचारांनी
समजणारी कवितेबाहेरचे
विश्व न सुचवणारी श्रीमंत असून
ठरलेल्या छोट्या अर्थामुळे खंगलेली
--- ००० ---

योग्य

अहो लोकशाहीची हत्या झाली
हे बरोबर आहे पण कुणी केली
प्रत्यक्षात असे नाही तसे घडले
फूटेज काय दाखवते ते बघा ना
हे असे करणे जनहिताचे नव्हते
मुळात तुम्ही असे केल्यामुळेच
लोकांचा संताप अनावर झाला
असे कधी घडले होते का ते
ज्येष्ठ लोकांनी सांगावे जरूर
सांगावे अशी हुकूमशाही कुणी
गाजवली होती पूर्वी दोन्ही बाजू
आपापली बाजू मांडतील
जनता बघते आहे सत्य कळेलच
असे जनता काय ठरवू शकणार
कायदा परंपरा सगळेच विचारात
घ्यावे लागेल तसे तर सूर्य बंद करून
तुम्ही निऑन दिव्यांचे राज्य आणलेत
हेच मुळात घोडचुकीचे होते हो पण
ते का केले हेही बघा ना ते असे असल्याने
लोकांचा त्रास घालवण्यासाठी ते तसे
करणे अत्यावश्यकच होते आणि तुम्ही
नव्हते का अचानक वीस कापड कारखाने
बंद करून त्या ऐवजी लोकांनी कांदे
जास्त खाणे कसे हिताचे आहे हे सांगितले
लोकांना असे दडपले तर त्यावर आम्ही
आवाज उठवणारच आम्ही कुणालाच
घाबरणार नाही घाबरत कुणीच नाही हो
योग्य निर्णय हे व्हायलाच हवेत योग्य
गोष्टींना आम्ही पाठिंबाही देऊ पण
चुकीला माफी नाही
पूर्ण दिवस शिवाजी पार्कवर वाद घालू यावर
घेताय का आव्हान
--- ००० ---

मॉडेल

विश्व तयार करतानाच
अमुक असे करता आले असते
म्हणजे आता जे कार्बन आणि प्राणवायू
यांचे प्रश्न येताहेत ना ते आले नसते
असे एक हुशार माणूस म्हणाला तर दुसरा
म्हणाला हे म्हणजे
बापाला --- ला शिकवणे झाले
यावर हे विश्व मुळात
बिनबापाचे असताना असे तिसरा म्हणाला

कोट्यवधी टन पाणी उचलून वर
न्यायचे आणि त्याचा ठिकठिकाणी
पाऊस पाडायचा हे काय
विचाराशिवाय ठरले असेल का
असा पहिल्याचा प्रश्न होता

आणि मग वनस्पती किडेमकोडे
यांचे काय करायचे दुसऱ्याने विचारले
अरे अनावश्यक काही ठेवायचेच नाही ना
पूर्ण मॉडेलचाच पुनर्विचार करायचा
पहिला म्हणाला आवश्यक म्हणजे काय
तिसऱ्याने विचारले

याचा एकच सर्वोत्तम पुनर्विचार
होऊ शकला असता दुसरा म्हणाला
तो म्हणजे हे निर्माण करायचेच कशाला हा

मग एका टपरीवर ते चहा प्याले
निवृत्त होते जाताना एकाला भाजी तर
दुसऱ्याला दूध न्यायचे होते तर तिसऱ्याला
कटिंगला जायचे होते
--- ००० ---

धोका

एखाद्या सूर्याने शहराच्या भर चौकात
दिवेलागण झाली म्हणून माझा आता
प्रेमावरचा विश्वासच उडाला असे म्हणण्याचे
क्षण सारखेच कसे येत राहतात

अपयशाची कारणे शोधत
जात राहतील आणखीही वर्षे
विहिरी तलाव पुलाव

या देवाच्या उत्सवात
विचारांनाच विचारगंगा म्हणावे म्हणजे झाले
--- ००० ---

ओळी

खूप ओळी पुसून टाकल्या
कारण नकोच होते असे काही
हे असे आहे आणि ते तसे आहे
अशी अक्कल शिकवणारे

फक्त असणारी कविता
न येता
मलाही नकळत
येते सांगणारी कविता

जणू माझा अनुभव
व्यापू शकतो प्रत्येक मेंदू
असा हा माझा माज
पाहून ओशाळतो मी
--- ००० ---

मृत्यू

झोपेत म्हणण्यापेक्षा
थोडी जागच असेल ती
तीत लिहिली गेली होती
ती कविता पण
सकाळपर्यंत ती नष्टच झाली

खरे तर जगातली
ती एक अति महत्त्वाची होती
कविता डायरेक्ट क्षितिज
ओलांडून नंतर
मी झोपलो आहे यातूनच
मला बाहेर काढणारी

मला अनेकदा वाटे
कोणतीही कविता
हजारोंतली एक
असणे याचा अर्थच
काहीही न घडणे अणि
झोपेत सगळे विसरून जाणे

एकच एक कविताही
असायला हवी
जगातल्या सर्व
विसरल्या जाऊ शकणाऱ्या
कवितांचा नजराणा

मला स्पष्ट दिसलेले होते
( जो माझा भ्रमही असू शकेल )
कवितेची जान तिच्या स्मृतीत नसते
ती विस्मृतीत नष्ट होऊनच देऊ शकते
जीवदान शब्दांमागच्या मृत्यूला
सारांश जे गेले ते गेले छोड दो
--- ००० ---

तुम्ही आणि मी

तुम्ही जेव्हा कविता लिहिता
तेव्हा काही वस्तुस्थिती असते आणि काही प्रतिमा
असतात आणि मी लिहितो तेव्हा
पूर्ण वस्तुस्थितीच प्रतिमामय असते

तुम्हाला वाटते मी फक्त वस्तुस्थितीच लिहितोय
आणि मला वाटते तुमच्या प्रतिमाही
फक्त वस्तुस्थितीच आहेत

आपण एक समझोता करू या
मी तुमच्या वस्तुस्थितीला प्रतिमा म्हणेन
पण तुम्ही चिडायचे नाही आणि
तुम्ही माझ्या वस्तुस्थितीला फक्त
वस्तुस्थितीच म्हणा मीही चिडणार नाही

ही सगळी फक्त आपली मते आहेत
असे म्हणून आपण हे हसून सोडून देऊ
--- ००० ---

संमोहन

सत्यच असते समोरचे असे नाही
आपल्याशी जो आत्ताच बोलून गेला
तो तोतया होता असे आपण म्हणू शकतो
सिद्ध कोण करत बसणार आहे
आपण ज्या शहरात फिरतो आहोत
ती मुंबई नसून लोकांना
संमोहित केल्याचा हा परिणाम आहे
असेही म्हणता येते
टीव्हीवर आपल्याच विरुद्ध बोलणारे विद्वान
पैसे देऊन आणले जातात
त्यांना नामोहरम करण्यासाठी असेही
मी जसे फक्त खरे बोलतो
तसे कुठेही नाहीय हे मुख्य असेही
--- ००० ---

सिनेमा

नेहमीच मी पोचण्यापूर्वीच
सिनेमा सुरू झालेला असतो
रिकाम्या बाटल्या फिरू लागतात
माझ्या अवतीभवती
आणि आपली प्रतारणा झाल्याच्या
भावनेतले व्यग्र माझे पाय
आपटू लागतात
रक्ताळ दगडावर

असेच काही घडत जाईल
आणि आपण केलेल्या प्रतारणेमुळे
इकडे घोंघावणारे अजगर
बातम्या पसरवतील कानाकोपऱ्यात
आपले आरसे भंगल्याच्या
तेव्हा तरी हेही नको आणि तेही नको
असे म्हणता यावेच लागेल
--- ००० ---

काळ

उद्याचे म्हणून आणलेले सामान
एका दगडावर ठेवून पाय पसरले
तर तेवढ्यात अंत:प्रेरणेने कळले की
आता ॲसिडचा पाऊस होईल बहुतेक
म्हणून घाईने तिथल्याच एका
पडक्या घरात आसरा घेतला
तर तिथे पालीच पाली होत्या
त्यांतल्या बऱ्याचशा
मी तिथे पोचण्यापूर्वीपासूनच
संघर्षांत असणार हे स्पष्टच होते पण
त्यांना नोंदवलेला इतिहासही
असणे शक्य नव्हते आणि प्रेरणेसाठी
होऊन गेलेल्या शूर उदात्त
विभूतीही त्यामुळे
ना कोणती मूल्ये होती
ना संस्कृती
स्मरणच नसल्याने विवेकाने कुणी
त्यांच्या कृतींचे मूल्यमापन करणार नव्हते
या क्षणी होईल ते होईल असे असल्याने
कुणी प्रसिद्ध वा सेलेब्रिटीही होणार नव्हते

त्या त्या वेळी त्या रक्तपिपासू असल्या तरी
जुने द्वेष नव्हते पण त्या विषारी असल्याचे
माहीत असल्याने मला खूप भीती वाटली

तरीही होईल ते होईल म्हणून मी बसून राहिलो
त्यांना अंगाखांद्यांवरून पाठलाग करू दिले
भक्ती आणि विचार हे दोन्ही होते माझ्याकडे
पण त्यांतले आत्ता काय उपयोगी पडेल
ते मला कळत नव्हते माझ्या मनात
माझा काळ गोठला होता
--- ००० ---

अग्रेसिव्ह

अग्रेसिव्ह वाटतच नाही
खरे तर कोणत्याच
माणसांत गावांत फारसे
गुंतणे झालेच नाही

त्यामुळे वाटतच नाही
की इतका काळ गेला
आता उगवतेय वय

बालपणातले ते मित्र
तसेच तिथेच असतील जणू कालचेच
आणि शाळेतल्या सतरंज्या

नवी मिळावी म्हणून
लौकर पोचावे लागण्याच्या
ऐटीत मस्त मिरवण्याच्या

बालवयात पुस्तकातल्या
एका ओळीचा अत्यंत अश्लील अर्थ
ऐकून बडबडल्यानंतर

कुणीतरी चुगली केल्याने
सांगू का घरी म्हणून
बाईनी दरडावल्याच्या

आठवणी आणि सतरंज्या
उशीर झाल्यास फाटक्या
पण मनात ताज्यातवान्या

मनाचे वय वाढलेच नाही
उत्सुकता आहे तशीच आहे
हा एक भ्रम तर नसेल

मी पुन्हा जगतोय लिहितोय
माझ्या पहिल्या नाटकाचे नाव आहे
एक गगनभेदी किंचाळी
--- ००० ---

## अनाघ्रात

तुमच्या घरासमोरच होळी
पेटवण्याची ठरलेली जागा असणे
तुमचे अंगण जरा सखल असून
रस्ता जरा उंचावर असणे
यांबरोबरच
कम्युनिझमच चांगला वा
हिंदुत्ववाद नसेल तर नक्कीच
या जगात उभे राहायला
जागाच नाही राहणार मला
असे सगळे विचारही
येत राहतात जगण्यात यांच्या
स्थिर सावल्यांतूनच तर चालते

मन

हे वा असले सगळे रद्दड
असणारच ना खूप
त्यामुळे हजारदा कळते
इतरांच्याच काय माझ्याही
कविता सगळ्या
माहीत असलेल्याच असतात
नुसताच
वैविध्याचा झेंडा घेतलेल्या

कविता लिहिताना
वा लिहून झाल्यावर
तिला कोणत्याही विचाराचा
स्पर्शही होऊ नये माहितीतल्या
इतकी असावी ती अनाघ्रात

म्हणून मी बरेच काही वजा करत चालतो
तर म्हणे ही कविताच नाही
--- ००० ---

## ताजमहाल

चंद्र सूर्य तारे
पाने फुले पक्षी
डोंगर दर्या नद्या
आणि आकाश समुद्र वगैरे
हे तरी कुठे माझ्या
वडिलांचे आहेत
आणि ताजमहाल बांधण्यासाठी
मी एखादा बादशहा थोडाच आहे

पण आहेत काही मीही बांधलेले
शिल्पसंभार
जे देत राहतील सौंदर्यदर्शन
कुणाचीच मालकी नसलेले
ना माझ्या आसक्तीचे अवडंबर माजवत
भारून टाकणारे आणि ना
काय प्रेम काय प्रेम
म्हणायला लावणारे

बोलाचीच कढी बोलाचाच भात
असे साधे कुणालाही उपलब्ध
नुसतेच एखाद्याच्या
लैंगिक सुखाचा हेवा निर्माण न करणारे

बरे एकच ताजमहाल
बांधायची बांधिलकीही नाही
म्हणजेच मी सारखे तिथे टपून
बसताच कामा नये

विसरा ते सोहनीमहिवाल लैलामजनू हीररांझा
आमची प्रकरणे असतील कुणालाही नकळत
अमर्याद

--- ००० ---

बाजू

त्यांच्या बाजूने बोलावे
तर आपलेच लोक विचारणार
त्यांनी आपल्या भावनांचा
चक्काचूर केला होता
त्याचे काय आणि विरोधात बोलावे
तर इथल्या आपल्या
विरोधकांना बळ मिळणार

दुसरे म्हणजे त्यांचे समर्थन करावे तर
इथले लोक म्हणणार
त्यांनी कसा केला होता इथे विध्वंस
ते आहे ना लक्षात
म्हणजे बळ मिळणार आपल्या विरोधकांनाच
आणि वाईट म्हणावे तर
आपले विरोधक म्हणणार आपल्याला
शहाणे व्हा आता
म्हणजे आपलीच ध्येयधोरणे
मार खाणार

त्यांचे फोर्सेस वेगळे आहेत
समस्या वेगळ्या आहेत
त्यांत गुंतलेल्या अनेकांची डोकी
वेगवेगळीच नव्हे तर ताळतंत्र
योग्यायोग्य सोडूनच वागणार
त्यांचे लोक त्यांचे विरोधक
हेच तर असणार त्यांच्या विचारांत

नाहक च्यायला इथे ताप
तसा तर जगभर
विचारांनी सुधारेल जग म्हणणारेच
नुसते अविचारीच नाही तर वेडे झालेत
याला जागतिक मृषानाट्य म्हणावे झाले
--- ००० ---

अंमल

एखाद्या गोळीचा विषासारखा
अंमल भिनावा शरीरात
तसा बल्ब फुटण्यापूर्वी होतो प्रखर
आणि समुद्राच्या किनाऱ्यावर
भराभर वाळूत घुसतात खेकडे

त्यांच्या पावलांच्या नक्षीतून
आकाराला येते मानवी विचारांचे
सुंदर सत्य पवित्र जगणे
लौकरच इतरांच्या स्वप्नांनी
विस्कटल्या जाणाऱ्या

हातातोंडाशी आलेला खरेपणाचा भास
घेतो एका क्षणात घास
तारेवर निश्चिंत बसलेल्या
निरागस पक्ष्यांचा
कारण नसताना

अशा वेळी येतो आणखी एक
पवित्र विचार सूडाचा
सहवेदनेचा अंशही नसणारा

माहीत नसलेल्या वा चुकीच्या
माहितीवर का नाही लिहायची कविता
जर जे जे येऊ शकते मनात
ते ते सत्यच मानता येत असेल तर

नाही तरी कोणत्या प्रकाशात
कळू शकतो
भास आणि सत्य
यांच्यांतला नेमका फरक
--- ००० ---

सध्या

एकाच विभूतीच्या आरोळ्या ठोकत
दोन समूह एकमेकांवर तुटून पडले
तिसरा समूह दोघांचा मिळून बनलेला होता सध्या
तोही त्याच विभूतीच्या आरोळ्या ठोकत
लढाईचा आनंद लुटत होता

एकाच विभूतीमुळे त्यांचे आंतरिक बंध पक्के होते
पण बाह्यत: कट्टर शत्रुत्व होते सध्या

भाषेची पिसे निघाली
मनांचा निचरा झाला सध्या तरी
पण लढाई मन:पूर्वक चालू राहिली

एक अध्वर्यू म्हणत होते
हे एवढे काही महत्त्वाचे नाही
चला जेवायला
पण गर्क होते सगळेच
सांस्कृतिक संशोधनात

सह्यकडे पाहात होते ते म्हणाले
सगळा काळ आहे आमच्यासमोर
हे तुमचे कारनामे आम्ही त्यांना सांगणार आहोत

यावर त्याच आरोळ्या ठोकत
सगळेच म्हणाले डरनेका नही
डरके पहलेही हम जीत लेंगे

खरे तर जनता मात्र घाबरलेली होती
पण एकूणच पूर्वेतिहास मान्य असल्यामुळे
तीही शौर्य दाखवत राहिली सध्या
त्या विभूतीची सर्वांनाच प्रेरणा होती आणि आधार होते
--- ००० ---

सुटे भाग

अँटिॲलर्जी गोळीने अंग होते कडक
मेंदू होतो अडथळा
वाचण्याच्या प्रवाहात
आडवे येतात
मला माहीत असलेल्या शहराचे
सुटे भाग

याची कविता म्हणजे
होते जगण्याचा एक पवित्रा
वाचतानाच चोंदत जाणारे नाक

आम्हा कवींना आता वाटायचे
असते हेच जगण्याचे ज्ञान
हेच मुक्तिदायक स्प्राईट

वाचकही राहतात अद्ययावत
हे वाचले का ते वाचले का
करत चेहऱ्यावर आणतात
सांस्कृतिक सूज

मग अनेक फोन होतात
ठरतात आंतरसांस्कृतिक महोत्सव
आयुष्यभर तासंतास खात बसलेले
गलेलठ्ठ विद्वान येतात निरूपणाला

राजकीय सूज आणि ही सूज
यांतले फरक आधी अधोरेखित
करावे लागतात एसी वृत्तपत्रांतून
मेकअप केलेल्या स्त्रियांच्या सान्निध्यात

युद्धे नकोत आणि माणुसकी हवी
हाच तर मार्ग चोखाळत
--- ००० ---

या आमच्या मागून

तुम्हाला वाटते तुम्हीच शहाणे
आम्हीही शहाणे आम्हीही शहाणे
तुम्हाला वाटते तुम्हीच विद्वान
आम्हीही विद्वान आम्हीही विद्वान
तुम्हाला जे माहिती
ते आम्हाला नाही माहिती
आम्हाला जे माहिती
ते तुम्हाला नाही कळत
तुम्हाला वाटते तुम्हीच विवेकी
आम्हाला माहिती की नसतेच काही
असले काही विवेक बिवेक

तुम्ही समंजस तुम्ही सुसंस्कृत
आमचे मार्ग वेगळे तुमचे वेगळे
तुम्ही वाटते तुम्हाला
शोषितांचे पाठीराखे
निवडून कुणीच नाही देत
काय चाटायचेयत तुमचे बेत
आमच्याकडे आवाज रोषणाई
रसगुल्ले अत्तराचे सडे
मऊ मुलायम तलम ताल

तुमचे वाजले बारा
आमचा खारा वारा
तुमची खंत करा सुरळी
आम्ही वाजवू मुरली
तुम्हाला व्हायचेय जाणते
आम्ही होणार नेते

या आमच्या मागून
आता खड्ड्यातच घालतो तुम्हाला
--- ००० ---

## चोरीचे चांदणे

निदान दर आठ दिवसांनी तरी
साफ करायला हवी संगणकावरची धूळ
पण याहून जास्त त्याला
असू नये काहीच अर्थ

मनाच्या कापलेल्या जिभेने
तर जगावेच लागेल
परंपरागत जगात
पण सत्वर घडायला हवे
कवितेचे सार्थक
निरर्थकतेच्या प्रवाहात

म्हणजे भाषा तर हवीच आहे
पण तिने विभाजन नकोय करायला
कान आणि डोळे यांच्यांत

कदाचित पावसा ऐवजी
पडेल कल्पनांचे गाणे
वाटेल द्यावी इथे जागा
एखाद्या खोट्या खोट्या प्रेयसीला
पण लगेच येते लक्षात
की कविता लिहिणारे हेच मन
लगेच निर्माण करेल
भावनांची आमिषे
अर्थांच्या भुकेने

आटवलेले दूध कपातून
सांडतेय रस्त्यावर चोरीचे चांदणे
तपकिरीची आठवण येताच
बिघडतेय हवामान
वा वा अगदी मला हवे तसे गोड हिंसक
आता बाकी काहीच नकोय
--- ००० ---

सहप्रवासी

रोजगार शिक्षण आरोग्य
अन्न वस्त्र निवारा
आणि महत्त्वाकांक्षांच्या हिंसेला राजकारण
एवढे बास खरे तर
तुमचे बाकी सगळे प्रश्न
एकाकीपणा आत्महत्येचे विचार
मधुमेह बीपी दमा हृदयरोग
हे सगळे आहेत तुमच्या
सुखासीन आत्मकौतुकाचे
फावल्या वेळातल्या
चैनीचे प्रश्न

अरे वा रे वा बेटा कांतिलाल
येडा समझते हो क्या सबको

हमने भी तो जनम लिया है
याच जन्मात आम्हालाही व्हायचेय
अधिकारी आदरणीय जगज्जेते
आम्हालाही असणार आहेत
पुढच्या पिढ्या हवे आहेत किमान
तीन घरोबे बेअर मिनिमम मध्ये
कटवायला नका बघू

कुणी अतिरेकी होणे आणि कुणी
हेलिपॅडचा बंगला बांधणे
एकच मन रे बाळांनो

तुम्हीही आहात याचेच सहप्रवासी
अर्थाकडून निरर्थाकडे पण
पोचेपर्यंत पूर्ण अर्थपूर्ण आक्रमक
छुपे वा उघड
संधीची वाट पाहणारे पाताळयंत्री
--- ००० ---

कशाच्याही बदल्यात

ना ऊन ना वारा
कोपऱ्याकोपऱ्यात
साठलेला विरहाचा गाळ

हव्यास म्हणून
किती असतील गाणी
माहीत असलेले रस्तेही
फार तर पॅकेज
वाढवून देणारे

सुशोभित करत
बसावेच लागणार
संघर्षांचे कागद
अन्यथा तोल जात
वाढत जातील अतिरेकी

सगळे म्हणताहेत तर आपणही म्हणावे
कशाच्याही बदल्यात शांतता हवी
--- ००० ---

२०४५

२०४५ वा वा
हे तर रौप्यमहोत्सवी वर्ष रोजी
किमान चार मालिका पाहायला लागल्याचे
कुणाचे चूक बरोबर आणि कुणी काय
करायला हवे होते याच्या नैतिक चर्चा करण्याचे
सुरुवातीला नातेवाईक स्नेही वगैरेंच्याही घटना चर्चेला येत
मग त्यांचा खरेपणा आणि मालिकांचा खोटेपणा मिसळत गेला
मग सगळेच खरे ठरत अनुभवसंपन्नता येत गेली
निरनिराळ्या पोषाखांतल्या स्त्रिया पुरुष
स्वप्नांतही धिंगाणा घालू लागले पुढे काय होणार
यांचे पेच घालत भणाणून टाकू लागले
आकाश पाताळ तेव्हा मध्येच एकदाच स्वप्नातच आठवले
की योगवासिष्ठ म्हणते की हे काही अस्तित्वातच नाही आहे
--- ००० ---

साळुंखी

ते जनावर ओळखू नव्हते येत
एखाद्या उंच कुत्र्याच्या आकाराचे होते ते
दारातूनच त्याच्याकडे लक्ष ठेवले
कोणत्याही क्षणी दंगली पेटतील
या भीतीने जगाच्या घशाला कोरड पडली
श्रवण जितके अधिक तीव्र तितकी भीती
अधिक जोमाने सार्वकालिक असे झाले

या काळात कुठला हा टांगा स्टँड
असा विचार मनात येताच अचानक
दहा वर्षे पुढे गेला काळ अचानक
केस पिकले लाखोंचे उदरभरण
म्हणून देवस्थानांनी वाजवले शंख
तेव्हा फुटक्या बुरुजावरून एकच
साळुंखी गेली जिवाच्या आकांताने
शोधत तिचे आवडते चॅनेल

वृत्तपत्रे तर सर्व बंदच होती
त्यांचे मालक झाले होते सामील
नीतितत्त्वांच्या पुनरुज्जीवनाच्या मोर्च्यात

आता नको हयगय आणि नको आबाळ
म्हणून सर्वांनी फेकून द्यावी राजवस्त्रे
आणि आधी समता आणि न्याय
यांची प्रस्थापना करण्यासाठी
रणगाडे आणावेत सर्व तीर्थक्षेत्रांत
असे डावपेच ठरले

स्वातंत्र्य हा शब्द राहिला होता
त्याला आता नवा कोणता अर्थ देता येईल
त्याच्या विचारविनिमयासाठी
नवे संसदभवन उभारायचे ठरले
--- ००० ---

थोडा थोडा मर्डर

आपण दाढीबिढी करतोय तुकतुकीत
पण आपल्या स्वभावात आपल्या आवडत्या
नटनट्यांनी साकारलेल्या पात्रांचे प्रभाव
थोडेथोडे निनादत असतात साले याचा अर्थच
त्या आवडत्यांना असे आवडते होता येण्यासाठी
ते साले आपला थोडा थोडा मर्डरच करत असतात
आणि एक प्रकारे याचे प्रायश्चित्त वा किंमत म्हणून
तीच पात्रे उरावर घेऊन तेही थोडी थोडी
आत्महत्या करत असतीलच

म्हणजे त्या त्या काळात एखाद्या देशाचा स्वभाव
ही अशी पात्रेच कंट्रोल करत असतात
म्हणजे जगभर आवडणारी पात्रे
समान झाली तर संघर्ष कमी होतील ?
सीमाप्रश्न दहशतवाद सौम्य होतील ?

आपल्या आवडत्या हीरोच्या नजरेतली उदासी
नकळत आपणही स्वीकारतो
हे लक्षात येऊन त्याला हसू आले

मग आपण हे जे सगळे जगतो आहोत
ते नेमके कोण जगतो आहोत
ती पात्रे तर आलीच नव्हती कधी प्रत्यक्षात
या पृथ्वीवर

या विचारात तो पोचला ऑफिसात
तर बॉसच्या जागी त्याला
डॅनी डेंगझोंपा बसलेला दिसला
पण बॉसला कदाचित राजेश खन्नाही आवडत असेल
दुश्मन मधला या विचाराने
त्याला पुन्हा एकदा हसू आले उदास
--- ००० ---

## रोगमुक्त

झाले ना दोन डोस छान छान आज माझ्या
प्रवचनाचा विषय आहे प्रतिकारशक्ती

डोस पचवून पचवून आता अशी झालीय
स्थिती तयार की राजकारणी कितीही
शिव्यागाळीचे धमक्यांचे चारित्र्यहननाचे
खोटे तर्कहीन पुराव्यांशिवाय वा खोट्या
पुराव्यांसह काहीही बोलू द्यात कुणाला अटक करू द्यात
कुणाच्या कारच्या काचा फोडू द्यात कालच्या
गुन्हेगाराला आज संत म्हणू द्यात
जनतेला आता धक्काच नाही बसत सनसनाटी नाही वाटत
वादाला रक्त उसळून नाही येत ती म्हणते असे का
ठीक ठीक हे त्यांच्यावर चढले वा ते यांच्यावर
असे झाले का ठीक ठीक बघू आता
शेवटी काय होते ते असे रोज चालूच असते
त्याच्या निकालाआधीच आपल्याला नको बीपी

असे झाल्यामुळे राजकारणी होताहेत दिङ्मूढ
करावे तरी काय म्हणून ते आता आत्महत्याही
करायच्या विचारात आहेत चिठ्ठी लिहून की
जनतेनेच केले त्यांना या कृत्याला प्रवृत्त

पण गुन्हा दाखल कुठे कसा होणार आरोपी
पकडणार कसे हा प्रश्न आहे लोक म्हणणार
आम्ही केले तर काहीच नाहीय उलट धक्का
बसण्याच्या आमच्या रोगट प्रवृत्तीला
प्रतिकार करत आम्ही रोगमुक्त होऊन
आरोग्यवान झालोय  उलट तेच आम्हाला
धक्का बसण्याच्या रोगाला बळी पाडत होते

याचेही शेवटी काय होईल तेव्हा पाहू
मरू दे सध्या असेच म्हणतेय आता जनता
--- ००० ---

## प्लॅनिंग

गतिमान नेत्रचलन
असते झोपेच्या पंचवीस टक्के
निसर्गाने दिलेला आपल्या
मूर्ख जगण्यावरचा पाणउतारा

एकमेकांत मिसळणाऱ्या
अनेक स्मृती आणि त्या रसायनातून
घडणारे एक सलग अब्सर्ड नाट्य
ही स्वप्ने नसती तर
बोंबलत गेले असते आपले टाळके

स्वप्न म्हणजे
तपशीलांचे विरेचन
स्मृतींचा पुनर्वापर
घटनांचे
निरर्थकीकरण

या कार्याला लागणारे कण आणि रसायने
आपल्या आहारातून परस्पर पोसलेली

एवढा विचार एवढ्या सोयी
इतकी काळजी इतका दिलासा
आपल्या बापाच्या मालकीचा

हे तर आंदणच दिलेय ना
प्रत्येकालाच
छोड दो

सकाळी उठून
जरा रिलॅक्स मनाने
करू आता
आजच्या ताणांचे प्लॅनिंग
--- ००० ---

डांगोरे

दगड हा उद्गार कसा असू शकेल
पाण्यावरून चालत गेलेला वाघ
मागे परतून कशाला पाहील

आपण उगीचच रचतो इमले
सगळ्या ट्रेन्स न्यूयॉर्कला
जात असल्याचे
जेवणाच्या व्यवस्थेसह
पण त्याच वेळी जमिनीवरचे
वास्तव नाही दिसत आपल्याला
सेक्सी पतंगांत गुंतल्यामुळे

आपण म्हणतो राहू द्या
तुमचे सामान इथे
इथे सतत असतो
पोलिसांचा दरवळ

होतही असतील काही चुका
चुकून सांगितली जात असेल
निधनवार्ताही जेवण करून
हात धुतल्या धुतल्या

तसे तर तुम्हालाही समजायला हवे
की बाबा चुकून
लागला असेल हात नको तिथे
आणि फुटली असेल फुलदाणी

पण दुसऱ्या कुणाचे असणेच
नको असते कुणाला आपल्या पावसात

उगीच नाही लोक सत्याचे डांगोरे पिटत
सतत आपापली ओळखपत्रे संभाळत
--- ००० ---

खिसापाकीट

उज्जैन ते उज्जैन
ती काही कोणा सोम्यागोम्याची पंढरी नव्हे
वाद घालायला असला इतिहास प्रत्येक शहराला तरी
चित्तवृत्तिनिरोध कोणत्या सिनेमात होतो
हेच शेवटी महत्त्वाचे ठरते तुम्हाला
पटत नसले तरी करून पहा ना त्याग
इतिहासाचा नाही उडाले तुमचे
समस्यांचे खंदक तर नाव नाही सांगणार
कदापि पोलिसांना कारण तसे जिद्दी
आहोत आम्ही म्हटले तर बिनकामाचे
म्हटले तर वाया गेलेले कापड
जे फक्त बाहुल्यांनाच वापरता येते

लहान मुले क्रूर होऊ शकत नाहीत
असे काही नाही सांगितलेले उपनिषदांत
उगीचच फट म्हणता राजरोस
राजकारण्यांच्या नावांनी बोंबलण्यात
काय आलीय मोठी फुशारकी
याचा तुम्ही विचार करणार आहात की नाही
की नुसतीच उचलली भुवई आणि झाला
खलनायक इतका सोपा वाटतो
तुम्हाला अभिनय

तुमच्याकडेही असतीलच ना काही गुण
पण माणसाला सुखाने का नाही
जगता येत आणि का सतत त्याचे डोळे
विस्फारलेले असतात
या विचारालाही स्थान नको का असायला
तुमच्या सगळेच कसे खरे या परिसंवादात

अकादेमिक असणे देशभक्त असणे विद्वान
असणे थोडेफार प्रभाव्यांच्या संपर्कात असणे
आणि शिवाय लेखक असणे एवढे जो
जमवतो तो यशस्वी होण्यासाठीच तर
आलेला असतो अवतार घेऊन इतरांना किती कमी
प्रसिद्धी मिळते या विषमतेची त्याला
कवडीची लाज नसते आणि नसते

दयामायाही कधीच स्टेजवर न आलेल्या
शास्त्रज्ञांची वा चांभारांची वा पूजा सांगणाऱ्या
ब्राम्हणांची वा बहिष्कृत कवींची

सगळी प्रसिद्धीमाध्यमे बंद केली तर
कोण बोंबलायला धूप घालेल
मरायला टेकलेल्या भाषेला वा संस्कृतीला
वा अस्मितांना वा याला चढवून त्याला
दाबणाऱ्या बाजारबुणग्या अध्यक्षांना

तेच आधी म्हणतात वशिलेबाजी नको
आणि स्वत:ची धुवायच्या वेळी लावतात
पहिला नंबर रांगेत प्रत्येकालाच हवे असते तिकीट
पण माल कमी असल्याने काहींनाच
जगवणे शक्य असते

ते करतील ते सगळे बरोबर म्हणजे
आमचे लोक काय बांगड्या भरून स्वस्थ बसतील
कुणी ना कुणी म्हणणारच की बंद करा आता
बांगड्यांना कमी लेखणे पुरोगामी
म्हणवता स्वत:ला तर फक्त हा वा तो नाही
सगळेच द्वेष विसरा मग नुसतेच गरीब
लोकांच्या करमणुकीच्या साधानांना हीन लेखून
निवडणुकीला नका उभे राहू

वाऱ्यावर उडाले तुमचे सगळे
तत्त्वांचे चुरमुरे तरीही तुम्ही
काय सिद्ध करण्यासाठी करू इच्छिता उत्खनन
हे जनतेला कळायला हवे कशासाठी तुम्ही
हल्ला केलात पूजासाहित्याच्या दुकानावर
हे न सांगताच तुम्ही उभे राहाताय कोर्टात
साक्ष द्यायला जी नक्कीच उपयोगी पडणार आहे
अनधिकृत घुसखोर निर्वासितांना
हे माहीत असून

हे माहीत असून इकडे घाट घातला जातोय
सर्वच इच्छुक उमेदवारांना परदेशात पाठवायचा
म्हणजे उरलेले सगळेच खजिने
वापरून जन्माला घालता येतील

हव्या तेवढ्या कविता आणि हवे तेवढे उंट
स्वत:ला शहाणे म्हणवणारे

तुम्ही अन्याय केलेले चालते तर
तुमच्यावर का होऊ नये अत्याचार
याचे एक तरी द्या ना ग्लॅमर मिळेल असे कारण
ते न करता तुम्ही सर्वज्ञ असल्याप्रमाणे
भुंकत राहता दिसेल त्या दुकानावर
आणि नाटके करता प्रेमाची
जेव्हा जेव्हा दिसतात तुम्हाला
प्रायोगिक नाटकांची भली मोठी पोस्टर्स

शहाणे व्हा म्हणून उपयोग नसतो
कारण कुणीच होऊ शकणार नसते
शिंगे नसलेले वाघ किंवा उलटी
रचलेली मुंबई सुरतला सहज जाता यावे म्हणून
हे सर्वांनाच असते माहीत तरीही
एकच सुंदरी सर्वांनाच हवी असते
आणि एकाच चॉकलेट हीरोवर अनेक
फिदा असतात भावनिक कवितांच्या समाध्या

आधी एक करावे लागेल
शब्दांना अर्थ असतात हे विसरून जा
तत्त्वे ध्येये स्वप्ने उद्दिष्टे यांचा चारा खाणारे
कालसर्प
उपटसुंभ जळाला तरी नाक वर करणारे
मुनिमजी आणि मुख्य म्हणजे परंपरागत
निराधार आशावाद की भले होईल
आणि अमर होतील स्वर्गाची दारे
या शतकातल्या डोक्यांत खूप
कचरा भरलेल्या खोट्या बातम्यांचा मेंदूंसाठी

थांबवा सगळा गदारोळ नम्र व्हा जरा
साधी एक झुळुक येतेय वाऱ्याची
तिचे स्वागत करा
खुसपटे न काढता
नाराज न राहता
खिसापाकीट संभाळत न बसता
--- ००० ---

वाटतेय

सायड चे परीक्षण
आणि खिसापाकीट ही कविता
दोन दणदणीत कामे झाली आज
असे मला वाटतेय
त्यामुळे काहीसा थकवा
येणारच ना असे मला वाटतेय
त्यामुळे उरलेला वेळ
आता मस्त
गाणी ऐकत घालवायला हवा
हे योग्य वाटतेय

असे काही नाही एवढे काय त्यात
हा आवाज
माझ्यातूनच येतोय

हाच आहे साला प्रॉब्लेम
एक भाग कितीही मोठा असो
आणि दुसरा कितीही लहान
मन सतत विभागलेलेच असते

मजाच जाते सगळी

त्यापेक्षा हे सगळे रद्दड असून
थकवा येण्याचे
काही कारणच नाहीय यात
असे तरी एकच परिपूर्ण असावे मन

कारण हे चालणार आहे
आपलेच आपल्यापुरतेच

मरू दे त्यापेक्षा कोई
हमदम न रहा राहू दे चालू
--- ००० ---

## कोणतीही कविता

कुणाचीही कोणतीही कविता
येणार तर जमिनीच्या गुंतागुंतीतूनच
त्यामुळे वाचताना मला
गृहीत धरावे लागते
भयजंजाळ
आणि वापरावे लागतात
माझ्या भूतकाळाचे ताणेबाणे
आणि स्थिर हाव

मी जेव्हा लिहितो कविता तेव्हा
मला नको असतात बंधने
माझ्या वा कुणाच्याही
भाषाज्ञानाची

हेच स्वातंत्र्य असायला हवे
सर्वच कवितांना
अन्यथा व्याकरणनिर्मित
माझ्या पोटातला पित्तप्रकोप
जाळत राहील माझे जगणे

इकडे लक्ष जाताच आता वाचताना
प्रत्येकच कविता
ओलांडू लागलीय सगळी मूल्यमापने
माझ्या स्मृतीवर आधारलेली

माझ्या अंधारातून दिसणाऱ्या
प्रतिमांच्या असंख्य शक्यता
सोडून दिल्यावर आलेय लक्षात आता
कुणाचीही कोणतीही कविता
मी घडवतोय माझी निरर्थकता

आता वाचन हे मिळवणे नसून देणे होतेय
--- ००० ---

अनैतिक

तळयाकाठी पडलेले फुफ्फुस
नागासारखे विस्फारते बाहू

मिठीत घेण्यासाठी कृष्णधवल
चित्रपट वाळत घातलेले

काळाच्या सावलीत
अस्फुटसे हवे ते हरीण

शेवटी मन उरते एक
वस्तुस्थिती वरातीसारखी

मध्यवस्तीतून जात जात
गायब होणारी संभोगाच्या

अंधारात कितीही शोधली
निराकरणे तरी शहरी

नास्तिकतेत जणू निदान
मानसिक समाधान तरी

सापडल्याने उद्युक्त होतात
अनेक भावना पण एका वेळी

एकच शक्य असल्याने
सुरक्षिततेचे अंगण कलाकलाने

खुशाल भरकटतात अनैतिक
विचार डोक्यात गुप्तपणे
--- ००० ---

कोपऱ्यातले टेबल

गार पाऊस
शिरून हॉटेलात
पकडतो कोपऱ्यातले टेबल
जेव्हा विचार
आला काय गेला काय
असे झोपाळू झालेले
असतात मांजरीचे डोळे

म्हटले तर हा असतो
हरवलेल्या आठवणींचा क्षण
आणि म्हटले तर
रस्त्याचे खरवडलेले हृदय
आता फरक न पडणारे

ज्या वेळी झाडे
व्हायला हवी होती
मैदानी मनोरथे
तेव्हा झाले काय
तर मूकच राहिले
रस्त्यावरचे एकाकी बाक

घटना घडल्या
असे वाटणारा विचार
रस्त्याकडे पाहात
चहा पीत राहतो

तेवढ्यात सायकलींवरून
गेलेला हसऱ्या तरुणींचा घोळका
विचाराचे डोळे तुडवून
नाहीसा होतो
बहिऱ्या शांततेत
आला काय गेला काय असा
--- ००० ---

सौंदर्य

मूर्तिमंत सौंदर्य
कोणतीही इच्छा न जागवणारे
आधी करू देते सुरुवात
एका निष्णात साथीदाराला
मग होते ती स्वार सहज
लढाईसाठी तिला असतो
पूर्ण विश्वास तिच्या दळाचा
आता ती लक्षही नाही देत
ते असणारच तिथे हे समजून
प्रत्येक क्षणी

तुम आ जाना भगवन
तुम हो दाता म्हणत
सर्वशक्तिमान समर्पण

मध्येच एक अवकाश देते ती
तिच्या सखीला जी दाखवते कमाल
एकाच असण्याची

धन की मुझे तो प्यास नही है
म्हणत असली तरी
अमाप असेल तिचे मानधन

मी ना कुणाचा भक्त ना कुणाचा द्वेष्टा
मला दिसते आर्तता
कधी ना कधी होणारी
कुणाचीही व्याकूळ अवस्था

मी अज्ञ मी खुश
मनाचे हे दर्शन पाहून लगेच
मी जातो बाहेर मलाही सोडून
काहीही नको असलेला
--- ००० ---

रॅपगीत

झालो मेकॅनिकल टाकली पोल्ट्री
उद्यापेक्षा आहे आमची व्ह्याल्यूएबल हिस्ट्री
कितीतरी पोरींशी चालू आहे मिस्ट्री
एकीने मोडले तर तिसरीशी मैत्री
त्यापेक्षा झालो असतो रतन खत्री
तर लगेच झालो असतो घरमंत्री
भोग आता भोग जिंदगीभर भोग ( १० वेळा )

उलटेपालटे पुढारी
भरकटलेले प्रवक्ते
पेड संपादक अर्धवट जाणकार
भोग आता भोग भोग आता भोग

दोष कुणाचा शोधून काढू
कुणाची फाडायची तो निकाल लावू
कुणाला जेल कुणाला फाशी
कोण गद्दार कोण गॉडफादर
कुणी लुटली महानगरपालिका
कुणी राज्य कुणी सेंटर
सगळेच म्हण योगायोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग

माऊस तुटलाय स्क्रीन तडकलाय
नेट बोंबललेय वीज गेलीय
डोक्यातली कनेक्षन्स पायात गेलीयत
मेंदूची हाडे गुडघ्यांत सडलीयत
विचारांनी पुरोगामी सगळी
जातींत कुजलीयत जातींत कुजलीयत
एकतेचे बोलताहेत फुटपाडे रोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग

पैसे कसे वापरायचे अमेरिकेवर अवलंबून
गांड कशी धुवायची चीनवर अवलंबून
भेसळ कशी करायची ती अक्कल पाहिजे
माल विकून पळून जाता आले पाहिजे
गुंड पाळ शस्त्रे मिळव
पोवाडे गा स्वातंत्र्याचे

आपापल्या टोळया पक्क्या ठेव
पंचतारोंके बिल देनेकी हिंमत रख
पानी पीके कोई मटन खाता है भला
इकडची मागव तिकडची मागव
त्यांना बाटली तुला बाई मागव
उद्याचा भरोसा गेला तेल लावत
इथेच भोग आजच भोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग

साखरसम्राट शिक्षणसम्राट
कास्टिंग सम्राट बाजार सम्राट
रस्त्यावरच्या टपऱ्यांचे पालिका सम्राट
पोलिस सम्राट दुकानदार सम्राट
बॉस सम्राट सगळेच सम्राट
तू कुछ नही तू सिर्फ लोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग

भाषणे सुंदर ऐकलीच पायजेत
उपकार घेतलेस मते दिलीच पायजेत
भल्याचा विचार सोडून दे
उद्याला काडी लावून दे
दाराला कडी लावून घे
कोंडून बस दारू पी
जगाचा विचार सोडून दे
हाही सोडून दे तोही सोडून दे
विचारच सोडून दे विचारच सोडून दे
सगळाच जाऊ दे सगळाच सोडून दे
विचाराचा आहे शून्य उपयोग
भोग आता भोग जिंदगीभर भोग
तुला फक्त आहे शवासन योग
--- ००० ---

फाटके तुमचे मेंदू शिवा

मला नुसते पाहूनही उठतो तुमचा
क्षणात तुमचा बाजार बाजार बाजार
दोष तुम्ही मला देता
माझ्यामुळे झाला म्हणता
नाश तुमचा अप्सरेने केले म्हणता
बेजार बेजार बेजार
माझ्या आरशात तुमची नजर
माझ्या पाण्यात मनी मांजर
डोळे मिटून करता शोक
दु:खाचे डोंगर काळजात घेऊन
मी निघून गेल्यावरही
मनात तुमच्या वाजवत ठेवता
माझाच गजर गजर गजर
माझ्या आरशात तुमची नजर
माझ्या पाण्यात मनी मांजर
मेल्या सगळ्या बायका
तुमच्या स्वप्नांतल्या
जागे व्हा शहाणे व्हा फाटके तुमचे मेंदू शिवा
तुकड्यांचे मेंदू तुकडेच बघणार
कधीच नाही तुम्हाला मी पूर्ण दिसणार
कधीच नाही तुम्हाला मी पूर्ण दिसणार

नग्न म्हणजे तुम्हाला वाटते सगळे आले
तुमच्यासाठी निसर्गाने आयतेच दिले
तुम्ही अंधळे तुम्ही मूर्ख
अर्धे म्हणजे शून्य हे तुम्ही नाही जाणत
तडफडत राहता मग फसलो म्हणत
तुम्हाला तुकडे चालतात मला नाही चालत
मी तर आहे पूर्णत्वाची भगत
आहे तर पूर्ण नाही तर शून्य
मी नाही बदलू शकत
तुम्हाला हवे तर तुम्ही बदला
माझ्यासाठी घेऊ नका कुणाचाही बदला
द्वेष मत्सर कामाचे नाहीत
उथळ चाळे चालणार नाहीत
तुकड्याने पूर्णाची मालकी नाही मिळत
शरीर मनाची अशी साथ नाही जुळत

जागे व्हा शहाणे व्हा फाटके तुमचे मेंदू शिवा

माझे कपडे माझे शिक्षण
माझ्या भुवया माझे आकार
माझा सुगंध माझे वलय
आणि माझे असणे
मलाही माहीत नसलेले
मिळून सगळे साकार
नसेल दिसत तर पूर्णच नकार
जागे व्हा शहाणे व्हा फाटके तुमचे मेंदू शिवा

प्रेम तर शेकडो हजारो करतील
मला कसे काय सगळे हवे असतील
क्षितिजाच्या मर्यादा कशा पुसता येतील
नाश करण्यापेक्षा जगू द्या मलाही नकळत
स्वप्नात येईन नुसते असू द्या
या जगाच्या वास्तवात नाही झाले तुमची
तरी स्वप्नांच्या मायेत नक्की होईन
तेव्हाच तुम्हाला कळेल पूर्णतेचा ठेवा
जागे व्हा शहाणे व्हा फाटके तुमचे मेंदू शिवा

की मीही बाळगू शस्त्रे आणि करू नाइलाजाने
तुमच्या तुकड्यांच्या मेंदूच्या शंभर चिंधड्या
तुम्ही किंवा मी मरण्यात कसले मीलन
सुंदर असेन मी दिसतही राहीन
ओरबाडू पाहाल तर नष्टच होईन
मिळणार नाही थिजून जाईन
लाकडाची निर्जीव बाहुली होईन
जमल्यास तुमचा जीवही घेईन
जागे व्हा शहाणे व्हा फाटके तुमचे मेंदू शिवा
--- ००० ---

बातमी

मटणाच्या पावाबरोबर
भाजीचा भात खाण्यात
कसले आलेय शौर्य
हिंमत असेल तर दळून
आणायला हवेत
आजच्या बातम्यांचे चुरमुरे

तसा तर दोष
कुणाला द्यायचा हेच नाही कळत
अनेकदा जेव्हा शहरात
चालू असतो कर्फ्यू
आणि आवाजच नकोत कुठले
म्हणून विझवून टाकलेले असतात
सगळे सनसनाटी विषय तर ते असो

नव्या कारमधून कुणीतरी येणार आहे
एवढेच असते माहीत कर्फ्यू नसल्याने

शेवटी कंटाळून एकेकजण घेतो काढता पाय

कुटुंबातले लोक सुरू करतात
मिळतील त्या बातम्या फवारून
निजानिजेची तयारी
त्या दुर्गंधीत छान गुंगी
येत असल्याने अत्यंत शांत आणि गाढ

तेवढ्यात हॉर्न वाजतो
ही कार ती असूच नाही शकत
म्हणून सगळे दुर्लक्ष करतात

बराच वेळ वाजत नाही डोअरबेल
याचीही बातमी करून ते झोपी जातात
--- ००० ---

खुडबुड

इतिहास निरुपयोगी
खुडबुड काही मूर्ख हुशारांची
जणू त्यातले खरकटे
खाऊन ते झालेत प्रेषित

भंगार हवेत अर्थ लावणारे
रिक्षाड्रायव्हर पुन्हा एकदा
ओकतात जगाचे विश्वदर्शन
पाठीमागून आलेल्या वळूसारखे

तशी हल्ली गर्दी कुठेच नसते
नवीन पोरांना माहीतही नाहीय
रांगा लावणे घेण्यासाठी शिक्षण
चुंबनाचे किंवा मर्डरचे

आणि आता गरज तरी काय आहे
शार्लेमन राजा तिथे बाळगत होता की इथे
त्याचा झनानखाना हे समजण्याची
तो प्रश्नच वगळलाय आता परीक्षेतून

या क्षणी सांगू शकत असेल काही
बुद्धवचन तर निष्कारण विषकन्या
कशी व्हायची तयार याचा कोणत्या
काशीत जायला उपयोग होईल

अनुभव आणि त्यांचा काळ
आणि त्या वेळची भांडीकुंडी
यांचे घालून रिंगण आजच्या
अधोजगाचे काय शष्प भले होईल

बारा प्रकारे इतिहास लिहिणारे गधडे
आपापले लंगोटीयार संभाळतात
ते घाबरतात एकटे असायला
आणि कुबट अंधाराचे सेवन सोडायला
--- ००० ---

सरदार

उजळ माथ्याने
फाफललेले सरदार
नाक वर करून अजूनही

घेतात पत्रकार परिषद
समंजसपणाचा कळस गाठत
करतात ते हलकटपणा की कनवाळूपणा
दोन्ही ओळखतात थोडे हे थोडे ते
तर सरदारांच्या दारातले
त्यांना सर म्हणणारे
म्हणतात फारच
बेरकी बाबा हे
कमाल आहे

ना कधी चिडणे ना वेडेवाकडे बोलणे
ना शिव्या थोडी सूचकता थोडा उपरोध फक्त

पाणी दिसो वा डोंगर
त्यांचे डोळे चमकतात
ते कोष्टकेच देतात करून
रेडी वाद टाळण्यासाठी
आणि गुण्या वा गोविंदा
कुणाचीच तक्रार येऊ नये अशी
रक्कम कितीही असो

स्नेह आणि पाताळयंत्र
यांमुळे ते होतात आदरणीय
ना धाक ना टेरर

प्रेमाने आस्थेने मार्गदर्शन करत
ते उलट जनतेचेच ऋणी राहतात
ते निस्पृह धाडसी आणि शांत असतात
--- ००० ---

तळहातावर शिर

चेहरे कितीही सौम्य ठेवा
पण कायद्याच्या कचाट्यात नका सापडू
पूर्ण रिलॅक्स व्हायला
जे जे लागते ते ते वापरा
काहीही झाले तरी
अपराधी भाव येताच कामा नयेत
नुसते चेहऱ्यावर नव्हे तर मनातच
असा कणखर सराव ठेवा

मुख्य म्हणजे डगमगू नका
सिद्ध करायला बरीच मेहनत लागते
तीत काही छिद्रे राहिलेली असतात
शिवाय राजकीय देवघेव करता येते
शिवाय इतरांच्याही
सौम्य सज्जनपणाच्या फायली
आपल्याकडेही असतातच
भले भले नेमके दिवाळीला
घरी परततात
फटाके फुटतात
पेढे बर्फी लाडू संपतात
न्याय मिळाला की विजयाचे हसत

पुन्हा जिंकायचे असते
अहो देशासाठीसुद्धा
परदेशातल्या हेरगिरीसाठी
अवैध पैसा लागणारच ना

एकूण भले करायचे
तर धोके पत्करावे लागणारच
तळहातावर शिर घ्यावे लागणारच

धंदा है पर गंदा है असे मुळीच म्हणायचे नाही
--- ००० ---

सुनसान

अशोकाचे झाड
हात लोंबते ढगळ
ढगाळ वेशीवर
सुनसान कुत्रा
वाट पाहात
अनिर्बंध आईस्क्रीमची

कधीचे उभे ढगांचे खांब
राजमहालात उद्भवलेले
नाट्य झाकून ठेवत
आज्ञाधारकपणे
तोंडात तंबाखू चघळणारे
भविष्यवेत्ते सांगतात
कुणालाच न कळणारे
अभेद्य आकाशाचे
चिमणीशी असलेले नाते

उपाशी मल्टिप्लेक्स
एकदाच उघडते तोंड
हरलेल्या आयुष्यांना
समाधी देण्यासाठी दिवसातून
कुणी काही म्हणाले म्हणून
विमनस्क झालेले टीव्ही चॅनेल
जाते फारकत घेण्याच्या विचारात
अपमान नको म्हणून आवाजाशी

अर्थ कुठेच काही
नसूनही सतत सवयीत मग्न
असलेले एक अतर्क्य शिल्प
जांभई देत म्हणते
बघा त्या सुनसान कुत्र्याकडे
त्याचा मेंदू वेगळाच असणार ना
--- ००० ---

चारा

हरखलेले भद्दे पांथस्थ
रात्र काढण्यापुरते
गाणी आठवत राहतात
मग हिशोब लिहून
चारा टाकतात
त्यांच्या पाणी
पिण्याच्या बाटल्यांना

एकदा प्रवास मानला
की झोप लागेल न लागेल
त्यावरून एकदम
मनाशी संघर्ष पुकारणे
हे ठरू शकते
डिपॉझिट जप्त करणारे
एखाद्याला असेल याचे
सोयरसुतक एखाद्याला नसेल

सकाळी दहापर्यंत
गाडीच नसणे हे एक
आयुष्यच ना
स्वत:लाच वाया घालवणारे

इथे काय चांगले मिळते
आणि आयुष्यात काय
चांगले मिळवले हा प्रश्न शेवटी
मनाशीच येत असेल
तर पराभवच हा

मन मन मन
मन मन मन
मरू दे म्हणून मग ते
त्यालाही चारा टाकत राहतात
--- ००० ---

प्रेयसी

अर्थपूर्णता नसते
कधीच बिनचूक
निरर्थकता नेहमीच बिनचूक असते

राजकारण धर्म कला
यांत सतत गुंतलेले मन
असते गुलाम
दुःखाचे आणि हिंसेचे
त्याला कधीच नाही वश होत
निरर्थकता

कुठूनही कसेही एकत्र
केलेले शब्द म्हणजे
निरर्थकता नव्हे
ती तर फक्त अस्ताव्यस्तता

अर्थपूर्णताही असते
अस्ताव्यस्तताच
धुंदीने सजवलेली
मूडने माखलेली
गुंतवणारी

अर्थपूर्णता आणि अस्ताव्यस्तता
आणतात सतत संघर्ष
आणि खुजे खुजे करत जातात
एकाकी जगणे

कधी ना कधी गुंतणे
पूर्ण सुटणे जिथे घडले
त्याच शब्दाची होते
प्रेयसी निरर्थकता
निरर्थकतेतही असतात शब्द
पण गुंतण्याशिवाय
--- ००० ---

गाणी

आवडती गाणी प्रेडिक्टेबलच तर असतात
उलट त्याचीही मजा येते
माझ्या निरनिराळ्या वयांत
प्रत्येक वेळी हमखास येणाऱ्या ढगांप्रमाणे
मला पाठ असायची किमान पाच ते सात गाणी
माझे मन पडून असायचे त्यांच्या सावल्या पांघरून
शिवाय मला शास्त्रीयही आवडायचे
त्यातले काहीही कळत नसले तरी
मित्र हसत म्हणून मी ते चोरून एकटाच ऐकायचो
पण फारसे कळत नसणाऱ्या इतरांप्रमाणेच
मीही म्हणायचो की संगीत हे संगीत असते
शास्त्रीयच श्रेष्ठ असे काही नसते
आणि अमुकच श्रेष्ठ असेही काही नसते

अशी एकशे तेरा गाणी माझ्या आयुष्याचे सार म्हणून
वेगळी घेतली होती एका ठिकाणी ती तशीही एकत्र
अनेकदा ऐकून अनेकदा भरून घेतले होते आयुष्य

भावगीतांचे किती कार्यक्रम मी अटेंड केले
याला गणतीच नाही मजा यायची
मला पाठ असलेली गाणी अनेक स्त्रियांना
– सुंदरच तर काय – पाठ असायची
सुगंधी सभागृहात आम्ही तल्लीन होत
एकत्र गुणगुणायचो त्या त्या गायक-गायिकांबरोबर
आमची मने एका वेळी इतका वेळ एकत्र असणे
मस्त वाटायचे हळव्या गाण्याला एकत्र अश्रू देतानाही

इथे फक्त गाण्यांचे सांगतोय बाकी कामेधामे सुखदु:खे
होतीच ना आता मात्र कंटाळलोय नको वाटतात
तीच तीच गाणी खरे तर कोणतीही गाणी
रेकॉर्डेड गाणी तशीच आहेत पडून त्या वेळच्या त्या
भावभावनाही तशाच त्या गाण्यांसारख्याच नको वाटताहेत
--- ००० ---

मात्र

क्षितिजाला म्हणता येते उद्गार
आणि मानवी हास्याला वेलांटी
एवढे झाले की वाटते
आलोच मुक्कामी
ओंकारात सापडते पावसाचे रहस्य
कोवळ्या उन्हात सापडतो कान्हा
तरीही
अंधाराच्या मात्रेपुढे मात्र
कसलीच मात्रा नाही चालत
--- ००० ---

## तळे राखणे

फरसबंद प्रांगणात
येतो जॉनी वॉकर
त्याच्या हातात असते
वेसणीची दोरी
लोक हसतात
त्यांना माहीत असते
नजिकचे भविष्य
कारण घरे
कितीही विस्कटलेली असली
तरी तळे राखणे
असतेच महत्त्वाचे
त्याच्या मिशीची सुरक्षितता
आणि आपल्या जबड्याचे सुख
हे विचारात घेऊन
अन्यथा असतातच ग्लॅमरमुळे
दुतर्फी मरणारे आणि खूप
पगाराच्या नोकरीत
आकाश विसरणारे
--- ००० ---

होनोलुलू

तू होनोलुलूला होतास
तेव्हा तुला तेहरानचे रान आठवे
आणि टांगानिकाला असताना
वांगणीचे टांगे

कालांतराने तुझ्याहून भारी
हुशार येत गेले
ते तर स्वत:चे
तीन तीन चार चार
तुकडे करू शकत

न्यूनगंडाने तू
खट्टू होत गेलास

ना आठवण पूर्ण
ना आत्ताचा क्षण
हे दिसले तेव्हा
तुला बरे वाटले
न्यूनगंड जरा निवळला

२०२१ ला तुला तुझे
२०-२१ वय आठवले
तेव्हा तुझ्या मेंदूतून
ठिबकत होते
समाधानाचे रक्त
--- ००० ---

भावनास्वातंत्र्य

होय आवडतात मला वपु पुल
जीए चित्र्यं आवडून तुम्ही काय दिवे लावलेत
कमी दु:खी थोडेच जगलात
आहे मी ऐतिहासिक पौराणिक चा भोक्ता
सो व्हॉट आणि हो भावगीत भोक्ताही
आहे मी कम्युनिस्ट आरेसेसवाला
तुम्ही सलज्ज आणि मीच फक्त निर्लज्ज
असे कुठे आहे इतने भोले भी मत बनो
तुम्हीच फक्त तत्त्वशील असे कुठे आहे
म्हणा ना मला संकुचित भावनिक
ऊरबडवा ठीक आहे ना एकच आहे लाईफ
मला राग लोभ सूड छळ हिंसा
हे सगळे हवेय तुम्हाला कसला आहे प्रॉब्लेम

म्हणाला असेल एलियट भावनेतून बाहेर पडणे
मी कशाला वाया घालवू माझे आयुष्य
तुमच्या मूल्यांत तुम्ही असाल आधुनिक
वा पुरोगामी वा नास्तिक मला काय त्याचे घेणे
होय आहे मी प्रतिगामी इतरांचा निर्लज्जपणा
तुम्हाला का चालतो तुम्ही घाबरत असाल त्यांना

तुमचे तत्त्वज्ञान ऐकत बसण्यापेक्षा
रमून जायचेय मला रोमँटिक सिनेमात
किंवा मेलोड्रॅमॅटिक नाटकात समजा
वाटलो मी तुम्हाला संकुचित आपमतलबी
असंवेदनशील हरकत नाही
तुम्ही काय वेगळे आहात हे माझे आयुष्य आहे
माझे स्वातंत्र्य आहे आणि असेलही काही ग्रेट
ते तुम्ही चाटत बसा मला शिकवायची
तुमची लायकी आहे हा तुमचा भ्रम तुमच्याजवळच ठेवा
--- ००० ---

मैत्रेय

जाऊ द्या ही
सोळा डब्यांची पॅसेंजर
मग मी हसेन
ते जरा पुढे जाताच
त्यांच्या कायप्पावर
जातील माझे हसरे फोटो
मग ते हळहळतील
तिथूनच तर आलो आपण
अरेरे ते हास्य नंतर आले असावे

माझा संदेश हाच आहे
मखरातला मीच
कशाला हसायला हवाय
तुमचे तुम्ही हसा ना

ते हसतात पण खोटे
ते आनंदी आहेत असे
त्यांना आणि इतरांना वाटावे
म्हणून ते उत्सवही करतात साजरे

तो मैत्रेयच असणार
ते चर्चा करतात पुढल्या स्टेशनवर
अकारण आलेले
आतल्या आनंदाचे सहज हास्य
पाहायचे राहिले म्हणून ते हळहळतात

मुळात बुद्ध हसेलच कसा
आणि हसला तर तो का हसला असेल
याचे अनेक दु:खी अर्थ त्यांना सुचतात

एकजण म्हणतो सारखाच हसत राहील का तो
त्यावर सगळे हसतात
--- ००० ---

उठाठेव

उगीचच जखम
बरी व्हायला जास्त वेळ

लागल्याने बदकाच्या
तोंडात फटाक्यांची माळ

विशेषत: पाणी म्हणून
दिलेले असिड

न सांडता ओलांडते
इच्छेचे दार

आता बरे जाईल
आयुष्य म्हणून

सावलीत जावे कावळ्याच्या
तर तो दिसतो नाराज

बरीच कामे अजून
व्हायचीच आहेत

म्हणून निघते वारी
तर बुक्का म्हणून

गुद्दा बसतो पाठीत
फेलकांडते विचारांची सवय

नको आता पुन्हा सारांश
म्हणून कपडे न बदलता

होते उठाठेव समारंभात
दहीभात खाता खाता
--- ००० ---

कवी जाऊ लागतो कवितेकडे

विचार आणि भावना खरे तर विचारच
मुळात हाच फक्त सारांश
सगळ्या आणि सगळ्यांच्या जगण्याचा
गरीब माणसाने ठरवावे
एक तर कम्युनिस्ट व्हायचे किंवा सरळ
व्हायचे खूप श्रीमंत
कोणताही घ्यावा मार्ग दुनिया जाऊ दे
बोंबलत आपल्या विचाराने चुकीचे
कसे काही होईल
एकदा वाटते सरकारी कार्यालयांच्या
इमारतींची पुनर्रचना करायला हवी
एकदा वाटते क्रांती करून कडक
मार्ग आखून नीटच करावीत माणसे
पण घटना हवी लोकशाही हवी
असाही तगादा लावतो विचार

कवीला दिसते विचार
ही शक्ती नसून तुरुंग आहे
विचारातच असते कविता असे समजून
पळताहेत साजरे करताहेत घेताहेत
सेमिनार्स लोक मूलभूत अर्थशास्त्राचे

कवी जाऊ लागतो कवितेकडे
विचाराबाहेर तर सगळेच म्हणतात
याला जगाची फिकीरच नाही नाही ते
निरुपयोगी करत बसतो चाळे

खरे तर कवी जाणतो कवितेचे असणे
कवितेशिवाय फुकट मरतील सगळे
जखमी होत ओरबाडत किंचाळत

तो लोकांच्या विचारांकडे लक्ष नाही देत
--- ००० ---

ठिबक कविता

असह्य पुन्हा घालमेल
ऱ्हस्व उनाड कावळे उत्पात घडवणारे
अंधार वापरलेला टरफले हवेसे कावळे ऱ्हस्व एकांत
नकोसे पुन्हा चेटूक
फवारा नि:संदेह
नि:संदेह नकोसे
उगीचच फवारा कावळे
ऱ्हस्व अंधार वापरलेला फवारा असह्य ऱ्हस्व
घालमेल अपयशाने नि:संदेह संपणारच नाही हे
पुन्हा अपयशाने चेटूक नकोसे पुन्हा
नि:संदेह कोणत्याही कारणाने टरफले
फवारा अंधार वापरलेला
पुन्हा अपयशाने कावळे चेटूक उत्पात घडवणारे उगीचच
उनाड संपणारच नाही हे
उगीचच एकांत
असह्य अपयशाने
कोणत्याही कारणाने टरफले
कोणत्याही कारणाने अंधार
उगीचच फवारा वापरलेला
संपणारच नाही हे
ऱ्हस्व चेटूक उत्पात घडवणारे
उपटसुंभ आयुष्य
आगंतुक विचार
शब्दांचे मायाजाल
अक्षरांची गर्दी
सुख आले माझ्या दारी
फुकाफुकी गगनावेरी
वारा दिसतो
पाण्याने होते बोलती बंद
सवयीचा मेंदू पण क्लॅरिटी हीच
समजले तरी न समजणे
ठिबक कोवळे ऊन एकांत आणि घालमेल
--- ००० ---

मी

माझ्याशिवाय मी असू शकतो
ही शक्यताच हजम होत नसल्याने
मी घट्ट धरून असतो मला

या घट्टपणामुळे मी दोन होतो
सतत खेचत राहतो मला
बाहेर उडणे थांबवत

खरे तर मला भीतीच वाटते
मी नसण्याची त्यापेक्षा
मी स्वीकारतो आत्मछळ

मी खरा नाही हे जाणवते
पण कामचलावू जगायला
तर हवे असे माझे सत्य

धरून ठेवण्याचा मजकूर
वाढत चाललेला तशीच
माझी भीती आणि खोटेपणाही

ही समस्या नुसती दिसल्याने
मला एक शहाणा समजतात
माझे मित्र मला प्रेमळ आणि नम्र

म्हणतात माझ्यामुळे त्यांचे ताण
निवळतात विसावा मिळतो
एक तर धाडशीच निघाला

त्यालाही मी घाबरतोय
तो नाहीसा असेल मला
कसा सापडेल
--- ००० ---

## रंग

हिरवा आणि लाल रंग
एकत्र पाहिले की वाटते नुक्तेच
आपले जेवण झालेय
आणि काळा रंग पाहिला की
आगीतून वितळून आलेले
उन्हातले चमकते डांबर
भेसळ असणार च्यायला यात
असे मनात आणणारे

पिवळ्याने उगीचच नाजुकच
वाटायला लागते सगळे
आणि निळ्यामुळे वाटते
झालेय अंधाराचे आक्रमण

जांभळा का कोण जाणे
विषारीच वाटतो
आणि आता काळा वाटतो
सगळी रहस्ये घट्ट दडवून ठेवणारा
जगाचा प्राचार्य

जिस  स्कूलमे तुम पढते हो
उस स्कूलके हम
प्रिन्सिपाल है समझे
रास्ता नापो अपना
म्हणणारा कारला रेलून

मी चिंता नाही करत
जाऊ दे बोंबलत
हे कशानेही काहीही वाटणे

इतर माणसांचे असे आणखी
काही घडत असेल
--- ००० ---

अष्टग्रही

मला नको होती नवीन पॉलिसी
काही महिन्यांतच येतेय अष्टग्रही
जगबुडीच होणार आहे मग कशाला
एजंट म्हणाला म्हणजे म्हटले हो
आहे माझा विश्वास

ती बला टळली एवढेच नव्हे तर मी
श्रद्धाळू आणि वर देवभोळा
असल्याचे पसरले अनोळखी का असेनात
सगळे मला एक चांगला माणूस
समजतात हे जाणवू लागले
कशाला उगीचच हे डिस्टर्ब करा
म्हणून मी माझी तीच प्रतिमा राहू दिली

पुढे मी बदल्या होऊन जिथे जिथे गेलो
तिथे तिथे मी आधी तिथली प्रमुख
देवळे करून मगच कामावर हजर
होऊ लागलो तेच तसेच जमत राहिले

एक दिवशी मात्र दरदरून भीतीच
आली मनात की साले चुकून नकळत
आपल्याकडून आपण जसे आहोत
तसे वागले गेले तर बाप रे इतक्या मनांत
भंग पावतील आपल्या प्रतिमा

लक्षातच आले सापळ्यातच
अडकलोय आपण पण आता इलाज नाही
आता जेवढे असू आपण तेवढे जगलोच नाही
असे समजावे झाले पण मग आले लक्षात
आपण जे आहोत ते विसरू तर शकतोय ना
मग काय आहे प्रॉब्लेम तेच जगणे समजू झाले
जगबुडीच्या ऐवजी मीबुडी झालीय झाले
--- ००० ---

डाव

अहो तसे नाहीय ते तुम्हाला वाटतेय की ते
जिवावर उठलेत एकमेकांच्या पार
वाट लावायची इच्छा बाळगून आहेत
तर वेडे आहात आतून ते वेगळे आहे
हे सगळे आतून मिठ्या मारत चाललेय
हे राजकारण तिसऱ्याला गाफील ठेवत
लिव्ह इन कडे न्यायचेय त्यांना

कधी कधी तुम्हाला ते अक्षरक्ष: शारीरिक
मारामाऱ्याही करताना दिसतील
पण ते असतील प्रेमाचे ओरखडे
आणि अति तीव्रतेमुळे होणारे चावणे

बघा तुम्ही त्यांचे जे मित्र आहेत ते
त्या तिसऱ्यांना पाडायला उभे राहतील
एकमेकांच्या नावांनी बोंबलत
ते एकमेकांचे भले करतील

तुम्ही म्हणाल की मग हे पाहून
लोकांनी समजावे काय वेडे आहात
लोकांचा संबंधच काय लोकांना काय वाटावे
त्याचे डाव खेळतच तर चालणार हे
जे चाललेय त्याबद्दल लोकांनी शाळकरी
वा त्यांना पटेल अशा कल्पना वापरत
त्याचे सत्य निर्माण करत राहावे
हीच तर लोकशाही लोकच नसते
तर डावपेच कशाला लागले असते

अमुक एक देशविघातक आहेत असे म्हणतच
त्यांचा फायदा करायचा आणि त्याची किंमत घ्यायची
हा धूर्तपणा हे कौशल्य ही परिस्थितीवरची हुकमत
लोकशाहीशिवाय कशी शक्य होईल आणि त्यातही शिवाय
एकमेकांना फसवण्याचे डाव असतीलच ते वेगळे
--- ००० ---

भक्तिमार्ग

न्यूनगंडात्मक विठ्ठल पुढे उभा राहिला
अशी अवस्था होती
बोलणेही शक्य नव्हते
नजरेतून नकळत आकर्षण
व्यक्त झाले असावे
ते स्वीकारलेही गेले असावे
असे वाटले खरे

पण मै तो कुछ भी नही था
हे मीच ठरवले होते

हळूहळू विरून गेले ते
काळात दूर दूर
पण मनात विठ्ठल राहिलाच

कधी भजन कधी कीर्तन
कीर्तनास नर हो तुम्ही जा गा
कीर्तनास नर हो तुम्ही जागा

नंतर तेही थांबत गेले
क्वचित कधी देवीची आरती
हवालदिल करत राहिली

तिला ते माहीतही नसेल
किंवा पूर्ण आलीशान
जीवनशैलीत ती
व्यग्र असेल संसारात

पण इकडे भक्तिमार्ग
डोक्यात फिट करूनच गेली ती
त्यागाची अभिलाषा
आता ती कुठे असेल असेल का तशीच
--- ००० ---

## एकाच रंगाच्या

एकाच रंगाच्या
रेषा प्रतल ओघळ
एकाच मनाच्या
वेगवेगळ्या हिरव्या
काल आज उद्या
सापडलेल्या अनाहूत
रंगापेक्षा मनाच्या
छटा हवेतून
पाणी पाणी पाणी
मोकळे सोडलेले
कसाही काल पाण्यात आज उद्या रंगहीन
कितीतरी कधीही पाहता पाहता वेगळे
हवेतून प्रकाशातून
झाडे आठवणींच्या सावल्या
सलगता सोडून अनिर्बंध
प्रतिबिंबे हलती
पाण्याची चमक
आणि वलये
मोकळी सोडलेली पांढरी
पिऊन आसक्तीची नशा
उगीचच असल्यासारखी
पण दगा देणारी लहरी
झाडे हवेतून पाण्यात
मोकळे सोडलेले केस
जणू सावल्या हिरव्या आणि
घरे वाट पाहणारी उद्या
अस्तित्व संभाळत
सूर्य हिरवा होऊन
प्रतिबिंब पाहतो हिरव्या पाण्यात
आणि कालचा हिरवा अंधार
पिऊन मोकळी चमक
व्यापक होत जातो झाडे हवेतून
--- ००० ---

न कधी ध्यान

अं रा
उ: हि
क्त ला काल
रंग ले धन
न कधी ध्यान
ष्ट होता च धार
लन न का
रि स्वी धान
तरंग ती परात
शाप र ए म
अंत र हाती
मी हस्ता लेला
अंतर लेला
नि टाळे क
वा क कली
टले नि घोस
वा पश्यंती
परा रात क
टा ब ट शंक
थांग द्याचा
उ भर श कत्र
घूस पेन र रा
थे नि: पणे य
लिही पाठ
पथ चु येणे
ए
शक्य नाही
तो गेली ती गेला
आता पण पान
आ तयार ला
धोका नको
धोका नको
--- ००० ---

मराठी कविता

तुकारामानंतर स्वत:ला भिंगाखाली
घेण्याच्या वाटेवर कोण चालले
केशवसुत बालकवी मर्ढेकर
कोलटकर आरती प्रभू चित्रे
धुरी सदानंद रेगे रामचंद्र कदम
आणि आता तिळवे लाखे चंप्र

सामाजिक राजकीय तर ठीकच
त्यांची स्वप्ने ठरलेली होती आहेत
इतरांना कंटाळा आला तरी
त्यांना येत नाही हीच त्यांची प्राप्ती

बाकी शेकडो हजारो काय करत राहिले
करत राहिले चर्वण
व्यक्तिगत आणि सामाजिक
यांतल्या द्वंद्वाचे स्वत:च्या सुखदु:खांचे
मूडसचे उदात्त कल्पनांचे
कसे जगायला हवे ते कळण्याचे
मला कळतेय पण त्यांना कळत नाहीय याचे

स्वत:ची मते नैतिक कल्पना दिसणाऱ्या
समस्यांवरची निराकरणे
आणि सौंदर्यासक्ती आणि आईचे प्रेम
सारांश म्हणजे सारांशच जगण्याचे
ठरवून उगाळत राहिले सदोदित
आपटत राहिले सह्याद्रीच्या कड्यांवर
आणि म्हणत राहिले अभिमानाने
आम्हीच विचारवंत आम्हीच प्रेषित

कधी लढ म्हणा कधी देणाऱ्याचे
हातच घ्या कधी शंभरदा प्रेम करावे
हे भिल्लासारखे अचूक सांगत राहा
कधी घामाचे गोडवे गा
कधी विठ्ठलाचे गा
मुख्य म्हणजे काही ना काही
उदात्तगिरी करून
जिंकत राहा अस्मितांची डबकी

सांगत राहा आम्ही शूर आम्ही दिलदार
आम्ही प्रेमळ आम्हीच धडा शिकवणारे
थोडक्यात म्हणजे आमचीच लाल असे

कविता करणे कविता सुचणे
या आत्मप्रौढीत मश्गूल
कौशल्ये आत्मसात केलेले जादूगारच जणू
सदोदित भोळ्याभाबड्या
गीतरचनेच्या स्तरावर राहणारे
नाजुक हळवे भावनाशील
गदगदणारे रडणारे क्रोधाने
लाल होत पिझ्झा खाणारे

कधी अलंकार कधी प्रतिमांची झुंबरे
लयदार वळणदार सेक्सी असण्याचे
बंधन पाळणारी दृष्टी बाळगणारे दिलखेचक
झब्बे घालून चिंतनशील दुर्बोध डोळ्यांचे
रा. शं. वाळिंब्यांना पठडी म्हणणारे
पण नव्यांना झाडून हाकलायला हवे
ही त्यांचीच पठडी नेटाने चालवणारे

कधी विद्वत्ता कधी भाषाप्रभुत्व
कधी फील्डिंग लावून पारितोषिके
कधी टोळ्या करून एकमेकांना
वाहवा करणारी कविता प्रसवणारे

थरथरते ओठ थरथरते हात उद्विग्न
मस्तक माणुसकीचे स्वमताचे कवच
भरगच्च पुनरावृत्त्या भावनांच्या रेलचेलींची
श्रीमंती यांत सतत लडबडणारी बडबडणारी

कविता मुख्यत: बाहेरख्याली असणारी
हावरट
कोणत्याही मुळे हलवणाऱ्या मानवी
समस्यांची आच निकड नसलेली
आत्ममग्न खुश दु:खी कविता
व्हारायटी स्टोअर्स असलेली
--- ००० ---

मल्ल्या

टपरीवरच्या चहातली
कबुतरे त्याच्याशी बोलत
त्याला नो प्रॉब्लेम होता
पंचतारांकित
नकोच होते डोळे
पण तरीही
आपण मल्ल्या का नाही झालो
नेमका मल्ल्याच का झाला मल्ल्या
या विचाराने भणाणून जात
त्याचे दात

अवतीभवती ललना
असणे हा त्याला
विमानलाभ दिसे

हे सगळे त्याला विनाकर्ज
विनापरदेश विनादाढी
हवे होते

तो कानडी शिकत
बियर प्यायलाही
तयार नव्हे उत्सुक होता
पण घरचे लोक बदलणार कसे
यावर त्याचे गाडे अडत होते

यातूनच त्याला प्रश्न पडला
आपले शरीर भोवतीचा माहोल
आणि जगच एकूण
आपले आपल्यासाठी स्वतंत्रच
आहे की काय

इतकी असतील जगात जगे इतकी
बदलती की मनाचे आहेत प्रॉब्लेम
--- ००० ---

चंद्र

बुबुळे टोकेरी
झाल्याने दृश्य
हवालदिल
कान बंद
आणि डोक्यात
एकाच ठिकाणी साकळलेले
सगळे चंद्र
--- ००० ---

व्यवहार

व्यवहार म्हणून
आपण
काचेतून आरपार गेलो

पारदर्शक आयुष्याची
कथा रचली
आणि झालो अध्यक्ष
कायद्याचे

पुन्हा पुन्हा
हे घडवायची
गरज म्हणजेच
आपला खिन्नता रोग

हे कळल्याने
आपण
सेकंड ओपिनियनसाठी
गाठले सर्कसचे
म्हातारे व्यवस्थापक

तिथले
वाघ सिंह हत्ती
माकडेही शिरली
आपल्या अंगात
ताप आला

आता थकल्याने आपण
ग्लानीत गेलो
तेव्हा
हळूच कुणी कानात
सांगितले
कुतर्क आहे हा सगळाच
--- ००० ---

खेळ

चेहरा कोरा असतो
कानडोळे स्थिर असतात
खेळाशिवाय काहीच
पोचणार नसते मेंदूत अंपायरच्या

खेळाडूंना तो कधी
नम्र वाटतो तर कधी उग्र

घरातून बाहेर पडताना
त्याच्या छोट्या मुलीला
बाय करायला तो विसरलेला
असतो असतो संशय पत्नीबाबत
पण त्याने कडक आणि घोर
ट्रेनिंग घेतलेले असते
ते सगळे बाजूला टाकण्याचे
अगदीच कुणाला शंका आली
तरच संगणक सांगतो सत्य

अत्यंत प्रतिष्ठेचा असतो
सामना जगाची उत्सुकता
ताणलेला प्रेक्षकांना क्षणोक्षणी
भेदरवणारा हर्षभरित करणारा

पण खेळाडूंना असते
मानसिक अचलतेचे ट्रेनिंग
जिंकण्याहरण्याच्या सर्व
शक्यता ठेवायच्या असतात त्यांना
मनाबाहेर शेवटच्या क्षणापर्यंत

अंपायर आणि खेळाडू
वेडे करतात प्रेक्षकांना
स्वत: मृत्यूत बुडत जणू
--- ००० ---

खरे तर तो अत्यंत अहिंसक म्हणून त्याला स्वत:ला आणि इतरही अनेकांना माहीत होता. तरीही आपल्याला असे कसे स्वप्न पडले, हे त्याला कळत नव्हते. एका हॉलमध्ये एक सभा चालली होती. तिथे तोही होता. खरे तर पिस्तूल त्याने फक्त सिनेमात आणि टीव्हीवर पाहिले होते. ते प्रत्यक्ष त्याच्या हातात कुठून आले ? पण अचानक त्याने उठून समोरच्या वक्त्याला गोळी घातली. तो तत्काळ कोसळला. त्यानंतर तो सहज त्या हॉलबाहेर निघाला. तिथे ना कुणी त्याला हटकले ना पकडले. पण बाहेरच्या पॅसेजमधून पुढे जात तो पायऱ्या उतरायला सुरुवात करणार तेवढ्यात समोरून तिघेजण आले. त्यानेच खून केलेला असल्याचे त्यांना माहीत होते. ते कसे ? त्यांनी टीव्हीवर पाहिले असेल का ? ते त्याला पकडणार आहेत हे जाणवताच त्याने त्यांनाही गोळया घातल्या. मग पायऱ्या उतरून तो रस्त्याने चालू लागला. संध्याकाळ किंवा खरे तर रात्रच असावी. पेरूगेटवरून चालत तो घरी पोचला. हे तर खरे तर पूर्णच चुकीचे होते. त्याचा शोध सहजच आधी घरीच तर घेतला गेला असता. पण घरी जायलाच हवे होते. कार्ड वापरले तर तो पकडला जाणे सोपे गेले असते. घरात असेल ती कॅश घेऊनच बाहेर पडायला हवे होते. कुणाशी काही न बोलता त्याने जेवण केले आणि असेल ती सगळी कॅश खिशात घेऊन तो बाहेर पडला. निघण्यापूर्वी त्याने कपडे बदलले. तो नेहमी वापरत नसलेला फुल टीशर्ट आणि जीनची पँट त्याने घातली. अर्थात रात्रीचीच वेळ होती. थोडे चालत गेल्यावर त्याला त्याचा एक एके काळचा जिगरी मित्र भेटला. त्याच्याशी जेव्हा अनेकदा वादच होऊ लागले तेव्हा त्याने त्याच्याशी संबंध तोडले होते. ते पुन्हा जोडायचा त्याने प्रयत्न केला तरी याने नाही म्हणजे नकोच आता, असे केले होते. अमुक ठिकाणी हात लावल्यास वा लागल्यास भाजते हे एकदा कळल्यावर पुन्हा पुन्हा कोण तिथे जाईल मरायला ? पण त्याने ओळख दाखवली म्हणून यानेही दाखवली. जाऊ दे आता, कशाला ते जुने सगळे, असा याने विचार केला. एक तर आपण एक हिंसक माणूस आहोत हे लौकरच यालाही कळणार आहे आणि दुसरे म्हणजे कशाला आता ते या शेवटच्या टप्प्यात, असाही याने विचार केला. त्या मित्राच्या हातात सॉसची बाटली कशासाठी होती, कोण जाणे, पण फोन आल्यामुळे किंवा स्वत:चेच खिसे तपासायचे असल्यामुळे असेल, त्याने ती बाटली याच्या हातात दिली. ते चालत राहिले. मग त्याने ती बाटली परत स्वत:च्या हातात घेतली. पूर्वी ते एखाद्या बारमध्ये गप्पा मारत बसत असत. त्याच जिव्हाळ्याचे पुनरुज्जीवन करत हा म्हणाला, कुठे जाऊ या ? तो म्हणाला इथेच पुढे उजवीकडे मैत्री नामक आहे, ते चांगले आहे. मग ते तिकडे गेले. पण हे झाल्यावर आपण जाणार कुठे आहोत ? सगळे एस्टी स्टँड आणि स्टेशने इथे लक्ष असणार. परगावी जरी गेलो तरी सगळ्या हॉटेलांकडे आपले फोटो आणि वर्णने गेलेली असणार. अपराधी भाव आणि भीती लपवत तो बोलत राहिला. पूर्ण आयुष्य आपण नाकासमोर घालवले आणि आता हे असे घडल्याने आणि ते उघड झाल्याने घरचे, नातेवाईक, मित्र या सर्वांनाच प्रचंड धक्का बसेल, काहींची तर आयुष्येच बदलतील, या विचाराने त्याच्या हृदयाचे ठोके उलटेसुलटे पडत होते. गप्पा मारता मारता तो विषय आलाच त्याच्या बोलण्यात. तो म्हणाला – आपल्याला आवश्यक तेवढ्याच आठवणी राहाव्यात – रागलोभ, मानापमान, आवडनिवड हे सगळे सतत येईल तसे नष्ट होत राहावे. म्हणजे मग चुकूनही आपल्या हातून हिंसा घडणारच नाही – अगदी मानसिकही नाही घडणार – असे जगता येऊ शकेल ? तो मित्र चखणा उचलत होता, तो त्याने तोंडात टाकला, मग त्याने एक घोट घेतला आणि जरा वेळ विचारात बसून राहिला. मग किंचित हसून तो म्हणाला – हा लईच एकदम आध्यात्मिक आहे प्रश्न, अवघड आहे. ते सवडीने काढ शोधून तू. सध्या आपल्यांतले सगळे विसरून जाऊ आणि दिलजमाई करू. भेटत राहू पूर्वीसारखे. यावर हा म्हणाला की हो, दिलजमाई करूच पण भेटत राहू की नाही, ते नाही माहीत. त्या मित्राला काही कळले नाही.

--- ००० ---

मुद्देमाल

मुद्देमाल म्हणून शेवटी
मनाचीच साक्ष निघाली

आपोआप सुजत जाणारी रात्र
दिवाणाखान्यातले चित्र ठरली

हरलेली गाणी ठेका बाळगू लागली
समरगीतांचा

याहून वेगळे असूच नाही शकत
श्रेयस्कर कत्तलींचे आवरण

हे ओळखून प्रदर्शने
मांडली जाऊ लागली

खून बलात्कार आत्महत्या अन्याय
यांची कलाकार झाले प्रेषित

आहे हे असेच चालणार हे मान्य करत
शिंपी बदलले की झाले

असे म्हणू लागले
कनवाळू कवी

त्यांना हवा होता लोकाश्रय
राजाश्रय पताकांच्या

सुशोभित माणुसकीच्या
उदास उत्सवात

जणू ते सोडून सगळे जग
रक्ताळत चाललेय अनंत रात्रीत
--- ००० ---

अब्सर्ड

अब्सर्ड म्हणजे मूर्षा व्यस्त
असंगत निरर्थ हेतूहीन
इतके म्हणूनही
अवघडच जाणार मराठीत

असे कसे काही असेल
बुद्धीच तर वापरणार ना
तिला असणारच ठरवलेली दिशा
भले ती चुकीची का असे ना

जगणे अशा अराजकात
थोडेच चालते
ते तर चालते अट्टहास अतिरेक
इच्छा महत्त्वाकांक्षा संघर्ष
विवेकावर आधारित हिंसा
तडजोडीतले पराभव
विरहातले दु:ख
स्फोट खून अन्याय
विषमता यांच्या अराजकात

जायचेच नसेल कुठेही
तर जाणार कुठे

सुरक्षित राहायचे असेल
तर हत्यारे युद्धे धोके पत्करूनही
निर्दय विजय नकोत का

कोणत्याही नात्यातल्या समस्येवर
असणार अनेक बिनतोड बाजू
आणि बुद्धीमुळे मध्ये मध्ये
सुखही मिळतेच ना

या दोन्हींमधल्या एका अराजकाची
निवड करत बसणे हेच अब्सर्ड
फार तर विवेकी अब्सर्ड म्हणू
--- ००० ---

चित्र

चित्र कसले विचित्रच ते
रंग पिकलेल्या आंब्यांचे होते पण आकार
त्रिकोण चौकोन गोल
आणि काही अपूर्ण असे होते
त्याच्या शेजारी होती
काळी सफरचंदे दंडगोलातली
पण त्यांना अळूची पाने होती जणू

असे विद्रूप का करतोस सगळे
असे एकाने त्या चित्रकाराला विचारले
तर तो म्हणाला सारखे सवयीत जगणे
अंदाजाधारित अपेक्षा करणे
हेच सर्वांत जास्त विद्रूप आहे
त्याला धक्का देऊन
शांतता यावी जगात
म्हणून मला हे तंत्र वापरावे लागते
शिवाय त्यात रंग आकार पोत
छायाप्रकाश यांच्या
अनपेक्षित मांडणीतूनही स्वत:
मी स्वतंत्रतेची जाणीव होत असतो

हे उत्तरही अनपेक्षितच होते
असे तर मग काहीच ओळखता येणार नाही
कळणे तर अशक्यच होईल

हेच तर काम आहे कलेचे
प्रत्येक वेळी नव्याने गोंधळात पाडून
जगाला शांततेकडे नेणे
धर्म राजकारण या फडतूस गोष्टींचा काळ
संपला आता तो म्हणाला
--- ००० ---

सुरकुत्या

मागच्या पिढ्यांतल्या प्रेतांनी
मने काबीज केलेली असल्याने
तरुण मुलेही म्हातारी राहात
नव्या निर्मितीच्या शक्यता विसरून जात

त्यांच्या अंगावरच्या सुरकुत्या
हीच त्यांची भाषा असे
त्यांचे भवितव्य त्यांना
जाणवत असल्याने
ते नेहमीच घाबरलेले असत
त्यामुळे आक्रमक असत

घर जग विश्व
जागचे हलूच नये
अशा कातर मनाने ते सदोदित
हळवे झालेले असत

मग ते आईचा मृत्यू
गरिबीची कणव दु:खितांचे अश्रू
यांची गाणी गात बसत
ती गाणी तशीच चालू राहावीत
म्हणजे आपणही टिकून राहू
ही त्यांच्या कपाळावरची सुरकुती
एखाद्या जखमेइतकी खोल आणि ठळक असे

तिथेच थांबलो तर तेच घडत राहील
हे एखाद्या तरुणाच्या आलेच लक्षात
तर ते त्याला घेरत तुझी भाषा आमच्या
सुरकुत्यांशी मेळ नाही खात
तू खोटारडा घातक आहेस तू
बोलताच कामा नयेस असे म्हणत
तो थांबत नाही हे पाहून क्रुद्ध होत राहात
--- ००० ---

ओळख

झाडेफुले हे खरेच मला ग्रीक आणि लॅटिन
जाई आणि जुई यांतला फरकच नाही कळत
तर सीता और गीताच होणार ना ते
राम और शाम मध्ये नेमका आपापला
शोधायची वेळ आली होती शेवटी
दोन नायिकांवर आणि आपण
काही कुठले हीरोबीरो नाही आहोत
आपली ती शोधून काढणे जाऊ दे
उलट नक्की माहीत असलेली
विसरण्याच्या प्रयत्नात असतो आपण

माहीत असण्याने खरे तर खूपच
प्रॉब्लेम होतात मुख्य म्हणजे कंटाळा
आणि अशा वेळी तर साधे मौन
म्हटले तरी ती हिंसाच होते ना

अनेक लेखक कवी म्हणतात
मी शोध घेतो
शोध घ्यायचा तर मुख्य म्हणजे
ओळख असताच कामा नये ना
एकच सिंगल असते त्यांच्याकडे
आणि त्यालाच एक मौल्यवान
अवगुंठन चढवून ते म्हणतात
हिंसा लैंगिकता ही प्राणतत्त्वे आहेत
जगण्यातली मी प्राण पणाला लावून
त्यांचा शोध घेत आलो आहे

त्यांना कंटाळा येत नाही कारण
शब्द निर्जीव असतात निर्जीव शब्दांतून
ओळख असलेलेच मांडणे म्हणजे संसार
सुखाचा होणारच ना म्हणायला तरी
मुख्य म्हणजे घटस्फोटाचा प्रश्नच नसलेला
--- ००० ---

मुकादम

एकीकडे वीजखरेदी न केल्यामुळे
सक्तमजुरीला सामोरे जावे लागले
तर दुसरीकडे बससेवा पूर्ववत होत असताना
बूट फेकल्यामुळे
नवरात्रोत्सव साधेपणानेच
मोबाईलवरून करायचे ठरले

बचतीसाठी पुढाकार घेतलेला असला
तरी दोन्ही आरोपी भाड्याच्या खोलीतच राहात होते

सरकारी वकिलांनी साक्षी नोंदवल्या
तेव्हा दुपारचे चार वाजलेले होते
आणि इकडे सुरू झाली होती
प्रस्ताव मार्गी लावण्याची घाई

विनाशस्त्रक्रिया प्रभावी उपचारांना
अपेक्षित लोकप्रियता लाभली नाही
त्यामुळे सगळ्या राजकीय भूमिका
ढगात गेल्या आणि न्यायाचे कांगावखोर
निसर्गसाक्षरतेचा प्रचार करू लागले

आता मात्र संगणकाच्या अति वापराने
येणाऱ्या समस्यांकडे लक्ष द्यावेच लागणार होते
त्यासाठी डोळ्यांत वनौषधींचा फवारा मारावा
असा एक प्रस्ताव समोर आला

या सगळ्यावर देखरेखीला एकही
मुकादम उपलब्ध नव्हता
त्यामुळे वीजखरेदी आणखीनच लांबणीवर पडली
यावर उपाय म्हणून उरलेल्यांनी निमूटपणे
बसमधून पोबारा करायचे ठरवले पण एक
अस्मिता म्हणून महापौरांचा नामजप मात्र जवळ ठेवला
--- ००० ---

सत्याची काळजी

जो जे बोलेल ते पटायची सवय लागली
खरे आहे च्यायला हे त्यांचे चूकच आहे
अरे तिच्या मारी बोलताना
नेमके हे वगळले होते साल्याने
त्यांचेही ऐकले म्हणून कळले तरी

आता प्रश्न आला की आधी कुणी केली हिंसा
कोण म्हणाले ही क्लिप बघा ना
आणि हा त्याच्या आधीचा हल्ला
अवघड आहे हे
त्यापेक्षा एक निवृत्त न्यायाधीश
अध्यक्ष करावा अनू चौकशी करावी
होऊन जावे दूध का दूध
आणि पानी का पानी

हे म्हणतात ते नेहमीच खोटे बोलतात
ते म्हणतात हे पूर्ण माहिती न सांगता
निवडक बोलतात फक्त ते खूप
निरागस भासावेत असे

कोण कसे आहेत हे सांगताना
अनेक चुका करतात मुद्दाम दोघेही खरेपणाने
संदर्भ चुकीचे वापरतात भूतकाळातले

खूप संतापतात दोघेही अगदी सात्त्विक
वाटावा असा थयथयाट करतात
दुसरा बोलत असताना कुत्सित हसतात
सारखे  बोलण्यासाठी हात वर करतात

त्यांचे पारे चढत जातात तसतसे
प्रेक्षक शांत होत जातात
नकोच फारशी सत्याची काळजी या विचाराने
--- ००० ---

सांगून सुपरहिट

मी एक नाटक लिहिले होते. त्यात त्या काळातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी ( गोष्ट नव्हे ) होती. त्याचे नाव होते, ‘ जागचं हलायचं नाही ‘. माझा ग्रेट दिग्दर्शक मित्र प्रकाश बुद्धिसागर याला ते खूप आवडले होते. तंत्राच्या अनेक करामती करून लोकांना चकित करत त्या नाटकाचा एक झगमगता प्रयोग त्याला व्यावसायिक रंगभूमीवर सादर करायचा होता. ते नाटक अर्थातच आहे तसे प्रायोगिक गरिबीत नसते आले. प्रकाशने त्याच्या आत्मविश्वासातून त्याचे नाव ठरवले होते, ‘ सांगून सुपरहिट ‘ ! पण, सुरुवातही न होता, तालमीतही न जाता, ती योजना बोंबलली आणि पुन्हा एकदा सवयीतले अपयश माझ्या खात्यात जमा झाले. नंतर खूप वर्षांनी, पुनर्लिखित स्वरूपात त्या नाटकाचा म्हणायला एकच प्रयोग, ‘ गोळ्या काढलेले पिस्तूल ‘ या नावाने झाला ! हे सांगायचे कारण म्हणजे, कविता लिहिण्याचे एक, सांगून सुपरहिट तंत्र मी आज इथे उघड करणार आहे. त्याच त्याच प्रकारच्या रटाळ कविता लिहिण्या-वाचण्याचा ज्यांना कंटाळा येत नाही त्यांच्यासाठी हे नाही आहे. नावीन्य आणि स्वत:ची मर्मदृष्टी यांचे नवविधा संगम करत राहावे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठीच ही पोस्ट आहे. मुख्यत: वैचारिक पायावर उभे राहून सामान्य अनुभवांची सौंदर्ययुक्त री ओढत राहणे म्हणजे कविता, अशी बाळबोध समज स्वीकारणाऱ्यांसाठी हे नाही आहे.

तंत्र म्हटले तर सोपे आहे. तुमचे जे काही आकलन असेल जगण्याच्या प्रक्रियेचे ते यातून व्यक्त होऊ शकेल. तरीही, मुख्यत: क्षणोक्षणी दिसणारी विसंगती आणि निरर्थकता ज्यांना जाणवत असेल त्यांच्यासाठी तर ही एक खाणच ठरू शकते. साधे कोणत्याही दिवसाचे एखादे वर्तमानपत्र घ्यायचे. मग कोणत्याही पानावरचे, त्या त्या वेळी समोर येईल ते ते वाचत, आपल्या आकलनाच्या अंगाने मांडत जायचे. यात, आपल्या डोक्यात असलेले वा सुचणारे असेही काही काही समाविष्ट करत जायचे. कविता म्हणजे हेच, असेच, अमुकच असे काही पकडून बसायचे नाही. बुद्धिगम्य अर्थाचा विचारही करायचा नाही आणि त्याच्या अभावाची भीतीही बाळगायची नाही. मानवी अनुभवाचे एक विश्वदर्शन यातून खुले होऊ शकते. याचा अर्थ जुन्या अभिव्यक्तिपद्धती नष्ट होतात, असे काही नाही. काही लोकांना असे म्हणायची एक हौस असते की आता मूर्तावादाचा काळ संपला, स्वच्छंदतावादाचा संपला, अतिवास्तववादाचा संपला. तर तसे काही होत नसते. मानवी मनाच्या सर्व शक्यता चालूच राहतात. ( मराठीत वास्तववादाचा काळ कधीच संपत नाही ! ) हे पाहता, भावनिक आणि माणुसकीच्या प्रचाराच्या कविता लिहिणाऱ्यांनी निर्धास्त राहायला हरकत नाही. काही कवी हयातभर एकाच प्रकारची आवड जोपासणारे असतात तर काही, माणसांतल्या निरनिराळ्या प्रवृत्तींना खुश करणारे विविध गुणदर्शन करण्यात माहीर असतात. त्यांचे ते काम चालू राहू शक्यतेच. हेही काही असू द्या बाबा, अशी आपण त्यांना विनंती करू शकतो. हा एक वेगळा प्रकार, एवढेच राहू द्या सध्या. पण, अर्थातच, हे तंत्र, माझ्या त्या नाटकाप्रमाणे पूर्ण अपयशीही होऊ शकते. नाही तरी इथे कुठे कसला बौद्धिक अर्थ व्यक्त करायचा आहे, फेल झाले तर होऊ दे, असा विचार मी करतो – ही अर्थात सर्वांच्याच ‘ बसकी बात ‘ नाही याची मला जाणीव आहेच.

तर मी इथे प्रात्यक्षिक दाखवणार आहे. त्यासाठी मी घेतला आहे आज, मंगळवार, दिनांक ०५-१०-२१ चा पुणे मटा. चलो, शुरू करते हैं –

पार्टी

हानिकारक रसायनांशिवाय करा
काळ्या पैशाचा गौप्यस्फोट
आणि गजबजू द्यात सच्च्या सहेल्या
राजकीय संघर्षात
नवरंगांच्या कोठडीत

संवेदनशील राहा फेसबुक
ठेवा बंद आणि गुरुवारपर्यंत
करा गरबा लोकसेवा म्हणून

कोणत्याही चुकीला माफी न देता
राहा सतत अव्वल स्थानी
मजबूत व्हा आणि उलगडत जा
आधी फेटाळले गेलेले सर्व आरोप

फोडलेली दुकाने आणि पावसाने
झोडपलेले स्टेशन यांत
फरक करत जेवणाला ठेवा लाईट
मग समारोपाच्या कार्यक्रमात
देऊन टाका तुंबलेल्या पीएचडी

पहाटे तीन वाजता पाळा कडकडीत बंद
गरब्याच्या आयोजकांना पाठवा समन्स
रुसव्याफुगव्यांकडे करा दुर्लक्ष
हिमनगाची टोके कट करा
एक नवे पाऊल टाकत असल्याप्रमाणे
भावनांना करा स्थानबद्ध

कायदे स्थगित असताना द्या पहिला डोस
याचिका फेटाळली तरी सरकार
बरखास्त नका करू क्रूज
पार्टीची हेटाळणी न करता तीत सामील व्हा
--- ००० ---

महाभारत

चला आनंदली एकदाची मुले
पाळीव कुत्र्याची विष्ठा किंवा
त्याला दगड मारणे यांवरच्या हाणामाऱ्या
तरी जरा थांबतील आणि गतिमान होईल
उद्योगचक्र पालक मोकळे झाल्याने

आता निसर्गाच्या संरक्षणासाठी
विभक्त होतेय एक अभिनेत्री
आणि पुन्हा बदलतेय ती तिचे नाव
नावात काय आहे असे म्हणत
करवट बदलती हूं तो सपना बदल लेती हूं
या सवयीवर आधारित पुन्हा
घडवायचेय तिला महाभारत

कुणी मदतीच्या बहाण्याने
मान्यता देतोय स्वत:च्या रक्तदाबाला
तर कुणाचा शब्दखेळ अडतोय
सातव्या आडव्या शब्दावर
आणि विसाव्या उभ्या शब्दाच्या
स्वर नाद ध्वनी कीर्ती वगैरे अर्थांवर
या सगळ्या लाख मोलाच्या कृती
चालताहेत योगासनांचे महत्त्व पटवण्यासाठी

नव्या जोडीच्या पुन्हा प्रतीक्षित
गोड बातमीसाठी वाट पाहणारे प्रेक्षक
तेच असतात कुत्री पाळणारे
महाभारत पाहणारे आणि रक्तदाबाने
बेजार असूनही
शब्दखेळ खेळत बसणारे

--- ००० ---

याचबरोबर कालच्या मटावर आधारित दिलेली ‘ मुकादम ‘ ही कविताही पाहावी.

--- ००० ---

कंट्रोल

डोक्यावर पडल्याने बसतो धक्का
अंधारी येते दुखते पण
कंट्रोल सोडला गेल्याने छान वाटते
कधी कुणी मारते डोक्यावर दणका तारे चमकतात
दुखते पण कंट्रोल सुटल्याने छान वाटते
झोपेच्या गोळीने झोप येताना
भुलीने भूल येताना
मंद वाटत वाटत छान वाटत जाते
पानातून खाल्लेल्या गोळीने शरीर लहान
आणि डोके वाटते हत्तीसारखे मोठे
पण कंट्रोल गेल्याने छान वाटते
दारूचे तर सदासतेज विधिवत
मान्यताप्राप्त कंट्रोल जाणे
कधीही हवे तेव्हा छान छान छान

दु:खाच्या झटक्याने बेशुद्ध पडणेही
छानच ना बचाव करणारे
परिस्थितीवर कंट्रोल टिकवण्याच्या इच्छेपासून

तसे तर अपमानाने एकाकी होणे
हेही सोडूनच देणे ना हवे ते हवे तसे असणे

एका ठिकाणी नजरेचे भिंग लावून
अचानक सप्तरंगी जगात जाणे
हेही एक प्रकारे आहे ते
आहे तसे असू देणेच ना

मग मृत्यू तर कळस असणार
पूर्ण कंट्रोल सोडून दिलेले फक्त सत्य जगणे

वा म्हणजे त्याच मुक्तीच्या मार्गात आहेत सगळे
--- ००० ---

कलंकित

निसर्ग आहे एक करमणूक
त्यातही आद्यता नाहीच
जे आहे ते फक्त शब्दसाहचर्य
बाकी सगळा आहे मेंदू माझा
आणि शब्द तर माझ्या स्वभावाने कलंकित

शास्त्रज्ञ आणि स्थापत्यविशारद
व्यापून टाकतात माझे मन
आता मला गरज नसते
हजारो पानांची
मी गृहीत धरतो माझी भाषा

भाषा खोटी असते
हे न समजणारे बाजारबुणगे कवी
मला भुलवू तर पाहतातच पण शिवाय
माझे प्रश्नच गैरलागू
असल्याचे मला पटवू पाहतात

अरे बाळांनो नुसत्या दुधाच्या दातांवर
आयुष्याचे करणार नियोजन तुम्ही
जाऊ द्या कविता आणि कादंबऱ्या
नुसता दुःखाच्या स्रोताचा तरी
प्रश्न विचारा ना

तुमच्या काय की माझ्या काय
स्वभावाचा अंधार म्हणजे एकच अंधार
असे समजून किती पिसत राहणार पत्ते
किती बोंबलत लावणार वासलात
स्वतःची आणि तुमच्या वाचकांची

तुम्हाला मोठे कवी व्हायचेय
की नीट जगावे सगळ्यांनी असे वाटतेय
--- ००० ---

बंधुत्व

सौंदर्यासाठी उडतील
आता
धुळीचे लोट

ओल्या सडक्या रस्त्याने
पाहावी
जणू चित्रप्रदर्शने

कालच्या संन्यस्त वेली
आज
माना टाकून वाट पाहतील

विचारांचे धुमारे परंपरागत
हुशारीने
गातील स्वातंत्र्य

अजबच सगळे
म्हणत
थांबून राहतील पाय

उद्या निसर्गाला
पडेल
डिजिटल स्वप्न

अजूनही वेळ
गेलेली
नाही म्हणत राहील रास्ता

ज्याचे त्याने जगावे मरावे
या
न्यायाने बंधुत्व माजवतील समूह
--- ००० ---

कर्णा

दुरून वाजतोय कर्णा
आळवत कळकळीने तळमळीने
भजन भूतकाळाने थकलेले
उगवत्या धुक्यात

एमिली हिंमतवान होती
की तिला टाळायचे होते
अधिकाधिक धुके घडवत जाणे

एक महाराज चुकून जाहीर
करून बसले त्यांचा अखेरचा क्षण
आणि लोकांनी केली
त्यांच्या समाधीची तयारी
खोलात अनुभवत त्यांना
लोकांनी केले सुंदर बांधकाम
पोलिस आले तपासाला तर म्हणाले
ते आधीच गेलेलेच होते
नंतर बांधलीय ही समाधी

एमिलीचे देऊळ मुंबईत का नसावे
तिचीही भूमिका
भूतकाळ डावलण्याचीच तर होती

तिला हसणारे नास्तिक
गाडले जात राहिले आपापल्या भूतकाळात
धाडसाने आतल्या आत थकत
--- ००० ---

अंधार म्हणजे

अंधार म्हणजे धूळ
आणि उजेड म्हणजे ढगाळ मन
असे झाल्याने
घुसमट म्हणजे
झाले सौंदर्याचा शोध
कारण भाषेचे केंद्र डळमळले
आणि येऊ लागले तिथून
अनियंत्रित आवाज

सुहानी रात ढल चुकी
याबरोबरच
आले हम भी
आदमी थे कुछ काम के
त्यानंतर ये कौन आया
आणि मग
जलने वालोंको चैन कहां

त्यानंतर आंखोंपे
भरोसा मत कर

तुझ्याजवळ जे जे आहे
ते ते सगळे देऊन टाक
स्वामी म्हणाले
अष्टावक्र म्हणाले
ध्यानाचाही त्याग कर
तुकोबा म्हणाले
हरी आम्हांसवे सर्व भोगी

टक लावून नका पाहू
अनुभव आणि स्मृती
यांवर जगणे
म्हणजे प्रेते मोडून खाणे

ज्या अर्थी कावळ्यांचे
आवाज येताहेत नॉर्मल
त्या अर्थी जग नीट चालू आहे
कोणतीही भाषा नसतानाही

ते चालूच तर होते ना

थांबवावा आता हा
घुसमटीचा समारोह
--- ००० ---

नम्रपणे

त्यांनी नम्रपणे
दावा केला
आम्ही सादर करत आहोत संगीतातून
शांततेच्या आतली शांतता
जी शब्दांतून
कधीच नाही व्यक्त होऊ शकणार
श्रोत्यांनी सौम्य टाळ्या वाजवल्या

मध्येच काहींना आठवले
बुद्धाचे
निश्चिंत पहुडलेले बंद डोळे
आणि प्रदीर्घ कान
शांततेचीही तृष्णा नसलेले

वादकांचे चेहरे पिळवटत होते
खूपच तल्लीन होत
ते वेध घेत होते श्रोत्यांच्या
आठवणींचा

पिनड्रॉप शांततेत
सांस्कृतिक अंधारात
उलगडत होती
मनांची स्वप्ने

मैफल संपल्यावर काही काळ
तशीच राहिली शांतता
आणि मग झाला
टाळ्यांचा कडकडाट

वादकांनी नम्रपणे
लववल्या त्यांच्या माना
--- ००० ---

वारस

उदरभरण म्हणून उगीच
टिवल्याबावल्या करण्यापेक्षा
जगातला सर्वात गंभीर महत्त्वाचा
आणि सदोदित गांड फाटलेला दागिना
म्हणून राजकारणाच्या
मढ्याला अंघोळ घातली

आपण आता लुटले गेलो
असे समजून
आधीच नंगे झालेले सामान्य नागरिक
रडू लागले डोळ्यांतून गाळत
वर्षानुवर्षे कपाळात साठत आलेल्या बातम्या

गोट्या खेळत काळ घालवण्यापेक्षा
उत्तुंग स्वप्ने बघा
आणि शक्य तो
रक्त तापवत उघडे पाडत राहा
इतरांचे ढोंग परातीत पसरलेले
आणि वरातीत झिंगलेले

वादात जिंकणे वा चेष्टा टवाळी
जमल्यास शिव्या
यांचे भव्य प्रासाद
जर उभारताच नाही आले
तर जगलात तरी कशाला
अशी विनाअत्तर होईल हजामत

आपण सत्याचे पाईक होतो
अशा शब्दांची ट्रॅक्टरभर भरलेली पोती
वारस म्हणून सर्वोत्तम
खुन्यांना द्यायचे ठरले
तेव्हा कुठे मढ्याच्या अनुयायांचे जीव भांड्यात पडले
--- ००० ---

## त्वचेखाली

या जगाच्या दिसणाऱ्या
जाणवणाऱ्या त्वचेखाली काय असेल

पाहायचे कसे याची नको चिंता
मनानेच दिसताहेत टरफले
तर मनानेच आतही जाता येईल

कदाचित ते
स्वत:चेच टरफल
भेदणे असेल

भीती एकच आहे
मी नुसतेच
फक्त एक
टरफलच केवळ
असेन तर

साधारच ना

हा प्रश्न जगण्यात येणे
हे सुदैव की दुर्दैव

माझा शेवट
आलाय बहुतेक जवळ

बघू तरी
--- ००० ---

व्यसन

कुठल्यातरी फुलाची सकाळची सनई
वर्दळीत कर्दळ म्हणून
पायदळात सामील व्हावी
आणि एखाद्या प्रेमाचे
लफडे होऊन परंपरागत प्रदेशात
केंद्रसरकार गडगडावे
किंवा साधे आपले अन्याय
पाहून धावत सुटणारे मदतीला
जगभर भिरभिरत राहावेत
हे सगळे आता
झाले आहे डेली सोप

बडी शेप असो की छोटी
आधी मटण खाल्ल्याशिवाय
मजा नाही हे मी सहज
सांगू शकतो
सर्व गोंडस बाळांना

कविता म्हणजे नुसता
एक खेळ वाटतोय तुम्हाला
चटका नको पण मटका हवा
धूळ नको मज भूल हवी
असे हवेनकोचे यंत्रच तर काय

जरा व्हा सडेतोड
आणि तोडपाणी करत का असे ना
जरा वेगळे शोधा भूखंड
जे शोधाल त्यात गंड नसावेत
पण कंड असावी फंड जमवण्याची

त्याच त्याच कविता लिहून कंटाळा तर येऊ द्या
किती गाणार गोडवे
स्वत:च्याच मनाच्या साळसूदपणाचे
समस्यांत घुटमळण्याचे व्यसन सोडा आता
थोपटा दंड
--- ००० ---

डोअरबेल

अहो कितीदा वाजवताय डोअरबेल
सांगितले ना तुम्हाला
अनुल्लेखाचा सत्कार चालेल मला
सध्या जरा मी लिहितोय
एक कादंबरी विद्युल्लेखा आणि सटायर
आपल्या साहित्यावरच आहे असो
या आता

अरे पुन्हा काय आता
पैसे नको आहेत मला
साधा मराठी लेखक मी दमून आलोय
त्यातही सध्या कुरवाळतोय
काही कवितेच्या ओळी
कुणालाही नको असलेल्या
पण खरे तर
चांगले वागणेच कसे चांगले
हाच आहे मथितार्थ
सगळ्यांच्या आवडीचा
तरीही कविता ना नकोच
नाहीच कळणार
फुकट निरुपयोगी म्हणतात
नाही दार नाही उघडणार
मी हे चांगले नाहीय वागत पण
या आता

आता मात्र हे जरा जास्तच होतेय
काय माझ्या मैत्रिणीचा निरोप
शक्यच नाही असलीच समजा एखादी
तरी असा कुणातर्फे कशाला येईल निरोप
या आता

माझ्याच घराची मीच वाजवतोय बेल च्यायला
--- ००० ---

पॉलिश

बघाच तुम्ही
असे करतो पॉलिश तुमच्या खुर्चीला
की सांगा बरे कसे
कसे
कोर्टातल्या जज्जाच्या खुर्चीसारखे
तुला कशी माहीत जज्जाची खुर्ची
मीच केलीय ती पॉलिश
इतकी मस्त की घाबरतातच लोक

बरा वापरतोय हा त्याला
मार्केटिंगसाठी
मलाही हा रोज आठवत राहील
या खुर्चीवर बसताना
पण फारसा घाबरणार नाही मी
या खुर्चीला
कारण मराठीतला लेखक असल्याने
बाय डिफॉल्ट कळतेच मला न्यायातले

असे म्हणतात की माझे आजोबा
एल एल बी झाल्याची तार घेऊन
बाहेर दारात उभा असतानाच पोस्टमन
इकडे घरात ते न्यूमोनियाने गेलेले होते
त्या गावातलेच काय एकूणच
त्या परिसरातले खूप लोक हळहळले होते
आजी म्हणे आमचे घराणे शापित आहे
कारण एका पूर्वजाने पैशासाठी ब्रम्हहत्या केली होती

असेल नसेल
मला मात्र वकील पोलिस आणि सैनिक
हे नसावेतच जगात असे वाटते

शिक्षक कारखानदार कारकून
डॉक्टर हॉटेलवाला चांभार
सुतार प्लंबर पॉलिशवाला हे खूप चांगले
पण असू दे बसेन मी या खुर्चीवर
--- ००० ---

वर्तमानपत्र

वर्तमानपत्र असते
अतिमौल्यवान
ताजे ताजे जग
ज्याला हात लावता येतो
ज्याच्यावर प्रेम करता येते
ज्याची समजून घालता येते

दयाळू होता येते
संतापता येते
उत्सवातला गुलाल
फासून वेडे होता येते

मुख्य म्हणजे
घाबरता येते
हेच क्रौर्य आपल्या जगण्यात
आले तर हेच बॉंबिंग
या समोरच्या शाळेवर झाले तर

दुखवटा पाळता येतो
का झाला घटस्फोट
आपल्या आवडत्या अभिनेत्रीचा
हे कळून आनंदित होता येते

आपल्या बाजूचे जग
आणि आपल्या विरुद्धचे जग
यांत आपल्या जगाची बाजू घेऊन
लढता येते मनातल्या मनात

याहून हवेय तरी काय आपल्याला
बाकी आपले तर चालूच असते
--- ००० ---

शब्दार्थ

उच्छृंखल या शब्दाचा अर्थ
पाहता पाहता रात्र झाली
मिळेल ते तिकीट काढून
सिनेमा पाहायचाच
एवढीच निवड राहिली

या दरम्यान
समोरची सिमेंटची पोती
हलकी झालीसे वाटले
म्हणून पाहिले तर
लक्षात आले
जग किती का मोठे असे ना
माझ्या पोत्यात मावत जाते
तेच तेवढेच माझे संग्रहालय

यातून माझ्यात आणि जगात
निर्माण झाला एक मोकळा अवकाश
तोच मी अशी मखलाशी करून
मी पाहिले तर जणू
मी पाण्यात होतो आणि
माझ्या अवतीभवती
मासे फिरत होते हसरे

कळूनच गेले आता
जग केवढे आहे त्यावर हसणे
अवलंबूनच नाही
विसावा मिळणे वा न मिळणे

मासे हसत नसून हसतोय
तो अवकाश माझी पाठराखण करत
--- ००० ---

अर्थ शोधण्याचे काम

कडीकुलुपाची सोय हवीच
गोड बोलता आले म्हणजे
भिंतींची भीती गेली असे होत नाही
अव्यापारेषू व्यापार
काय
आणि गाढवापुढे गीता
काय
मिळेल त्या कोणत्याही दगडावर
धार नाही लावता येत भाषेला

रस्ता पायाखालचा असला
तरी रात्र आहे विजा चमकताहेत
निर्मनुष्य आहे आधाराचे दार

पाहुणचार म्हणून
एका बैठकीत
फत्ते व्हायला हवे
अर्थ शोधण्याचे काम

खूप विचारवंत जमले
तर अधिकतम म्हणजे फक्त
अनेक शक्यतांची ट्रायल न घेता
जमेल प्रेषित होणे बहुमताने
पण कुणाला वाचवता येईलच
असे नाही

इलेक्ट्रॉनिक्स च्या ऐवजी
वेगळाच काही लागला असता मार्ग
तर आज हिमालय सापडला असता
सह्याद्रीच्या पायथ्याशी आणि
पाण्याऐवजी स्वप्न चालले असते तहानेवर
--- ००० ---

फॉर्म

माझ्या डोळ्यांसमोर
आता कोणताही फॉर्म नको आहे
रकाने सह्या कागदपत्रे
हे काहीच नको आहे
वाटल्यास तुम्हीच भरा माझी माहिती
चुकीची भरलीत तरी चालेल
आहे तेवढे बास आहे

फार फार तर काय होईल
नंतर कुणी म्हणेल
की याच्या नावातच मुळात
चूक झालेली होती आणि वयातही
आणि याच्यावर गुन्हे
कोणतेही नसले दाखल
तरी लोकांना माहीत होते
हा खोटारडा चोर लंपट खुनी
आणि आत एक बाहेर एक असा
दाखवायचे आणि खायचे दात
वेगवेगळे असलेला होता
याने केलेला भ्रष्टाचार
उघडकीला नाही आला
पण याच्या सहकाऱ्यांना विचारून बघा

किंवा तुम्ही म्हणाल
तसे विशेष काही नाही दिसत
आक्षेपार्ह चुका काय
सर्वांकडूनच होत असतात
चांगला होता गेला बिचारा

तुमच्या मनाला दरदरून घाम फुटल्याने
नीट भराल तुम्ही तुमचा फॉर्म
--- ००० ---

### नाट्य

निसर्ग आडवा येतोय जरा
खरे तर तेही ओलांडू शकेल मन
पण वाटतेच अन्यथा
सहज होता आले असते गरुड
आणि वाजवता आली असती बासरी
सार्त्रच्या नाटकात
फक्त शेवटालाच का असे ना

माझ्याही नाटकांतून
नसायचे फारसे अतिनाट्याचे
धक्के टक्के टोणपे चपेटे
पार्श्वसंगीत तसे
कमीच राहात आले आयुष्यभर
नेपथ्याला असत काही मोढे
आणि एखादी पडकी भिंत

सर्वात सनसनाटी
नाट्य घडले
ते कवटीच्या आतल्या भागातच
आधी मी एकटाच प्रेक्षक
कर्ताधर्ता सर्वच
आणि नंतर तर
नुसतेच नाट्य
रिकाम्या थेटरात

बरे ते बोलायचीही चोरी
माहिती आहे ना मला
सांगू नका कुणाला
त्यामुळेच लिहितो मी
या अशा कविता
दिसायला वेगळ्या आणि
आतून वेगळ्याच असणाऱ्या
--- ००० ---

चंद्र फिका

धुक्याने आणि उगवत्या दिवसाच्या उजेडाने
चंद्र फिका पडत गेला
जसे एक मूडी गाणे होते
चंद्र मुका चंद्र मुका
पान पान झाड मुके

ही निसर्गातली घटना थोडीच आहे
हे तर मनाचे नक्षीकाम
शोभायंत्र वस्तुरूप आणि आक्रमक
माझ्या हळवेपणाला विरोध कराल
तर मारून टाकीन असे

गरीब बिचारे हिंसक लोक
विचारतात कोण जबाबदार
त्यांच्या या तडफडत्या चिंध्यांना

हवेत गप्पा नकोत नेमकी
माणसे दाखवा

जेवून खाऊन सुस्त पडलेले
सगळेच अजगर दिसतात
भयानक आणि सशस्त्र

त्यांनाच फक्त दिसतो
चंद्र सुंदर नाजुक आणि हळवा
निसर्गसौंदर्य दिसायला
मन लागते तसे ते म्हणतात
आम्ही प्रेमळ आहोत

हळवी प्रेमळ नाजुक
मानवजातच ही फिका फिका चंद्र
सुंदर
--- ००० ---

कोवळी बाळे

दाराबाहेर उभी आहेत जी कोवळी बाळे
त्यांना फक्त एक सिनेमा पाहायचा आहे
तोवर ती द्यायला तयार आहेत
त्यांच्या नखांना मधली सुट्टी
तेवढया वेळात करून घ्या तुम्ही
सामानाची ने-आण आणि त्या वेळी समजा
खिदळले काही कळीचे मुद्दे
तर तुमचे तुम्हीच वटारायचे आहेत
तुमच्या हृदयाचे कप्पे किंवा
बुजवायचे आहेत जुन्या अपराधांचे व्रण

नंतर नका म्हणू की कामगार
घरी जाण्याआधीच का नाही
आठवण केली सर्रास चिघळणाऱ्या मतभेदांची
कारण सुमार वकूबाचे विद्वान
टपलेलेच असतात
काही ना काही दोष काढायला
त्यांना न झेपणाऱ्या नकाशांत

आपापले खुजे थोटके हात आणि दात
सतत विचकत राहतात ते
त्यांच्या मानसिक निरक्षरतेचे भांडवल करत
आणि मग्न राहात
एकमेकांच्या गरीब गौरवात

असोत वा नसोत कुणाचे पूर्वज
स्वप्नात येऊन चिन्हे सांगणारे
या प्रांतात येताच कामा नये
जे जे नाही आवडत त्या निरक्षर बाळांना

हे डिस्टर्ब न करता पेटवा तुमची
सर्जकता काय असेल ती
--- ००० ---

नोकरी

झक मारत करावेच लागे काम
तासंतास नोकरी टिकवण्यासाठी
मग एक दिवशी साहेब म्हणत सभेत
या सर्वांनी कामे केली वेळकाळ न पाहता
तहानभूक विसरून स्वत:च्या
कुटुंबाचीही काळजी सोडून
त्यामुळेच हे शक्य झालेले आहे
तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांसह
तो हसे किंचित पराभूत आनंदात

मुलाला काही बोलावे
तर त्याचे माथे भडकत असे
त्याला काहीही विचारले तर
त्याला क्रोध अनावर होई
पत्नीकडून तर डबोलेच मिळालेले होते

एका मित्राची नोकरी गेल्याने
दारूचा डबल खर्च होई
घरात वाद होत

आपण स्वत:च का करू नये भडकूगिरी
आपणही का होऊ नये बेफिकीर
आपल्यालाही काही सहन नाही होत
हे नाही चालत ते नाही चालत
असे का घाबरवू नये सगळ्यांना

जाऊ दे नोकरी बोंबलत
असल्या माणसांची हवीय कशाला काळजी
असेही विचार येत
पण ते तर नकळत व्हायला हवे त्यांचे
तसेच होत असणार जाऊ दे
या विचाराने तो पुन्हा पराभूत हसे
--- ००० ---

एकमेव

कोण कधी आले आयुष्यात
प्रत्यक्षात किती कल्पनेत किती
व्यक्त किती अव्यक्त वा अस्फुट किती
हे सगळे आता एकवटले आहे
फक्त तिच्यात जी आता
एकमेव आहे खरी आणि खुरी

इतकी की विचारत होती
मी घेऊ का शोध
तुझ्या त्या अस्फुट स्मृतीचा
तेव्हा ते न घडलेले
आता तरी घडावे तुझ्या आयुष्यात

त्या सगळ्या मिळून तीच असणार आहे
एकमेव
याची तिला कल्पना होती
ना मत्सर ना द्वेष
मला माफ करायचाही
नव्हता काही प्रश्नच

तिचा सूर्य उगवतो
माझ्या वर्तमानात
आणि मावळायला ती येते
माझ्याच मनाच्या अंधारात
गुप्तपणे सहज

ना तिला कुठले बंधन ना मला
सर्व अवयवांचे उल्लेख आकाशाइतके सोपे
आडकाठीच नसलेले कसली असे क्षण

मीलनाच्या अभावाचीही त्रुटी समाप्त झालेले
--- ००० ---

टोपी

लिहितो मी हजारो कविता
सहज
मला खूप व्याप वा मेहनत नाही लागत
कारण ना हेतू ना अर्थ
मग मिळवायचेय तरी काय

ज्या ज्या वाचकाला वाटेल
त्याने त्याने वाचत जावे
मध्येच एखाद्या
कवितेची टोपी बसेल फिट
मग पुढे वा सगळे
वाचायची गरजच नाही

टोपी बसणे फिट म्हणजे
डोकेच अदृश्य होणे
आता काहीच नको असे होणे

तुमच्या साहित्यातल्या
विभागांची मला फिकीर नाही
माझी काही
देन आहे का कुठे ते द्या फेकून

समोर येते ते कविताच असते
नवी आणि ताजी सगळेच
शिळ्या आयुष्याच्या
सडक्या निवडक फुशारक्या
इथे नाही सापडणार
एकही समूहगान मिरवायला

कविताबिविता जा विसरून
--- ००० ---

अस्ताव्यस्त

हा काही अस्ताव्यस्तपणाचा प्रचार नाही
हे फक्त एक अस्ताव्यस्ततेचे माध्यम आहे
अस्ताव्यस्तपणाने अस्ताव्यस्तपणाशी
बोलण्याचे

शांततेचे शब्द वाटतात खोटे
अस्ताव्यस्तपणाला
त्यामुळे त्याला फसवावे लागते

त्याचेच जग त्याचीच भाषा चाललीय
असे दाखवत बोलावे लागते
ही युक्ती तशी एक
अस्ताव्यस्तपणाच असते खरोखरचा
खरेपणासाठी केली फसवणूक तरी
तिचा उगम असणार
शब्द पिरगाळण्यातच

मनाची कोणती तरी अवस्था लागणारच ना
अगदी हिंसा नको असे म्हणायलाही
हे पाहून कुणालाही वाटते
त्यात कायाय हे तर
कुणालाही शक्याय
नुसते उलटेसुलटे बोलत जायचे की झाले

उलट सतत काळजीच घ्यायची की
अर्थ निर्माणच होता कामा नये
काहीच सलग असताच कामा नये
ना विषय ना आशय ना अर्थ

हेही मस्त आहे पाहावे करून लगेच येईल कळून
किती गुंतलेय मन खरोखरच्या अस्ताव्यस्ततेत ते
--- ००० ---

उपदेश

उपटसुंभ जळाला तरी
पीळ देईन मिशीला
तूप लावून खाईन अन्यथा
उपाशी राहीन असा प्रकार

असे अहंकाराचे मुबलक असतात प्रकार
खाली करणारे गर्वाचे घर
पाहावे बांधून आणि लग्नाच्या गाठी
सोडवाव्यात कोर्टात पायरी
न चढता तसेच न सोडता
ज्यांची भीती वाटते तिथे
तेच ब्रम्हराक्षस म्हणून
हार मानावी कधी हार
कधी जीत असे म्हणत

कभी खुशी कभी गम असो
की दिल दिया दर्द लिया असो
की चार दिल चार राहें असो
शेवट होणार
हरे राम हरे कृष्ण हाच

तुझ्या नामात रे गोडवा म्हणताना
तोंड वेंगाडावेच लागते काकुळतीने
भिंगुळवाणे होत
याहून जास्त आता फारसे
नाहीच काही आठवणार हे ओळखून
पळवावेत वेगात सर्व उपदेश हेच बरे
पळा पळा कोण पुढे पळे तो म्हणत
जोवर कुणी सांगत नाही तोंड काळे करायला

सारांश दुधाने तोंड भाजले म्हणून अंथरुण पाहून
पायांची धूळ भाळी का करावी धारण
--- ००० ---

देशपांडे

राहुल चोक्सी
खातो अमेरिकन चॉप्सी
तो आहे हिऱ्यांचा व्यापारी
तिथे त्याची टोलेजंग मातबरी

देशपांडेला नाही माहीत
दिसतात तरी कसे हिरे
तो खातो पाऊस
आणि रोज विविध वारे

एवढा मोठा धंदा
म्हणजे रक्षणफंड
द्यावा लागणारच
जशी त्वचेला कंड

कोणत्या पक्षाला कधी
कसे ठेवायचे खुश
हे चोक्सीला नाही कळत
तो देशपांडेला ठेवतो ठेवायला पाळत

देशपांडे आहे बराचसा डावा
त्याला ज्यांचा येतो राग
तेच असतात तारणहार
चोक्सीला तो सांगत राहतो असा असा वाग

देशपांडे आहे ईमानदार
व्यक्तिगत तत्त्व काहीही असो
चोक्सीशी तो एकनिष्ठ राहतो
म्हणत मापात पाप मुळीच नसो

असा पसारा वाढत जातो
हिरे पाहिलेला देशपांडे नाइलाजाने फसतो
--- ००० ---

गलका

धूळ म्हटली की आठवतो शाळेतल्या मुलींचा
गलका प्रत्येकीच्या आईने सांगितलेला
डबा खाऊन झाल्यावर न बोलता
आवरायचे आपले मन
आणि मैदानावर पाऊल ठेवताच
विसरून जायचे कोण काय म्हणाले ते

कितीतरी वर्षे उलटली याला
बाजारातून भाजीपाला घेतानाही
नेहमीच मोजले स्पर्शांचे व्रण

सक्तीची भीती आकाशभर होती
म्हणजे सतत
तयारीतच असायचे जणू
मनाचे केस उभारून

मनाशिवाय एक क्षणही
नाही पाहायचे
अगदी एखाद्या चिमणीचे पिल्लूही
मग या स्त्रीबाहेर
कसे कधी टाकणार पाऊल

स्वातंत्र्य मागण्याची
शक्यता लक्षात घेऊन
आधीच न्यूरॉटिक करून
जगाबाहेर टाकणेच तर आहे हे

धूळ येतच राहते आतून बाहेरून परग्रहावरून
सर्वच गाडू पाहणारी सर्वांना समान झटकताही येते
पण आपण स्त्री असल्याचे मनात
मनाविरुद्ध का असे ना सतत
मुसमुसत राहिलेच पाहिजे
--- ००० ---

चांगल्या कवितेची लक्षणे

मुख्य म्हणजे घिसेपिटे काहीच नकोय
जुने जाऊ द्या आजही जे
हजारदा गिरवले जातेय ते नकोय

बघा मी कसा करुणामय
आणि बाकीचे कसे संवेदनाहीन
बघा मी कसा न्यायाचा भोक्ता
आणि बाकीचे कसे अप्पलपोटे
मला चैन नाही पडत
आणि तुम्ही खाताय चायनीज फुड

हे बघा माझे मन
कसे छान हळवे आहे
प्रेम विरह आई गेल्याचे दुःख
यांनी कसे युक्त आहे मुलायम
कामाच्या धबडग्यात
तुम्ही विसरून गेला आहात
मी पुन्हा जागे करतोय तुमचे स्वत्व

त्यापेक्षा वेगळा वेडेपणा चालेल
वाचकाला निदान दिसेल
च्यायला हेही घडू शकते मनाचे
प्रत्येक वेळी आपटले जायला हवे
अटळ क्षितिजरेषेवर मनाचे डोके

खूप झाले कौशल्य आता
नकोय ती वातड सजावट
अनुभवातूनच हवीय
अनुभवहीन कविता
मान्यताप्राप्त दीपस्तंभांवर मुतून
ओलांडून दाखवा कंटाळवाणी गटारे
सरसकट अर्थांची
--- ००० ---

ती वेळ

मी हे बोलूही शकलो असतो तुझ्याशी
पण तुझा चेहरा असा जाणवलाच नाही
की हे आता बोलावे मला माहीत आहे
याची जाणीवही नसेल तुला

तुझे सगळे नॉर्मलच वाटत असेल
तुला तुझ्या इतर निरनिराळ्या व्यस्ततेत

काय झाले असते वाद की बेबनाव
खरे तर मध्येच काही
मोकळे क्षण पकडून
मी सुरुवात करू शकलो असतो
पण हे ध्यानीमनीच नव्हते तुझ्या
तर कधी बोलावे
हे माझेच नव्हते ठरत किंवा

हे तसे अर्जंट कुठे आहे
घाईत नकोच कारण तसे हे
महत्त्वाचेच आहे
या विचाराने मी
सामील होत गेलो
तुझ्या उत्सवी वस्त्रांच्या सळसळाटात

आणि आता वाटते आता राहूनच
गेले ते ती वेळ गेली ते औचित्य गेले
पण ते न बोलले गेल्याची रुखरुख

मात्र तशीच राहणार आता कारण
आता ते बोलण्यात काही अर्थच नाहीय
तू हसून लगेच पुढच्या कामाला लागशील
मीच करतोय आता प्रयत्न
ते मनातून काढून टाकायचे
--- ००० ---

आजारपणे

शाळाकॉलेजातली माझी आजारपणे
आठवली की सुरू होते
आपोआप त्यांचे विश्लेषण
जणू काही कुठून तरी उपटून येत ती
माझ्या वाट्याला
असे मला त्या वेळी वाटत असले तरी
आता वाटते की ते तसे नव्हते
मीच ठरवून पडायचो खरोखरचा आजारी
किती माझा नाइलाज किती मी बिचारा
असे मला वाटावे असे मला वाटे
मग तेच आपोआपच इतरांच्याही
डोळ्यांत दिसे ओलसर

मला बहुतेक हे अडथळे आवडत छुपेपणाने
आपण त्रासात असण्यात मला सुरक्षितता वाटे
स्वत:ला मी फार नीतिमान समजे
त्यामुळे मुली छे छे महत्त्वच नाही द्यायचे फारसे
मनातले कोण बघायला येतेय
त्यामुळे एकूणात हिंमतच नव्हती
प्रेमात पडण्या-पाडण्याची
त्याचे मला हे वेगळे समर्थन मिळे
सहज घडू शकले असते ते
पण मी आजारानेच बेजार असल्यावर
कसे शक्य होते ते

तपासण्या सगळ्या नॉर्मल येत
डॉक्टर हसून म्हणत याला
मॉर्फिन देऊन झोपवूनच ठेवायला हवे
म्हणजे हा आजारी नाही पडणार

योग्य वेळी गेले आजारपण
न्यूनगंडही गेला हा भाग वेगळा
--- ००० ---

डीझेल

इटालियन कवितांचे इंग्रजी अनुवाद
वाचताना एकच कळते जेव्हा
मी चालवत होतो व्हिकी मोपेड
तेव्हा माझ्या हायवेवर सांडलेले होते डीझेल
आणि घसरून मी फरफटलो होतो काही फूट
मध्यावर पडलेलो असूनही मी
मागून वा पुढून काहीच नव्हते आले भरधाव
समोर बऱ्याच अंतरावर थांबला होता एक ट्रक
तेच डीझेल पसरले होते माझ्या मेंदूवर
आणि वाटत होते यांतल्या बऱ्याच कविता
तर इथे वाचल्या जायला हव्यात
ते तर घडणार नव्हते का म्हणून वाचकांनी सोडावे
त्यांचे व्यायामाचे अग्रक्रम आणि हॉटेलात जाण्याच्या
वेळा पण मी तर वाचतो आहे माझ्या मेंदूत उगवतील
खजुराची झाडे आणि सौम्य प्रकाशात
मी जाईन चालत अनेक रस्त्यांवरून
कधी प्रेमाने बोलत कधी वाद घालत
त्या त्या वेळी असणारच या कविता
माझ्या पोषाखात शब्दांत दृष्टीत
अशा त्या पसरतच राहतील
अपघात म्हणूनच पण इजा न होता
इथल्या लोकांना काळणारही नाही
कधी कसे माखले गेले आपले मेंदू
त्या अज्ञात डीझेलने

या विश्वाचा बंदिस्तपणा सैल करण्याचे काम
त्यात आंतर्रचितच असणार यात शंकाच नाही
अन्यथा मी तरी या कविता वाचायची
काय गरज होती तिकडे या कविता न जाणो
विस्मृतीतही गेल्या असतील कवी तर
कधीच मरूनही गेले असतील घटनांचे महत्त्व
न माजवता इथे घडत राहते काही ना काही ते हे असे
--- ००० ---

न आवडणारे

न आवडणारे काही घडत नसताना
मस्त निवांत असतात सर्व
तत्त्वज्ञानाची छत्रचामरे
भर दुपारीही हळुवार झुळुकी खात
जेवणानंतरच्या अभावात
कोणत्याही आव्हानाच्या अन्यथा

सर्वच विचारांचे लोक म्हणतात
खूपच घडू लागलेले आहे आता
मुळीच न आवडणारे खूपच
आक्रमक व्हावे लागेल
जर वाचवायची असेल मानवजात तर

डोळ्यांदेखत जेव्हा फुटतात
दुफळीचे वा फसवणुकीचे फटाके
तेव्हा विचार जखडूनच टाकतात
तीव्र उष्णतेने

कुणाचे विचार विष कुणाचे अमृत
हे ठरूच नाही शकत एकमताने
एकमताने फक्त एकच जाणवू शकते
विचाराला सतत बाजू घ्यावी लागते
आणि सर्वहिताच्या आणि हक्क
डावलल्याच्या भावनेत होतो उद्रेक
कुठेही विमाने धडकवणारा

संपर्क बंद होतात रेंज जाते
स्विच ऑफ केलेली मने
साधू पाहतात शांतता म्हणत
आपण विचारी आहोत म्हणूनच
असू शकतो श्रेयशोधक या हवेत आणि
जगाचे न्यायालय मूढपणे पाहात राहते
--- ००० ---

आल्सी

ऑफीसचे जाऊ द्या सहज म्हणून
फिरायला वा त्यालाच फिरवायला
ती बाहेर पडे तेव्हा तो आल्सी असेच सोबत
आळशी नव्हे आल्सी चांगला भला दांडगा आल्सेशियन
ती स्वत:ही छानच होती तब्येतशीर

खरे तर चौदा सेकंद वगैरे कुणितरी
काढलेला नियम तिला नव्हता माहीत
पण कुणीतरी नको तिथे एकटक पाहिल्याने
ती एकदा चिडली होती ते आल्सीने
लक्षात ठेवले होते रस्त्याने जातायेता
तो बारीक लक्ष ठेवून असे कुणीही
तिकडे पाहिले की तो भुंके
सुरुवातीला तिला काही कळत नसे
नंतर कळू लागले तसे तिला किंचित हसू येई
अभिमानही वाटे पण नंतर जरा

कंटाळाच येऊ लागला याचा
कुणाच्या डोक्यात नसलेले उगीचच
घडतेय असे वाटू लागले आपण बुद्धिमान
असूनही जणू एक सुखाची वस्तू होतोय
असे तिला वाटू लागले

मध्यंतरी तर नेमके एखाद्या हीरोकडे लक्ष वेधून
आपल्याला हृदयरोग व्हायची हा वेळ आणेल
की काय असे वाटायचे तो होऊ नये म्हणून डॉक्टर
काही कुत्रे-मांजर पाळायला सांगतात
अहंकारपोषणासाठी हे आठवून हसू यायचे तिला

यापेक्षा लग्न करून एखादा चांगल्या ब्रीडचा
नवराच का पाळू नये असे तिला वाटू लागले
तो निदान तारतम्य तरी पाळेल या विचाराने
--- ००० ---

काळ

सूर्याच्या उष्णतेतून निघालेला काळ
सापडतो शाळेतल्या पोराला मैदानावर
तो ठेवतो त्याला दप्तरात
संध्याकाळी ते दप्तर तो विसरतो बागेत
आठवण झाल्यावर जातो तो त्याच्या आजीबरोबर
तर अजून तिथेच असते ते दप्तर पडलेले

नंतर पंचवीस वर्षांनी तो पुन्हा जातो त्याच बागेत
तर पुन्हा त्याला सापडते तेच दप्तर तो खुश होतो

त्यानंतर पंचवीस वर्षांनी मात्र तो घाबरतो
पुन्हा सापडेल की काय तेच दप्तर

आता मात्र तो बागेत जाणे टाळतो
पुन्हा सापडले तर आता मात्र तो भ्रमच ठरेल

तो सूर्याला नमस्कार करून सरळ बारकडे जातो
--- ००० ---

फळात कीटक

फळात कीटक एवढे आकाश
असे म्हणता म्हणता
अनुभव वाढत गेला
पुस्तकसंख्याही हजारोंत गेली
संग्रह पाहूनच अचंबित होत राहिले
येणारेजाणारे पाहुणे

डोळे थकू लागले मेंदू नाकारू लागला
अधिकाचे ओझे विसरू लागला
कालचे आज तेव्हा आले लक्षात
आता मोजणीची वेळ आली आहे

मोजणीकारांना बोलावले
योग्य ती लाच दिली
चालू रेटप्रमाणे
एकूण साठा तरी
स्पृहणीय झाला आहे
याची तरी निदान
नोंद व्हावी हीच इच्छा होती
बाकी तसे कुणीच
समजूतदार वा तर्क पाळणारे
वा विनम्र सत्यान्वेषी नसल्याने
फड जिंकणे
हे कधीच पुराणजमा झालेले होते

तो आणि त्याचा एक मित्र
दोघेही भूमिका घेत
सर्वहिताचे काय आहे
यावर त्यांच्यांत खडाजंगी असे
भूमिका न घेणाऱ्यांना दोघेही म्हणत
कुंपणावरचे आपमतलबी शेपूटघालू
भित्रे असंवेदनशील स्थितिवादी आणि हलकटच
यावर त्यांचे एकमेकांविरुद्ध एकमत असे
त्यामुळे दोघांनाही बीपी आणि मधुमेह होता
कधी कधी त्यांना कळे
आपण असेच सर्वहित पाहात राहिलो तर
आपणच लौकर खलास होऊ

आपण टिकल्याशिवाय सर्वहिताला
बळ कसे मिळेल
म्हणून मग त्यांनी ठरवले की बाबा
सर्वहित संभाळायचे असेल तर
सर्वहिताचे विचार आणि वाद
पूर्ण टाळावे लागतील
खरे तर आणि किंबहुना
ते मनातही काही राहता कामा नये

त्यांचा एक मित्र कम्युनिस्ट कट्टर
सर्वहितदक्ष असाच होता
तो म्हणे जे जे काही वापरावेसे वाटेल
त्याला त्याला धार असायला हवी
त्यामुळे आपलीच बोटे कापली गेली
वा कुठे लागले रक्त आले
तरी हरकत नाही तो होता एक लेखक
त्याने आधुनिक हितोपदेश नावाचे
एक पुस्तक लिहिले होते
पूर्ण क्रोधयुक्त रक्ताळ आणि लालभडक
भाषेत अंगार ओकत फटकारे ओढत
लोकांना झोपेतून जागे करून
कम्युनिस्ट करायचा प्रयत्न करणारे

त्यालाही हे जाणवलेले होते की त्याचा क्रोध
आधी च्यायला त्यालाच जाळतो
अटॅकचा किंवा स्ट्रोकचा धोका निर्माण करतो
हा त्याला निसर्गाकडून घडणारा अन्याय वाटे
सर्वहितासाठी जिंदगी त्यागणाऱ्याचेच
नुकसान करणारी ही यंत्रणा
त्याला बूझ्वा वाटे
वर्गविग्रहाच्या उदात्त सत्याला
अडथळा निर्माण करणारी वाटे
तो निसर्गाला आयमायवरून शिव्या देई
पर्यावरणनाश होऊन
खलास व्हायला हवा भोसडीचा
असे तो म्हणे मग त्याचेच कॉम्रेड
आणि काही इतरही म्हणत
हे तर वाऱ्याशी भांडणे झाले
वेडा म्हणतील लोक आणि एरवी

जो मिळाला असता पाठिंबा
तोही नाही मिळणार

तर त्या पुस्तकात तोही नकळत
तर्काला बळी पडत गेला होता
आणि अत्यंत प्रामाणिकपणे प्रांजळपणे
आणि म्हटले तर परखडपणे
त्याने त्या पुस्तकाचा शेवट
असा केला होता की बाबा कम्युनिझम
यायला हवा असेल तर सर्व
कॉम्रेडांनी सत्वर
सोडून द्यायला हवा कम्युनिझम

ते एक विनोदी पुस्तक म्हणून
हे दोन मित्र वाचत
कम्युनिस्टाला हसत पण त्याच वेळी
आपलीही पुंगी टाईट झाल्याचे
त्यांच्या लक्षात येई
सत्ये वेगवेगळी असली तरी
निसर्गाने प्रत्येक सत्याला
बळच द्यायला हवे असे त्यांना वाटे
या मुद्यावरून तेही निसर्गाला शिव्या देत

काही बाबतीत आपण एकमेकांचे पटणारे होतो
आहोत याची त्यांना लाज वाटत राही
--- ००० ---

इम्प्रेशन्स आणि आपुलकी

१

माहिती आणि पुरावे
यांचे प्रचंड साठे
हेही आणतात तेही आणतात
त्यातून निष्पन्न काहीच नाही होत
जनताही कोणताच निष्कर्ष नाही मानत
त्यामुळे असे ठरते की कुणीही
नुसती मते वा इम्प्रेशन्स मांडावीत
यासाठी पूर्ण अभिव्यक्तिस्वातंत्र्य ठेवावे
शक्य तो व्यक्तिगत बदनामी न करता
बिंधास्त मते मांडावीत
बेसुमार अनिर्बंध वा अ-पारावार
त्यातून ज्याला जे घ्यायचे ते
जो तो घेईल आणि व्हायचे ते
होईल ते योग्यच होईल

२

तो झेंडा म्हणजे वाईटच असे काही नाही
बघा ना त्या ठिकाणी त्यांनी
कशी योग्य भूमिका घेतलेली आहे
सत्यसमर्थक अनुकूल आणि पोषक
तसेच तेही म्हणतातच ना
आपण काही फॅसिस्ट वा हेकट
वा मूलतत्त्ववादी नाही
कधी असे कधी तसे
हे चालणारच मुळात आतून
आपण आपुलकी बाळगतो
हेच महत्त्वाचे छोटेमोठे काही
चूक-बरोबर घडतच असते
ते द्यायचे सोडून
--- ००० ---

मैफल

एक चेहरा असा की मी जाणतो
संगीतातले सगळे बारकावे आणि पेच
क्षणात ओळखू शकतो मी तुझी चूक
दुसरा आणतो चेहऱ्यावर आश्चर्य
आणि एका वळणावर झटकन पुढे करतो हात
एक आहे तटस्थ हवेत असे काही
प्रतिष्ठित दिसणारे श्रोतेही
एक बाई आठवताहेत त्यांनी
तारुण्यात ऐकलेल्या मैफली
आणि भुलवलेले गायक
एक सुरकुतलेला चेहरा प्रगल्भ
पूर्वी अनेकांना साथ करून
आयुष्याने मला खूप दिले म्हणणारा

एकीकडे घेई छंद आणि दुसरीकडे
बगळ्यांची माळ दोन्ही हवे
थोडे हे चॅनेल थोडे ते असे करावे
असे करूनही हावरटपणा
शमतच नाही च्यायला
हे गायक खरेच ग्रेट
इतका साठा असून डोक्यात साले
एका वेळी एकच नीट
गाऊ शकतात इतर सगळे विसरून

एक श्रोता आठवतोय
२००१ चा सवाई गंधर्व आणि एकाला वाटतेय
मीराचे भजन हवे होते परवीनचे

एका चॅनेलवर एक दिलखेचक सुंदरी
करतेय निवेदन दुसरे बिचारे गरीब
जाऊ कहां बता ए दिल
हे गाणे खरे तर विजोड आहे या वेळी मनात येणे
--- ००० ---

एकच पक्ष

एकच पक्ष आहे
ज्यात ढोंगी लोक नाहीत
दुटप्पी वा आवजाव घर तुम्हारा
असेही नाहीत फक्त एकनिष्ठ असून
धगधगते अंगार आहेत
ते पूर्ण सत्यवान असल्याने
त्यांचे संताप सात्त्विक आहेत
एक शब्दही त्यांना
त्यांना न पटणारा नाही चालत
ते लगेच धावून येतात तुटून पडतात
ते टपूनच बसलेले असतात टेहळणी करत
ते सतत धार लावत असतात
त्यांच्या शब्दांना विचारांना कलेला

बोटचेप्यांना ते शिव्या देतात
नोकरदारांना कान पाडून राहावे लागते
याचा त्यांना राग येतो
एकूणात सतत क्रोधच असतो धगधगत
त्यांच्या मनात रक्त सतत उकळते असावे
आणि आपण सोडून सर्वांना
सतत शिव्या देणारी हवी जीभ
ही असते त्यांची मूलभूत जीवनगरज

बेसिक भौतिक सोयी आणि सुखे
न्यायाने आणि समतेने असायला हवीत
निदान जमेल तेवढ्या भागात
यासाठी ते हिंसक होतात पण फारच थोडे जग
आपल्याला जुमानते याने ते विद्ध असतात
असे का होत असावे हा प्रश्न ते अप्रस्तुत समजतात
कारण सर्व गोष्टींची उत्तरे त्यांना माहीतच असतात
पराभूत क्रोधात ते जिंदगी व्यतीत करत राहतात
ते सोडून इतर सर्व माणसे त्यांना याला जबाबदार वाटतात
--- ००० ---

आयुष्य

१

धावत धावत हसलेले भविष्य
एखाद्या गडगडाटाचे वारसदार
असल्याप्रमाणे गृहप्रवेश करते
वाईट वाटते अभयारण्यातही
घडयाळ वापरावे लागण्याचे
तसे तर कधीच मागितलेले नसतात
कुणाच्याही डोळ्यांतले अनमोल
कटाक्ष टीकात्मक वा अधाशी
कारण तयारीच असते कधीही
दगडी एकटेपणात बंद होण्याची

२

काचांचे महाल आणि जवळच्याच बागेतले
उद्दाम कारंजे यांचा संगम म्हणून
आठवणीत राहिलेले एक स्वप्न
शाळकरी वयापासून
लैंगिक उद्रेकांपर्यंत
हटकून थांबवते विशेषणांचे उत्सव
आणि पूर्णविरामांचे उद्गार

३

अगणित म्हशींचे समुदाय
बोलावतात कावळ्यांना
अंधार पडण्याआधी
शपथा घेण्यासाठी की यापुढे
इंद्रधनुष्य असणार नाही जेवणात
आणि औषधासाठी वापरले जाईल फक्त
लैंगिक स्रावांचे मिश्रण एकटेपणाच्या कुपीतले
--- ००० ---

आवर्तने

पूर्ण अधोगतीला जाण्यापूर्वी
आधी निव्वळ जगण्याचे पीकच येते धोक्यात
ना अति पावसामुळे वा ना त्याच्या अभावामुळे
केवळ ताबाहीन गोठत जाते बसल्या ठिकाणी
अनुभवांचे भांडार एखादा मच्छर
गरगरत पडत जावा जसा जीर्ण पानाप्रमाणे

ज्या गाण्यांचे खूप माजवले स्तोम
ती सगळी होती समूहगीते
साखळी करून निवडणुकीत
एकत्र जिंकण्याचे मनसुबे पाहणारी
आत्मविश्वास आणि भिकारडेपणा
यांचे बहुजनमान्य मिश्रण असलेली

घरोघर वाळवी लागलेली मने
सक्तीने जेवणारी पंचपक्वान्ने
उष्ट्या ताटांत पुन्हा पुन्हा
आठवत राहणारी
कधीतरी पाहिलेली सुंदर निसर्गदृश्ये

काहीही केले तरी हीच आवर्तने घुमत राहणार
किल्ली संपेस्तोवर
आणि सर्व मंदिरांच्या घुमटांतून
पडत राहणार सतत
चोरलेल्या चपलांचा पाऊस

हेच बनते कुणी ना कुणी
पुढारी असण्याचे समर्थन
देव असो वा नसो
या हलकट पोशिंद्याला अर्पण
सर्व श्वास सुखदु:खे आणि उपभोग
तो नेईल तिकडे तसे जाऊ दे हे पाणी
--- ००० ---

चिमणी

मी खरे ते बोलून टाकणार. मी एक बाजारबुणगा माणूस आहे. म्हणजे पूर्वी फौजेबरोबर काही इतर माणसे असत त्यांतला एक. इतर कामांसाठी किंवा बिनकामाचीही. मी प्रत्यक्ष तो तसा नाही पण माझा अर्थ तोच आहे.

खरे तर माझा अर्थ मी कधी शोधायचा खास निकडीने असा प्रयत्नही नाही केलेला. शिवाय, जगण्याचाच काय अर्थ याचाही शोध घेतात म्हणे काहीजण. मी तेही नाही केले. मी साधा विचार केला. शोधणार कोण, मीच ना, मग, माझ्या बाहेरचे असे काय सापडू शकणार आहे ? जगण्याचा अर्थ काय झाडावरून थोडाच पडणार आहे सफरचंदासारखा ? की ओसंडून वाहणार आहे पाण्यासारखा माझ्या वस्तुमानामुळे ? तसे मी इतरांनी सांगितलेले जगण्याचे अर्थ खूप वाचले/ऐकले/पाहिले. उत्सुकता होतीच हो, नाही कशाला म्हणू ? पण काही सापडल्यासारखे नाही वाटले. ते डोक्यात जमा झालेले मी कधी कधी थोडेफार आठवू शकत होतो, इतकेच.

आपण एका बंदिस्त खोलीत जगतो असे फीलिंग यायला लागल्यामुळे एकदा असे वाटूनही गेले की खरेच साले असे जगून पाहायला हवे. बंद खोलीत. पण मग नोकरीचे काय ? निवृत्त झाल्यावर पाहू, असे ठरवले.

मी कुणाला काही सांगितले नाही. माझे अर्धे मित्र नास्तिक होते आणि अर्धे धर्मद्वेष्टे. पण त्यामुळे आमच्या मैत्रीत काही फरक पडत नसे. मला ते आस्तिक सर्वधर्मसमभावी म्हणत. एक प्रकारचा गौरवच तो. पण मला अशी माझ्या वा जगण्याच्या अर्थाबद्दल कधी कधी उत्सुकता वाटते, हे त्यांना मी सांगितले असते तर ते मला हसले असते. ते म्हणत की आपण आपली बुद्धी वापरत जगतो की नाही – त्या बुद्धीला त्या त्या वेळी जे जे महत्त्वाचे वाटते तोच एकूण अर्थ. दुसरे काही असूच नाही शकत. मग जगात इतके तत्त्वज्ञ, धर्मप्रसारक, संत होऊन गेले ते काय झक मारायला, असे मी त्यांना विचारे. ते म्हणत, अरे, ते फक्त तर्कशास्त्राची प्रगती करण्यासाठी होते. बाकी काही नाही. बघ ना, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष – हे सगळे तेच तर आहे. याच्यावर, त्यांना न सांगता, मी एकदा इहवादाच्या बाहेरचा उपाय करून टाकला. ही मीच कल्पिलेली आभासी माणसे असून माझ्या शोधाला गती देण्यासाठीच ती या जगात आहेत, असे मी ठरवून टाकले.

मी कधी कधी एकटा फिरायला जाई. ते म्हणत, असे कधीही कुणी एकटे राहू नये. कशाला तो खिन्नता रोगाचा धोका ? पण मी त्यांना जुमानत नसे. फिरून येताना मी एकटाच वाटेतल्या बागेत जाऊन तिथल्या बाकावर बसे. इतर स्त्री-पुरुष, खेळणारी मुले, पक्षी यांचा मला काही अडथळा होत नसे. पण अशा निरनिराळ्या जागा, इतकी माणसे जगात असणे हेच मला गूढ वाटे. मुख्य म्हणजे या वाटण्याची मजा येई.

एकदा एक सुमारे सत्तरीतला माणूस माझ्याच बाकावर येऊन माझ्या शेजारी बसला. सामान्यत: लोकांना राजकारणावर बोलायला आवडते, म्हणून मी तो विषय काढला. तर तो म्हणाला, आमच्या घरातल्या फिरत्या पंख्यावर आपटून एक चिमणी मेली. मीच तिला उचलून बाहेर टाकले. मी तिला वाचवू शकलो असतो का, असाही विचार येतो मनात कधी कधी. पण ती साली माझ्या स्वप्नातही येते. कधी चिमणी म्हणून तर कधी सुंदर स्त्रीचे रूप घेऊन. आणि म्हणते काय, तर म्हणे तुला म्हणजे मला एकटे वाटू नये म्हणून ती आहे माझ्या जगण्यात. मी स्पष्टच विचारले त्या माणसाला, तुम्ही खिन्नबिन्न तर नाही ? यावर तो म्हणाला की मला म्हणजे त्याला खरेच नाही माहीत. पण असणारच हो खिन्न कारण ती चिमणी जरी खरीखोटी कशीही असली तरी ती दुसरीच असणार ना ! ती आणि मी एकच, असे कसे असेल ? इथूनच मला अर्थाचा मार्ग दिसेल असे मला त्या क्षणी वाटले.

--- ००० ---

अभिनय

मंचावरचा तुझा अभिनय
तेव्हाच पोचतो पाहणाऱ्याच्या अंतरंगात
जेव्हा स्वत:ची चाकोरी सोडून
तू घुसतोस तुझ्या पात्राच्या चाकोरीत

हे तेव्हाच घडते
जेव्हा तुला कळलेले असते
तुझ्या चाकोरीचे बिनमहत्त्व

कारण मंचाबाहेरच्या जगात
तू सहज जाणतोस
तुझे नसणे हे असणे म्हणून पेश करणे

मंचाबाहेरची माणसे असोत
की मंचावरची पात्रे
सर्वांमागचे सत्य
एकच असते

हे तुला दिसत असते
--- ००० ---

जग म्हणजे

ते असतात थोडेच पण असतात
अतिशहाणे म्हणजे तेच फक्त शहाणे असे
ते कुणालाही म्हणतात
तुमचा अभ्यास कमी पडतोय
इतिहासाचे ज्ञानच छोटे आहे तुमचे
( त्यांचे इतिहासाचे ज्ञान म्हणजे
महात्मा गांधींना पाच पाने आणि त्यांना
स्वत:ला पन्नास पाने असे असते )
तुमचा तर्कही कमी पडतोय

त्यावर एकजण म्हणतो
मी जातच नाही तर्काच्या मार्गाने
मला नाहीच वाटत तो विश्वासार्ह
तर्का नाही ठाव येथे रिंघावया वाव
हेच मला सत्य वाटते
यावर ते म्हणतात हा तर
भक्तिमार्ग झाला
हे वैज्ञानिक नाही घटनात्मक नाही
यावर उत्तर येते
मग आम्ही घटनाविरोधी की काय
तसे म्हणून तर बघा

जग म्हणजे एकच असे काही नसते
हे कालांतराने सगळ्यांनाच समजते
एकमेकांना मूर्ख समजून उपयोग तरी काय
या शहाणपणावर मिटतो वाद
--- ००० ---

नॉर्मल

माझ्या अनुपस्थितीतले जग असते नॉर्मल
हे अनेकदा पाहिलेले त्या जगात
मला सर्दी नाही होत तरीही मी सतत
पुन्हा पुन्हा का होतो उपस्थित हे शोधता
येते लक्षात उपस्थित असणारे लोकच रोगट
करतात संसर्ग आणि सक्तीने करतात मला
विषमतेचे पौष्टिक अन्न मी खाल्ला जाऊ देत राहतो
स्वत:ला वेदना सहन करत पुन्हा पुन्हा
नाइलाजाने स्वत:ला प्रेझेंट करत
त्या अब्नॉर्मल जगात
जणू खरे तर मी ते सगळे
नॉर्मलच तर
करण्याच्या आहे प्रयत्नात
--- ००० ---

रेटा

आज कुठे गेले माझे दोस्त
रोज सकाळी घिरट्या घालणारे
समोर काही अंतरावर
क्रीडा करत मजेत उलटीसुलटी
वर खाली होत स्पीड बदलत
तरीही मजेत एकमेकांना
धक्काही न लागता
पांढरे शुभ्र

मी काही तो म्हातारा नाही
द फनी ओल्ड मॅन मधला
आपण मरणार आहे ही खात्री असूनही
वाचलेला त्याच्या मनाविरुद्ध
शास्त्रज्ञ त्याच्या एका महत्त्वाच्या
हस्तलिखिताच्या पानांची विमाने करून
मुलांच्या वॉर्डच्या दिशेने सोडणारा
मुले खुश हा खुश असा

खानोलकरांना मी हे सांगताच
त्यांनी एक कादंबरीच लिहिली त्यावर असा

तो पाहायचा गच्चीत कपडे वाळत टाकणारी मुलगी
आणि तिनेच सोडलेली कबुतरे दोनतीन दिवस
न दिसल्याने बेचैन होऊन जिवावर उदार होणारा

मी झालेलो नाहीय बेचैन मी माझ्या
मनाविरुद्ध जगतोय असेही नाहीय
माझ्याकडे जागतिक महत्त्वाचे असे
एखादे हस्तलिखितही नाहीय

मी काही शोधायला जाण्याची शक्यता नाहीय
हे हवेच म्हणणारा मनाचा रेटाही नाहीय
--- ००० ---

वारे

धावाधाव करायची गरजच नाहीय
जे नाहीच आहेत वारे
त्यांनी केले आपले अपमान
वा ते जिंकले वा हरले आपल्याकडून
तरी कुठेही धूळ उडणार नाहीय
जखमाही होणार नाहीयत

कशाला घडवायच्या त्यांच्या प्रतिमा
आपल्या आभासी मनात
आणि का करायचा विचार
आपली पोर्ट्रेट त्यांनी कशी मानावीत याचा

आपल्या मनात तरी असे दिसतेय
की ते आहेत सतत युद्धाच्या पवित्र्यात
त्यांना सहन होत नाहीय
त्यांना न पटणारे जग

खरे तर ते चांगलेच आहेत
सर्व सुखी असोत
हेच तर ते म्हणतात
त्यासाठी मी काय करायला हवे
ते ते मला सांगतात
मी न ऐकल्यामुळे भडकतात

मीच नाहीय तर ते कुठले असणार
खरे तर त्यांनीच घडवलेय जे आहे ते जग
--- ००० ---

एकाच खोलीत

प्रसन्नता विसरलेले खोके
रस्ता  गिळून बसलेले
हॅलोजेन औदासीन्यात
घोंघावत्या छोट्या छोट्या आठवणींत

कधीच न उमलणारे रंग एकाकी
जीभ जाळत पोचणारे
स्वप्नांच्या दलदलीत

कधीच विचारलेले नसताना
निऑन विरहात
कबुतरे येतात जातात
फडफडीचे आवाज करत
आयुष्यात आल्यागेल्यांच्या

दिवसाचे ऊन आणि रात्रीचा अंधार
थांबून राहिल्यावर एकाच खोलीत
वाढत जाते कातरता
आणि मैदानात खेळत असलेली मुले
अचानक परततात आपापल्या कप्प्यांत

कुणीही कुणाला बोल नाही लावत
आणि कुणीही नाही म्हणत
हर सवाल का सवाल ही जवाब हो
जरी बेंबीच्या देठापासून आलेली
अस्वस्थतेची कळ
व्यापून टाकते सर्व काळवेळ

वाटते काहीही करून इथून सुटता यावे
आपले म्हणावे असे कुणीही नसल्याने
पाहात बसावे एखाद्या झाडाचे विभ्रम
वा एखाद्या मृगजळाचे भ्रम
--- ००० ---

मूळ

हे जग आहेच अव्यवस्थित
माझे मन फिरते मर्यादित
गल्लीबोळ आणि म्हणते
माझेच विषारी विचार पसरलेत जगभर
प्रत्येक व्यक्तीच्या माध्यमातून
या माझ्याच संवेदनशीलतेची वाटते मला भीती
ताबडतोब लागायला हवी व्यवस्था
भीतीने मी अधिकच होतो संकुचित
आणि समतेची स्वप्ने बघत होतो पश्चात्तापदग्ध

माझ्या ढोंगीपणामुळे कळते मला अशक्यतेचे मूळ
--- ००० ---

वस्तू आणि विचार

वस्तूंमध्ये नसतो विचार
त्यामुळे मला त्या नव्या वाटतात
मन असते जुने
खरचटलेले भिकारडे
परिस्थिती करून मागणारे
मला अलर्जी न देणारी
आणि वस्तूंचा हेवा करणारे

वस्तू सामावूच नाही शकत मनात
म्हणजेच त्या दिसतात
पण असत नाहीत

आणि अचानक दिसते
मन आहे विचारच
आहे पण दिसत नाही

तोच तो क्षण जेव्हा
वस्तू आणि मन
होतात दोन्ही वस्तूच

आणि सगळेच दिसते
पण असत नाही

मनांचे सम्राट दिसतात
वाद घालत बसलेले
कांदे की बटाटे यावर
--- ००० ---

भाषेशिवाय

भाषेशिवाय लिहिण्यासाठी
धरले कवितेचे कान
आणि मागच्या दाराने आलेले सत्य
पिटाळले चर्चेच्या रिंगणात
तरीही वाटले नव्हते
की निघतीलच काही वेडे
कवीची वाहवा करणारे

उत्तमोत्तम कपडे
म्हणजे काही लय नव्हे
आणि चालही नव्हे
उत्तानपणे होणारी भावनांचे चारापाणी

तटबंदी ओलांडणे
हे नसतेच कधी डोक्यात
त्यामुळे सगळेच
राहतात आत्ममग्न
दु:खात आणि तरीही
खुशालचेंडूप्रमाणे चितारत
अमूर्तात विलीन झालेले
निसर्गदृश्य कोणत्याच
आठवणीशी न जुळणारे

शब्द हवेत पण भाषा नको
ही जादू पाहण्यासाठी
खूप आले काव्यरसिक
पण ही कविता आहे
असे म्हणायला ते घाबरले

असे का घडते आणि मुळात
काही घडते तरी का
हे प्रश्नच कधी न पडल्याने
ते करत राहिले
तुलना आणि मूल्यमापन
कवी काही बोलले नाहीत
उगीचच वाचाळ होत
--- ००० ---

खूप अभ्यास

खूप अभ्यास असलेल्याला दीड
तर कमी असलेल्याला हाफ
म्हणे त्यांची कमिटी सतत
तेलकट आणि तिखट खाणारी

त्यांना वाटे दीडला तरी नक्की
खरे कळत असणारच पण
त्यासाठी दहा लागते की सतरा
की दीड हेच पूर्ण असते
हे कळण्याच्या प्रयत्नात
ठसका लागू नये
म्हणून ते सोडालिंबू घेत

पूर्वी मिळालेले
लालभडक डोळे
ते खिळवत खिळ्यासारखे
जगाला ख्रिस्त समजून
आणि मग सर्वच
धर्मांना म्हणत खोटे कागद

त्यांच्या नादी लागणे
म्हणजे झडवून घेणे
आपल्या व्याकरणातली
सेफ विरामचिन्हे
हे कळत असलेले
मनात म्हणत
झोपलेल्या कुत्र्यांना
त्रास नका देऊ चवताळतील

उनाडपणा वेगळा आणि सतत
उन्हात भाजले जात राहणे वेगळे
या ज्ञानामुळे ते गप्प बसत
--- ००० ---

निधन म्हणजे

निधन म्हणजे काही ध्यान नव्हे
धनही नव्हे त्यापेक्षा निधान ठीक
धान वेगळे ते सोडा
सुखनिधानात तात्पुरते
झोपता तरी येते
समाधान वाटू शकते
समाराधन त्याहून अधिक बरे
वाटत असेल तर
विधानच करा एक
की बाबा एक वेळ
बांधू संधान हळूहळू
पण यामध्ये अंधा कानून म्हणून
कुणालाही नको द्यायला
निजधाम

नुसते शब्दार्थ पाहून
उधाणत जाईल मन
तेव्हा बघा जमते का
कुणालाही विद्ध न करणे

उधारका सिंदूर असो की
सुधारकी जिंदगी
धार नीट असल्याशिवाय
सुबोध कसे होता येईल

आईये पधारिये
बाजार कितीही वधारो
बधीर होण्यापेक्षा कधीही
धीराने राहणेच चांगले
हाच सारांश सगळ्या
साधकबाधक विचाराचा
धोक्याचा का असे ना बांध फोडणारा
--- ००० ---

## वेद्काळ

समजा वेद्काळ
असेल
आता इथे कुठे
पडलाय तो

उगीचच जादूचे प्रयोग करत
तो तेव्हाचा माणूस
आत्ता चहा पिईल
हे रफू करूनही
टिकणारे नाही

राम आधी की अर्जुन
हा नुसताच ठेवला प्रश्न
काडेपेटीत
कुणी भेटायला तर हवे
ज्याला निदान माहीत असतील
प्रदूषणाचे तरी नियम

उत्सुकता शंका
आणि प्रश्न विचारणे
यांनीच तर आलाय माणूस
सर्वनाशाच्या कड्यावर
आणि विकासाच्या
हव्याहव्याशा दलदलीत

आपल्याकडे कोणतेही
राखून ठेवलेले वर नाहीत
जाऊ दे जाणार तेव्हा
आपल्या मनात नको किल्मिष
मन चंगा तो कठौतीमे गंगा
अर्जुनाला कृष्णाने बहुतेक
असेच काही सांगितले होते
--- ००० ---

अणकुचिदार

छे छे माझा नाही संबंध
दुनियेचे वटवाघूळ
तुम्हाला दिसले
तर ते झाले तुमचे संगीत

माझ्या हातावर
बैलाचे शिंग
मी वाजवतो
सैन्य जमवतो
तुम्ही नका लक्ष देऊ

तुमचे असणे
मी नाहीच आणत धोक्यात
फक्त माझे शब्दच जरा
घोळ करतात
पहाट झाली असे समजून
उगीचच पांघरुण घेतात

उलट मीच असतो
घाबरलेला
म्हणून तुम्हाला कळते तरी
की मी आहे
तुमच्या आधाराला अणकुचिदार
--- ००० ---

बाइक

बाइक होती जुनीच
घराला शेवटचा
रंग दिला तेव्हाची
डबल बसताना
तिचा विचार हलला
ती बाजूला झाली
पण तो पडला बाईकही पडली
तिची ओढणी होती
फुलाफुलांची तो प्लंबर असावा
त्याने सावरून
बाइक उचलली
आयुष्याचे वळण समजून
आणि दोन दिल्या ठेवून तिला
तो होताच तसा
ती उभीच राहिली
पतिपत्नीच असणार
की काय या अनिश्चिततेत थांबलेले
हळूहळू पांगले
त्याने दोन शिव्या हासडल्या
बस नीट आता म्हणाला
ती न रडता बसली

मग दूर दूर गेली
ती बाइक
तिचा एक तुटलेला तुकडा
आपण त्या गावचेच नव्हे
असा तिथेच पडून राहिला

रहदारी अशी की
अनेकदा पाहिलेयत तिने
चंद्र कसे पडतात
प्रदूषणाच्या विळख्यात ते
--- ००० ---

कधी ना कधी

कधी ना कधी
उत्तर लागेलच
असा प्रियकर
वाळूत तोंड

मिटलेले सरोवर
बटर चिकन
माहेर की सासर

प्रश्नच नको
असाही असतोच
एक शेणकिडा

स्वयंचलित हास्य
हवेय का रे बाळा तुला
तुला कळायलाच नकोय
तुझे काय झाले ते

अंगावरचे कपडेही का
पिरगाळले जाईनात
उकळत्या दु:खात
कितीही असो विचार
पण नकळत
--- ००० ---

हावरट

तुला हव्या असतात
मिळतील तितक्या

एका हाताने
वाजणाऱ्या टाळ्या
पण तुला दिसणाऱ्या

चिमणीच्या पिल्लासारख्या
तुझ्या भेदरलेल्या

घराला

तुझी प्रावरणे
वेधक आणि सुबोध

आणि तुला माहीत असणे
परिवर्तन

पण नसलेल्या घड्यात
पाणी तर भरते
वाटत सर्वच रंगांधळे
भोळे

पण आता तो नाहीय काळ
मनाच्या चिंध्या
जगण्याच्या वेशीवर

जीवनमरण म्हणण्याचा

मनच नसेल तर
हावरट काय असेल
--- ००० ---

तळ

ज्या काही आहेत
जवळिकीच्या चार गोष्टी
त्याही हळूहळू

जाताहेत दूर
कधी दिशेचे भान न राहिल्याने
तर कधी उद्दामपणे

किंवा मीच
जात असेन दूर
माझ्याच कविता

रद्दीत गेल्याने
वरवरची खोटी व्यवस्था
आता उदास वाटतेय

निळा पिवळा लाल
या रंगांत
नेहमीचेच

अरण्यरुदनही
वाटतेय घडते ते
बरेच असते

तिलाही निर्धास्त वाटणे
कोणत्याच कारणाने
काहीच न घडणे

आयुष्यात ज्याला
ना अस्तर ना टीप
तळच नसल्याने
--- ००० ---

निरोप

तुम्ही सांगू पाहताय
एक महत्त्वाचा निरोप
एकजण फोनवर एक पूजेत
एक अंघोळीला एक जाता जाता
बोलू आल्यावर

तुम्ही बाहेर पाहता
इतके का उडताहेत
कावळे ओरडत एकत्र
कळत नाही

आता तुम्हाला वाटते
तुम्हाला तहान लागलीय
तेवढ्यात डोअरबेल वाजते
कुरियरवाला
हे आमचे नाही शेजाऱ्यांचे आहे
तुम्ही म्हणता
तिथे कुलूप आहे घ्या तुम्ही
तो म्हणतो तुम्ही घेता

दार लावून तुम्ही आत येता
तर टीव्हीवर बातमी
एका मोठ्या पुढाऱ्याच्या मर्डरची
अरेरे

मग तुम्ही चॅनेल बदलता तर
नन्हेमुन्ने बच्चे तेरी मुठ्ठीमे क्या है

आता सध्या काय
या गाण्याचा संबंध
तुम्ही म्हणता
--- ००० ---

त्याग

कसला त्याग
तुझी बोंब एकच
मनाला शांत करत बसणे
अष्टावक्रांनी दिले टांगून

नाशवंत आहे
ते सगळे दे
रामदासांनी अस्मान दाखवले

तुकारामांनी तर
थुंकूनच टाकायला सांगितले
स्वत:ला नि:शेष
आणि गेले निघून
भूतकाळ पेटवून

आपल्या मुलांच्या भविष्यासाठी
आपण प्राण दिले पाहिजेत
कुणितरी होणारच ना
पायाचे दगड
त्यांच्या त्यागावर उभा आहे
आज आपला देश
आपल्या रक्षणासाठी
आयुष्य त्यागताहेत आपले शूर
सैनिक घड्याळ न पाहता
करा संस्थेसाठी काम
तुम्ही रक्त द्या मी स्वातंत्र्य देतो

तरुण वयातच कष्ट करायला हवेत
स्पर्धेचे जग आहे यश हवे असेल
तर पूर्ण तन मन त्यासाठी लावा

हे सगळे एक त्याग म्हणून करत राहा
--- ००० ---

राहून जाते

पाऊस खूप पडल्याने
उद्घाटनाचे राहून जाते

कुणितरी निवर्तल्याने
वाढदिवसाचे राहून जाते

मत्सरग्रस्त झाल्याने
प्रेमाचे राहून जाते

कायदा महत्त्वाचा असल्याने
लाच न देण्याचे तत्त्व राहून जाते

मन अस्वस्थ राहिल्याने
स्वस्थतेचे राहून जाते
--- ००० ---

टेबलदिवा

आम्ही दोघेही
दिसायला सारखेच वय आवाज डोळे
शेजारीच उभे होतो
त्याचे विचार
मी त्याचे म्हणत होतो
इतकेच

पाऊस आला
आणि छत्री एकच होती
नाही तरी तो
मीच असणार आहे
घेऊ दे त्याला
उलट त्याने मात्र
घेतलीच

माझ्या आधी त्याचे
ऑम्लेट खाऊन झाले होते
मी वाट पाहात होतो
तो परत येण्याची

झाडाच्या आधी
तो नेहमी वाफ म्हणे
मी मात्र
चालू बंद करत राही
टेबलदिवा

त्याला बहुतेक
मी माहीत नसणार
किंवा असेनही

मी ठरवलेय माझी नको चिंता
त्याची ठीक
--- ००० ---

निसर्ग

ते दृश्य पाहून
तिच्या डोक्यात येतो विचार
माझा नवरा जाईल तेव्हा
मीही अशीच बसलेली असेन का
केस विस्कटलेली डोळे सुजलेली

त्याच्या डाव्या की उजव्या बाजूला
ते ठरेल लोकांचे जाणेयेणे
अंत्यदर्शनाला कुठून आहे त्यावर

दु:ख होणारच
पण खूप तमाशा होऊ नये
सहानुभूती वाटावी
काहीशी कीवही चालेल

प्रत्येक हार आणि फुले पाहून
उचमळतील आठवणी
काही संतापाचेही आठवेल
पण सर्व काही
प्रेमाचेच आठवतेय असाच
दिसावा चेहरा थकलेला
एकाच दिवसात
जणू पुढची दहा वर्षे गेलेला

खरे तर आता हवेय काय
माझ्या एकटीसमोर हे जग
चालत राहून तरी काय करायचेय
असा समाप्त भाव असावा मनात

हजारो असतील कारणे पण सगळे
नीट जिथल्या तिथे वाटावे
शेवटी निसर्ग आहे
--- ००० ---

रजेचा अर्ज

नको विषाची परीक्षा
म्हणून एकवीस दुर्वा आणल्या
आणि नऊ एकवीसची लोकल

उगीचच चिडण्यात काय अर्थ
उद्याचे सरदार
खास मिसळ खाण्यासाठी आलेत

म्हणे मला तर पटतच नाही
अमुक कुणी निवडून न आल्यामुळे
इतका थयथयाट

मते धारणा आदर्श
बाळगत आयुष्य संपत आले
धंदा मात्र भजी तळणे हाच

शिंपी म्हणतो आपण
कॉलर अशी ठेवू या तुमची
जणू माझी नोकरी

बोलण्यातच अर्थ नाही
कारण न ठरवता संभाषण
फक्त सेक्सीच

जुनी झालीय ही इमारत
जायचे तर आहेच
सांडपाणीही फार आहे इथे

या सगळ्याचा सारांश
सध्या मी काहीच नाही करणार
रजेचा अर्जही नाही पाठवणार
--- ००० ---

पार्किंग

वळल्यावर फुलांचे दुकान
पूर्वी सुगंधामुळे काही आठवे
जाऊ दे रोज रोज काय म्हणून
एकदाच गाडी पार्किंग करून टाकली होती

जरा पुढे आलो तर एक भटके कुत्रे
तंदुरुस्त रस्ता क्रॉस करून लगबगीने
माझ्या दिशेने आले च्यायला काय झाले काय
हल्ला करतेय का काय म्हणून मी घाबरलो
त्यामुळे ते जरा दचकले आणि निघून गेले
नाशिकच्या दिशेने तेवढ्यात रात्र असली तरी
पान पडू शकतेच ना झाडाचे त्याने मी दचकलो
बरेच मोठे होते ते नेमके मीच आल्यावर

तरी सकाळी दिसले होते मुंगूस समोरून येत होता
वॉचमन त्याला मी म्हणालोही होतो आज बेष्ट
जाणार तुझा दिवस तर तो म्हणाला नाही नेहमीच
इकडे फिरत असतात ती त्यामुळे साप नाही येत
पण मग खातात काय ती मी विचारले होते
उंदीर बेडूक साप सापडले तर फळांचे तुकडे

गेटातून बाहेर आलो तर ऊन होते
पण औषधांचे दुकान अजून बंद होते
अशा एका आळशी दुकानात मी जाणेच बंद केले होते
तो सूट देत असूनही

दुसरे एक दुकान मी असेच बंद केले होते
झेरॉक्स वाईट येऊनही त्याने पैसे मागितले म्हणून

काही ना काही लागतेच च्यायला मन सतत
चालू राहायला
बंद पडले थोडा वेळ तर मरेल का काय ते साले
--- ००० ---

सवय

कुणितरी सांगितले होते
घराबाहेर पडताना घरात प्रवेश करताना
ऑफिसात प्रवेश करताना वगैरे नेहमी
उजवा पाय पुढे टाकावा मग डावा
त्याला पैसे थोडेच पडणार होते
आणि मी खूप हुशार माजुरडाही नव्हतो
त्यामुळे ती सवयच लागली

आता ते सगळे इतके निरर्थक वाटते की
मुद्दाम ठरवून ती सवय
घालवायचाही मी प्रयत्न नाही करत

आणि ठरवले समजा तर
आता ते बदलायचेच
अशी एक वेगळीच निरर्थक सवय लागेल
--- ००० ---

बटाटेवडा

बटाटेवडा म्हणजे काही
आमच्या पूर्वजांनी जिंकलेली एखादी लढाई नव्हे
आणि ना असतो तो एखाद्या वैचारिक
अंधारातून उगवलेला तारा
रातोरात नष्ट करणारा
इतरांच्या नावांच्या पाणपोया
देवळे मशिदी चर्च समाधीस्थळे
लगेच तिथे प्रस्थापित करत
सफाईदार रस्ते जणू त्यांवरून
वर्षानुवर्षे जात आहेत
लग्नांच्या मिरवणुका

शंभर टक्के काहीच नसते
एवढे समजण्यातच जातात खूप दिवस
मग विचार जणू विचारी होतो
आणि काय सोडून देता येईल
कुठे तडजोड नाहीच होणार ते ठरवतो
पण विचाराला हे नाही कळत की विचार
आणि या जगातली कोणतीही वस्तू वा गुण
यांचा कवडीचाही नसतो संबंध
तरीही सोयीस्करपणे तो देखावा उभा करतो त्यागाचा
आणि स्वार्थासाठी केलेल्या सुंतेला
तो देतो स्थान परिपक्वतेचे

याचा धर्माशी नसतो संबंध
कानात होणारी कुजबुज
ही खाजगी असते
प्रायव्हेट स्पर्श हे
जगाच्या दृष्टीने असतात
माहीत नसलेले तत्त्वज्ञान

नको असेल ते द्या ठेवून झाडाच्या ढोलीत
आणि बाकीचे समजा अधाशी पाऊसपाणी
तेच ते कृष्ण आणि तेच ते डोह
यांत किती पिढ्या बसणार डुंबत
चुंबनांचे नुसते उल्लेखही
अनैतिक आणि देवळांतले अत्याचार

समजले जाऊ लागले तर
तुमच्या कोणत्याही अपयशाला
वाली कोण राहील

याचाही विचारच करावा लागतो
दुसरे काही साधनच नाहीय
योनिलिंगस्वर्ग
मनाच्या बाहेर घडायला

तसे तर काहीच नाही घडणार
कविता म्हणून कुणी खपवू शकेल विचारच
जे केवळ असतील वरांचे वा शापांचे धनी
सापांचे वंशज गांडुळांचे गौरव
वैफल्यांचे प्रसाद अश्रूंचे तीर्थ
काळाच्या गाभाऱ्यातले
काळे ओले किळसवाणे स्पर्श
किंवा मध्येच फुललेले
प्रकाशातल्या टाळ्यांचे मुकुट जुने

विश्वसुंदरीला स्वत:ला पडणारी स्वप्ने
आणि तिच्याबद्दल पुरुषांना पडणारी स्वप्ने
यांची सरासरी कशी काढणार
त्यातून काय घडणे योग्य होईल
याचे कोण देईल उत्तर
कितीही विश्लेषण केले इतिहासाचे तरी

म्हणून म्हणावे लागते
वाचनालयांचे दरवाजे सोन्याचे करा हवे तर
पण शब्दांतून संभोग अवतरेल
हे शेवटी विचारच ठरवणार ना

विचार
चार वाजता
चरत जाईल
किंवा विरत जाईल
आणि विराट म्हटला तरी
राठच असेल
माठ फुटलेला
काठ भंगलेला

विचाराने फुलवा फूल
आणून दाखवा झाडाला पालवी
ते कशाला
घालवून दाखवा भूतकाळाचा जाच
आणि दु:खाचे करून दाखवा जादूने
समतेचे कबूतर अस्मितेशिवाय उडू शकणारे
--- ००० ---

कुत्र्याचे पिल्लू

हे धुके नसून काहूर आहे
शर्टाचे
बटणे तुटलेले
संगीत

उशिरा जागे झालेले
दूध
विरासत असलेले
हुंदडणाऱ्या स्वप्नांचे

मागून नसते मिळत
निरर्थक गगन
शोधून नाही सापडत
अंधाराचे रहस्य

विश्वाचे आर्त म्हणून
पाळलेले कुत्र्याचे पिल्लू
देते दिलासा आणि मान
पुन्हा झोपी जाण्यासाठी
--- ००० ---

खोटे अर्थ

कळत नाही
कळणारच नाही
कुणालाच नाही कळणार
त्यापेक्षा शिव्या देऊ
किंवा त्यापेक्षा
घोषणा देऊ
जय जय अमुक

दगडाला पाझर फुटतो
पण तो कुणाला दिसत नाही

शब्दावर नसतो
माझा कंट्रोल
तो परस्परच बोलतो
मी मलाच नाही कळत
तर तुमच्या आयुष्यात
कसा येऊ
तुमच्या कहाण्या
एक तर मला माहीत नाहीत
आणि ज्या काही असतील त्या
मी दुर्लक्षच करणार

याचा अर्थ तुमचा
मी अवमान नाही करत
मी तुमच्याशी बोलू लागलो
तर येतील
माझ्या आवाजांना
खोटे अर्थ

तुम्ही दुर्लक्ष करा हवे तर
मी तुमच्यासाठी नाहीच आहे
असणारही नाही
--- ००० ---

तेजोवलय

तू देव अस की देवी
आता या फरकाचा
प्रश्नच नाही येत
झाडाचा शेंडा पाहून
आता जे आठवते
तेच तसेच
हायवेवरची रहदारी पाहूनही

माझ्या मस्तकाच्या मागे
आता रिकामी जागा आहे
जणू तेजोवलय तूच

मला आता झाड आणि हायवे
सारखेच विनाशक आहेत

माझ्या मागे आता भूतकाळ नाहीय
--- ००० ---

चिर्र्र्र्र

सापाने पकडलेला उंदीर
वेगळाच ओरडतो चिर्र्र्र्र
भीतीने त्याचा अनुभव
मांडता नाही येत टेबलावर
बोधप्रद दिनक्रमात
एक विसावा पेय म्हणून

जगायचे बास
मग सिनेमा कोणता का असे ना
खुशाल वावरणारे काजवे
आज इकडे उन्हात कुठे आले

जिवंतपणी आपल्याला
आश्चर्य वाटायचेच
थांबले होते मेंदूतला तो भाग
दबून गेल्यामुळे
रोजच्या बातम्या गावगप्पा
आणि मालिकांमुळे

घडत तर असतेच काही ना काही
कुणीच कुणाला काहीच
म्हणाले नाही अशी एकादशी
कधीच नाही जात पंढरीला

याचा अर्थ हा शेवटचा
आहे क्षण हे कळतच नाही असे नाही
इतर सर्वच घटना मृतप्राय
झालेल्या असल्याने
आता भीतीने झोप उडून जाते इतकेच

भीतीच तेवढी कशी काय राहतेय
अशी सनसनाटी
--- ००० ---

हुकुमशाहीची वाट

बकऱ्या बसवलेल्या शेतात
तशी संसदभवनात माणसे
मते टाकणारी

त्यांच्या विहिरी
बुजलेल्या आता पुन्हा
खणण्यासाठी
आणलेत दलाल
घरे मिळवून देणारे भाड्याची

हे शहर आहे
आठवणी ठेवा टमरेलात
इथे एकच चालतो शिक्का
ज्यासाठी मरमिटतात
इथल्या सर्व कोर्टांतले
न्यायी बेलीफ

ही एक संस्कृती आहे
कलेत माती शोधणारी
कला मातीत घालणारी
लढायला तयार
सर्व केशकर्तनालये
बंद असली तरी

ठराविक तारखा
धोक्याच्या असतात
बंदोबस्त चोख असतो
पोलिसांची दातकोरणी
तेव्हा लटकतात झाडांवर

कोणतीच मते जुळत नाहीत तेव्हा
हुकुमशाहीची वाट मोकळी होते
--- ००० ---

असेल तसे

दोन हातांच्या हस्तरेषांत
खूप तफावत असेल तर आयुष्यात
बऱ्याच उलथापालथी आणि कष्ट
--- असेल तसे तर काय
मधल्या शनीच्या बोटाखाली
हृदयरेषा आणि मस्तकरेषा यांची कात्री होत असेल
तर पंचविसाव्या वर्षी वेडे व्हावे असे प्रसंग
--- असेल तसे तर काय
रेषा काळ्या असतील तर सतत
औदासीन्य आणि सूडबुद्धी
--- असेल तसे तर काय
यवचिन्ह वाईट मत्स्य चिन्ह चांगले
--- असेल तसे तर काय
स्वच्छ छान रविरेषा म्हणजे यश
--- असेल तसे तर काय

थोतांड आहे सगळे
--- असेल तसे तर काय
अंधश्रद्धा निर्बुद्धपणा आणि आळस
--- असेल तसे तर काय
आपल्या प्रयत्नांवर असते सगळे
--- असेल तसे तर काय
यश अपयश सुख दु:ख
हे सगळे योगायोग असतात
आजारपणे अपघात विरह हेही
--- असेल तसे तर काय
नियतिशरण नसणेच चांगले
--- असेल तसे तर काय

तर काही नाही सांगितले नुसते
तर काही नाही वाटते असे
काही तरी खात्री हवीच ना --- तर काय
--- ००० ---

न्योछावर

आंतरराष्ट्रीय विमानातून आलेली
कठोर न्यायव्यवस्था
ठेवली विलगीकरणाच्या फ्रिजमध्ये
न्यूनतम आधारभूत मागणी
इतकीच होती की
संसदेत फक्त
लोकांच्या स्वप्नांचीच चर्चा व्हावी
जरी लाल हिरवा पिवळा पांढरा निळा
हे रंग वेगवेगळे दिसत वाटत असले तरी

विचारालाच बगल दिली
तर बगलेतले काळे प्रश्न तसेच राहतील
आणि वाढत जाईल
असंतोषाचे प्रदूषण
या एका साध्या स्पष्ट अशा
न्यायाच्या मार्गाने का नाही जात
प्रशासन हा सनातन प्रश्न
बोटे मोडत राहिला
तरुण वयात विधवा झालेल्या
पूर्वीच्या सुनशत्रू
विकृत अबलांप्रमाणे

जातबांधव विरुद्ध धर्मबांधव
आणि अनेक विचारसरण्यांचे
पुरोगामी बांधव घेत होते जबाबदारी
दु:खाला हरवण्याची
त्या द्वंद्वांसाठी केलेल्या हौदात
मऊसूत माती होती
हव्याहव्याशा माणुसकीची
गुणगुणणारी घटनेची गाणी
गोड गोड गोड गोड गोड अविरत
संघर्ष हा नारा होता प्राण न्योछावर करणारा
--- ००० ---

बाजार

बक्षिसांच्या अवकाळी पावसाने
कवितांची आवक रोडावली तरी
खपही रोडावल्याने दुसऱ्याही
दिवसाच्या जोरदार निमंत्रणांनी
प्रतिसादांचे भाव पडत चालले आहेत

कवी अधिकाधिक दु:खी होत असूनही
असंवेदनशीलतेचा गारठा वाढतो आहे

प्रतिगामी आणि पुरोगामी दोघेही
समदु:खी झाल्याने
एकमेकांचे सांत्वन करताहेत
दोघेही चिडून मध्येच
खरडताहेत कविता
पावसाची खरडपट्टी काढणाऱ्या
ते पाहून अचंबित होतोय पाऊस
कवींचे प्रेम आटत चालल्याने
पिके आणि प्रेम दोन्ही धोक्यात आल्याने

मोठमोठे सुस्त व्यापारी आणि दलाल
पाहताहेत अविचलपणे कवींकडे
पण तरीही त्यांना
दुर्बोधच राहतेय कवींचे दु:ख

पिकांचा दुष्काळ आणि प्रेमांचे विरह
यांमुळे बाजार उजाड होताना पाहून
कवींच्या डोळ्यांतून आलेले अश्रू
मिसळताहेत समोरचे न दिसणाऱ्या
रहदारीच्या पाण्यात वाट्टेल ते झाले तरी
पुढल्या वर्षीचे संमेलन
गाजवूच गाजवू या विचारात
--- ००० ---

गर्दी

माझीच जिथे गर्दी असते
तिथे मी शक्य तो
बसतो आराम खुर्चीवर
डोळे मिटून
माझे ढ पण झाकण्यासाठी

इतरांच्या गर्दीत तर
मी स्मार्ट दिसून दिसून
कंटाळतो
आणि वेटोळे घालून
पडून राहतो
कोणत्या तरी वाचनालयात

लोकांना वाटते की मला
नादच असावा
स्वत:पेक्षा गर्दीचे अनुभव
अधिक दूरगामी मानण्याचा

मी माझ्या लोकांना सांगून
ठेवलेले तर असतेच की उगीचच
कुणाचे भ्रमनिरास करून
त्यांना डिस्टर्ब नका करू
त्यामुळे अपमान झाला असे वाटून
ते हल्लाही करू शकतात

माझ्यातले माझे बहुमत वेगळे
आणि इतरांच्या आरशातले वेगळे

हरायचे नसले तरी जिंकायचीही
गरज नाही हे मी समजून असतो
त्यामुळे मी प्रगल्भ दिसण्यात यशस्वी होतो
जरी हाही कंटाळाच असतो सगळा
--- ००० ---

मला

समोर एक स्पीकर बिघडलेला
बाकी ठीकठाक

माझा स्नेह बाळगणारा
कुणी असावा तिथे
अन्यथा मला कशाला कोण बोलावेल

अंधार थंडी पाऊस
यांत मिसळून गेलोय मी

वारेमाप नोकरी केली
झोपलो कमी
हौसेमौजेचे ठेवले
हातमोज्यात

आता काय त्याचे
हे काही ठरवून केलेले
शहरभ्रमण नाहीय

तंबाखूची किंमत
फेडून झालीय

ज्यासाठी येतात हे शब्द
ते घडण्यासाठी
सामोरे येणे तर घडायला हवे

दोष कुणाचाच नाहीय
कुणाचे मेंदू
त्यांच्या स्वत:च्या आज्ञेने घडलेयत

हे समजणे म्हणजे माझा अभावच
गरजच नव्हती मला बोलवायची
--- ००० ---

झोप आता

हो ना झोपतोस का तू आता
हो ना सगळेच मान्य करताहेत
काल ज्यांचे खून झाले
त्यांची हाडेही नाही सापडणार
पण बाकीचे आहेत ना
हो हो कुंडली हस्तरेषा अंगशास्त्र
एवढेच काय अक्युपंक्चर मानसशास्त्र
हे सगळेच त्याज्य मानायला तयार
झालेत ते समाधीकडे जाता जाता
कुणीही ऊर नका बडवू म्हणताहेत ते
ऐकतोयस का शांत हो आता
हो ना काही नियम कळलेत काही कळतील
पण सगळ्याच घटनांची लाखो कारणे
एका क्षणात कधीच नाही कळणार
पण थोडे थोडे कळत जाईल हेच ना
हो रे पटतेयच ते सगळ्यांना
आत्ताच संपलाय शो
येईलच ती एवढ्यात झोपतोस का तू
होय तर तेच तर होते तिच्या नाटकात
आयनेस्को नामक कुणी येतो आणि म्हणतो
म्हणे वाढू शकते मनात भूतकाळाचे प्रेत
पण जाऊ दे ते संपलाय तो शो आता
मलाही होतीच ना जरा भीती की
त्या प्रेताची नखे वाढत वाढत इथे येऊन
आपल्याला बोचकारतील की काय
पण संपलाय तो शो झोप आता मनाचे जाऊ दे
पण त्रास नको करून घेऊस हो हो
सगळ्यांना आहे मान्य की बाबा ही गोळी घे
क्रांतीच व्हायला हवीय मनाची सगळी सत्ये त्रिकाळ
वैज्ञानिक घागरीत भरली जायला हवीयत
पाण्याखाली सापडलाय ना हात पण
नको काळजी करूस तू झोप आता शांत
--- ००० ---